अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

# गंगाधर बाळकृष्ण सरदार

## व्यक्ती आणि कार्य

हेमंत विष्णू इनामदार




राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण

# गंगाधर बाळकृष्ण सरदार

## व्यक्ती आणि कार्य

हेमंत विष्णू इनामदार

राज्य मराठी विकास संस्था

अनुक्रमणिका

**अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण प्रकाशन क्र. ३**
**गंगाधर बाळकृष्ण सरदार**

ARVACHIN MAHARASHTRACHI JADANGHADAN PRAKASHAN No. 3
GANGADHAR BALKRUSHNA SARDAR

**आय. एस. बी. एन. क्रमांक :** 81-87889-59-4

**संगणकीय आवृत्ती :** २७ फेब्रुवारी, २०१५

**पहिली आवृत्ती :** मार्च १९९८

**© राज्य मराठी विकास संस्था**

**प्रकाशक**
**राज्य मराठी विकास संस्था**
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१.
दूरध्वनी : - ०२२-२२६३१३२५, फॅक्स : ०२२-२२६५३९६६
ई-मेल : - rmvs_mumbai@yahoo.com
संकेतस्थळ : rmvs.maharashtra.gov.in

**अक्षरजुळणी व मांडणी**
**कुमार कॉम्प्यूटर्स**
'अनुष्का' सर्वे नं.१३/४/१, लेन नं.३०,
धायरी, मुक्ताई गार्डनजवळ, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
ई-मेल : - nandu@kumarcomputers.in
संकेतस्थळ : www.kumarcomputers.in

**इ-पुस्तक रूपांतर**
**सीडॅक, पुणे**
सीडॅक-प्रगत संगणक विकास केंद्र,
वेस्टएण्ड सेंटर – III, स.नं. १६९/१, सेक्टर – II
औंध, पुणे – ४११००७

**विनामूल्य वितरणासाठी**
ह्या इ-पुस्तकाचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेच्या अधीन असून हे पुस्तक जनतेसाठी विनामूल्य स्वरूपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हे पुस्तक आपण स्वतःसाठी विनामूल्य उतरवून घेऊ शकता. परंतु त्याची प्रत करताना अथवा दुवा इतरांना देताना पैसे आकारणे, ह्या पुस्तकाची नक्कल करून त्याची विक्री करणे, किंवा या इ-पुस्तकाची प्रत आपल्या संकेतस्थळावर घालणे इ. गोष्टी करणाऱ्या व्यक्ती वा संस्था आढळल्यास त्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

अनुक्रमणिका

*प्रा. गं. बा. सरदार*
*यांच्या*
*पावन आणि प्रेरक स्मृतीला*
*ही अक्षररूप सेवा*

*सादर समर्पण..*

[अनुक्रमणिका](#)

# अनुक्रमणिका


जडणघडण मालिकेविषयी... ........................................................................ 6

लेखकाचे मनोगत ........................................................................ 9

जीवनवृत्त आणि व्यक्तिमत्त्व ........................................................................ 14

अव्वल इंग्रजीतील गद्याचे मूल्यांकन........................................................................ 25

संपादित ग्रंथांचा परिचय........................................................................ 29

संतसाहित्याचा परामर्श ........................................................................ 34

समाजप्रबोधनाची मीमांसा ........................................................................ 49

दलित साहित्याचे समालोचन ........................................................................ 61

समारोप ........................................................................ 67

परिशिष्ट १ : ........................................................................ 86

जीवनपट ........................................................................ 86

परिशिष्ट २ : ........................................................................ 88

साहित्यसूची........................................................................ 88

परिशिष्ट ३ : ........................................................................ 90

प्रासरदार यांनी संपादित केलेले ग्रंथ . ........................................................................ 90

परिशिष्ट ४ : ........................................................................ 91

संदर्भ सूची........................................................................ 91

## जडणघडण मालिकेविषयी...

'अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण' या पुस्तकमालमालेची आखणी राज्य मराठी विकास संस्थेने एक विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून केली आहे. ज्यांच्या कर्तृत्वातून, प्रयत्नांतून आणि प्रभावांतून आजचा महाराष्ट्र सामाजिक, सांस्कृतिक संदर्भात आकाराला आला आहे अशा व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह यांचा परिचय या मालेतून सर्वसामान्य शिक्षित वाचकांना करून दिला जाईल. त्यासाठी निश्चित केलेल्या विषयांवर मान्यवर लेखकांकडून जसजशी पुस्तके लिहून हाती येतील तसतशी ती प्रसिद्ध केली जातील.

'माले' तील तिसरे पुस्तक आज आम्ही प्रकाशित करीत आहोत. पहिले पुस्तक 'महाराष्ट्र साहित्य परिषद' या विख्यात संस्थेच्या वाङ्मयक्षेत्रातील कार्याविषयी असून ते म. श्री. दीक्षित यांनी लिहिले आहे. ते 'परिषदे' च्या नव्वदाव्या वाढदिवशी आम्ही समारंभपूर्वक प्रकाशित केले. दुसरे पुस्तक मान्यवर वैयाकरण प्रा. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी लिहिलेले 'मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य' असे आहे. मराठी विषयाचा अभ्यास करणारे विद्यार्थी, शिक्षक आणि प्राध्यापक कै. दामले यांनी लिहिलेल्या' शास्त्रीय मराठी व्याकरण' या बृहद ग्रंथाचा अभ्यासासाठी नेहेमी उपयोग करीत असतात. त्याचे प्रचंड आकारमान पाहून बिचकूनही जातात. परंतु या अभ्यासकांना आणि इतरांनाही सर्वसाधारणपणे दामले यांच्या जीवनाची आणि त्यांनी व्याकरणक्षेत्रात केलेल्या कार्याची नेमकी कल्पना नसते. प्रा. अर्जुनवाडकर यांनी दामल्यांच्या चरित्राची आणि वाङ्मयीन कार्याची ओळख या पुस्तकात करून दिली आहे.

डॉ. हेमंत विष्णू इनामदार यांनी आमच्या विनंतीला मान देऊन' गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य' (जन्म : १९०८ मृत्यू : १९८८) हे, या मालिकेतील तिसरे पुस्तक लिहून दिले आहे. ते आज प्रकाशित करत आहोत. डॉ. इनामदार यांचा प्रा. सरदारांशी दीर्घकाळ व्यक्तिगत परिचय होता. संतवाङ्मयाचे अध्ययन हा या दोघांना जोडणारा आणखी एक दुवा. सामाजिक प्रबोधनाला प्रा. सरदारांच्या जीवनात व लेखनात जे केन्द्रवर्ती स्थान होते त्याची डॉ. इनामदारांना फार जवळून ओळख होती. आम्ही त्यांच्या या अनुभवाचा लाभ इतरांनाही व्हावा या हेतूने हे पुस्तक लिहिण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आणि त्यांनीही ती आनंदाने मान्य केली. या आत्मीयतेने केलेल्या सहकार्याबद्दल राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने मी त्यांचे आभार मानते.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि साहित्यिक विश्वावर प्र. गं. बा. सरदार यांचे असणारे ऋण विविधप्रसंगी जाणवत असते. त्या ऋणाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करावे ही, हे पुस्तक लिहून घेण्यामागील एक प्रेरणा आहे. सामाजिक गरजांचे अनुसंधान ठेवून चालणारे राज्य मराठी विकास संस्थेचे भाषिक उपक्रम पाहून आज प्रा. सरदार यांना खचितच आनंद झाला असता असेही वाटते.

'जडणघडण' मालिकेतील सर्व पुस्तकांचे बाह्यांग सारखेच राहणार आहे. तथापि, या पुस्तकांचे व्यक्ती, संस्था आणि विचारप्रवाह असे तीन गट असतील आणि त्यांनुसार मुखपृष्ठांचे तीन वेगवेगळे रंग राहतील.

**सरोजिनी वैद्य**
**वसंत आबाजी डहाके**

अनुक्रमणिका



**गंगाधर बाळकृष्ण सरदार**

१९०८-१९८८

अनुक्रमणिका

**‘अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण’** या मालेतील पुस्तके

१) महाराष्ट्र साहित्य परिषद : म. श्री. दीक्षित

पृष्ठे११४, मूल्य ५० रुपये.

२) मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य : कृष्ण. श्री. अर्जुनवाडकर

पृष्ठे १०३, मूल्य ५० रुपये.

३) गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य : हेमंत वि. इनामदार

पृष्ठे १०८, मूल्य ६० रुपये.

४) आचार्य काका कालेलकर : व्यक्ती आणि कार्य : मृणालिनी जोगळेकर

पृष्ठे १८०, मूल्य १५० रुपये.

**आगामी**

५) बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य : मोहिनी वर्दे

मूल्य ६० रुपये.

अनुक्रमणिका

## लेखकाचे मनोगत

पुणे येथील श्री. ना. दा. ठाकरसी महिला महाविद्यालयात एकतीस वर्षे मी मराठीचे काम अध्यापन केले(१९५४ ते १९८५). प्रा. गंगाधर बाळकृष्ण ऊर्फ अण्णासाहेब सरदार हे त्या संस्थेत १९४१ ते १९६८या कालावधीत मराठीचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. त्यांपैकी १४ वर्षे त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मला मिळाली(१९५४ ते १९६८). माझी पत्नी डॉ. सौ. अलका इनामदार ही एफ. वाय. पासून एम. ए. पर्यंत सरदारांची विध्यार्थिनी होती. एखादी शिकवणी लावून ज्या गोष्टी समजल्या नसत्या, अशा अनेक गोष्टी सरदारांच्या सहवासातून व त्यांचाशी केलेल्या विचारविनिमयातून आम्हांला शिकता आल्या. शैक्षणिक मूल्यांविषयीची तळमळ आणि वैचारिक सचोटी या गुणांचा प्रत्यय त्यांच्या वर्तनातून आमच्या मनावर उमटला.

या संदर्भातील दोन आठवणी नमूद करण्याजोग्या आहेत.

महामंडळाच्या शुद्धलेखनविषयक नव्या नियमांना सप्टेंबर १९६२ मध्ये शासनाने मान्यता दिली होती. या नियमांप्रमाणेच लेखन करावे, असा आदेश सर्व शिक्षणसंस्थांना जारी करण्यात आला होता.

जानेवारी १९६३ मध्येमहाविद्यालयाचे नियतकालिक प्रसिद्ध व्हायचे होते. त्यासाठी ‘तिची कुत्री’ या नावाची, एका विद्यार्थिनीने लिहिलेली गोष्ट छापायची होती. सरदार मुख्य संपादक होते. मी त्यांचा मदतनीस होतो. गोष्ट कुत्र्यांच्या अनेक पिलांविषयी होती. लेखिकेला एक ‘कुत्री’ (स्त्रीलिंगी) अभिप्रेत नव्हती. अनेक ‘कुत्री’ (नपुंसकलिंगी) गोष्टीमध्ये तिने वर्णिली होती. (ते कुत्रें, ती कुत्रीं.) महामंडळाच्या नव्या नियमाप्रमाणे अनुस्वार न द्यावेत, तर गोष्टीच्या मथळ्यावरून एका स्त्रीलिंगी कुत्रीची ती गोष्ट ठरत होती. त्यामुळे त्या गोष्टीचा आशय बदलत होता. सरदारांनी व मी चर्चा केली. छापलेल्या प्रुफांमध्ये मथळ्याच्या ठिकाणी व मजकुरातील योग्य जागी अनुस्वार दिले. मुद्रणादेश देऊन तो फॉर्म मुद्रणालयाकडे पाठविला.

त्या दिवशी रात्री दहा वाजता सरदार माझ्या घरी आले. रा. श्री. जोग आणि व. दा. गोखले यांच्याशी चर्चा करून ते आले होते. नव्या नियमाप्रमाणे अनुस्वार देता येत नाहीत. एकदोन परिच्छेद वाचून झाल्यावर वाचकाला योग्य तो संदर्भ समजेल, असा निर्णय त्या दोघांनीही दिला होता.

सरदारांच्या इच्छेप्रमाणे ते आणि मी असे दोघेही छापखान्यात गेलो. मालकांना जागे केले. त्यांनी मशीनवरून तो फॉर्म काढून आमच्या हाती दिला. अनुस्वार काढून टाकून आम्ही दुरुस्ती केली. सरदारांना त्यांच्या घरी पोहोंचवून मी रात्री बाराला माझ्या घरी परत आलो.

दुसऱ्या दिवशी दुपारी महाविद्यालयात आमची भेट झाली. काहीतरी निमित्ताने बोलणे निघाले. मी म्हणालो, ‘अण्णासाहेब, काल रात्री आपण विनाकारण त्रास घेतला. गोष्ट एका विद्यार्थिनीची होती. अनुस्वाराची चूक राहून गेली असती तर काय बिघडलं असत?’ त्यावर सरदार म्हणाले, “खरं आहे. तुम्हाला उगीचच त्रास झाला.”

सरदार वर्गावर गेले. मी ग्रंथालयात गेलो. आपण त्यांना असं बोलायला नको होतं, हे माझ्या मनात आलं. पण त्या तरुण वयातली माझी अस्मिता मोठी होती. मी गप्प राहिलो. दुसऱ्या दिवशी सकाळी सरदार

अनुक्रमणिका

माझ्या घरी आले. त्यांनी चहा घेतला. गप्पागोष्टी झाल्या. शुद्धलेखनाचा विषय निघाला नाही. तासाभरानं ते घरी गेले.

चार दिवसांनी मी त्यांना म्हणालो, 'तुम्ही माझ्याकडं चहा घेऊन गेलात. त्यामागची 'सामाजिक फलश्रुती' माझ्या ध्यानात आली!'

त्यावर सरदार मोकळेपणानं हसले. ते म्हणाले, "अहो, मी महाविद्यालयात नव्यानं लागलो, तेव्हा मीही तात्यांना(वामन मल्हारांना) काही किरकोळ मुद्यावरून छेडल होतं. तात्यांनी दिलगिरी व्यक्त केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ते माझ्याकडं चहाला आले होते. तेव्हा त्यांनी घालून दिलेला पाठ मी गिरवला, इतकंच काय ते! आता शुद्धलेखनाच्या मुद्याकडे वळू या. 'गोष्टीत कसलं आलंय शुद्धलेखन,' असा तुमचा मुद्दा होता. आपण असं धरून चालू की, तो अंक छापून झाला नाही; किंवा वर्गात त्याच्या प्रती वाटल्याच नाहीत. तरीही आपल्या सहीनं आपण जे मंजूर करतो, ते आपल्या कल्पनेप्रमाण निर्दोष असलं पाहिजे. त्यातूनही त्यात चूक राहू शकेल, करण आपण स्वतःच अपूर्ण असतो. पण आपण जे मान्य करतो, ते परिपूर्ण होण्यासाठी आपण प्रयत्न केलाच पाहिजे. एक कल्पनानिर्मित तज्ज्ञ सतत आपल्या डोळ्यांसमोर असला पाहिजे. त्याचा नैतिक धाक आपल्याला वाटला पाहिजे," अनुभव लहानसा पण लक्षात राहून गेला.

दुसरी आठवण जास्त हृदयस्पर्शी आहे. सरदारांचा एक कनिष्ठ सहकारी म्हणून चोपन्न साली नव्यानेच माझे काम सुरु झाले होते. बी. ए. च्या वर्गाला ज्ञानदेवांच्या चिद्विलासवादाचा विषय मी माझ्या परीने समजावून सांगितला होता. पण विद्यार्थिनींचे समाधान झाले नसावे. काही विद्यार्थिनी सरदारांकडे गेल्या. 'आपणच हा विषय आम्हांला समजावून सांगा' , अशी त्यांनी सरदारांना विनंती केली. त्यावर सरदार त्यांना लगेच म्हणाले, "महाविद्यालयाने हा विषय इनामदार सरांकडे सोपविला आहे. मी त्यात हस्तक्षेप करणार नाही. इनामदारच तुम्हांला चिद्विलासवाद पुन्हा स्पष्ट करून सांगतील. त्यांना काही अडले, तर मी त्यांच्याशी चर्चा करू शकेन. पण त्यांच्या अपरोक्ष त्यांच्या विषयात मी हात घालणार नाही. तुम्ही त्यांना उद्या वर्गात भेटा आणि विनंती करा. ते तुमचे समाधान नक्कीच करतील."

विद्यार्थिनींना एवढचं सांगून सरदार थांबले नाहीत. त्याच दिवशी ते संध्याकाळी माझ्या घरी आले, घडलेला प्रसंग त्यांनी सौम्यपणे माझ्या कानावर घातला. शंकराचार्यांचा मायावाद आणि ज्ञानदेवांचा चिद्विलासवाद या संकल्पनेविषयी ते भरभरून बोलले. ते दोन्ही सिद्धांत त्यांनी साधार स्पष्ट करून मला सांगितले. दुसऱ्या दिवशी वर्गात तो विषय मी पुन्हा मांडला. विद्यार्थिनींनी मला समाधानाची पावती दिली.

सरदारांच्या वृत्तीतील ही उदारमनस्कता पाहून मी थक्क झालो. त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेने माझे मन भरून आले. जेष्ठ अध्यापकाने आपल्या सहकाऱ्याशी कसे वागावे, याचा एक वस्तुपाठच या प्रसंगातून माझ्या मनावर ठसला.

सरदारांच्या बरोबर काम करताना अशा अनेक गोष्टी मला शिकता आल्या. वा. दा. गोखले आणि ग. बा. सरदार हे महाविद्यालयातले चालते -बोलते ज्ञानकोश होते. कुठलाही संदर्भ अडला, तर ते अचूक अर्थ व नेमका तपशील सांगत असत. त्यामुळे आपणही आपला व्यासंग वाढवीत राहिलं पाहिजे, अशी मनाला सतत बोचणी असे.

अनुक्रमणिका

१९६८मध्ये सरदार सेवानिवृत्त झाले. मला ते गमतीने म्हणाले, “आपण दोघे सरदार, इनामदार, सरंजामशाहीचे, नाममात्र का होईना, वारसदार होतो. आता मी निवृत्त होत आहे. तुमच्या रुपानं सरंजामशाहीचा एकच अवशेष इथं उरणार आहे!”

सरदारांच्या त्या गमतीच्या बोलण्याची नस पकडून मी म्हणालो,’ अण्णासाहेब, योगायोगानं मी एकटा राहणार नाही. आपण निवृत्त होत आहात; पण प्रा. वसंत मिरासदार नुकतेच आले आहेत. आजवर ‘सरदार -इनामदार’ अशी जोडी काम करीत होती. इथून पुढे ‘इनामदार-मिरासदार’ ही जोडी काम करणार आहे. नाममात्र का होईना, पण सरंजामशाही इथं चालू राहणार आहे!’

सरदार निवृत्त झाल्यामुळे १९६८नंतर महाविद्यालयात त्यांचे येणे बरेच कमी झाले. त्यांच्या भेटीची मला ओढ वाटे. त्यामुळे मी अधूनमधून त्यांच्या घरी जाऊ लागलो. प्रासंगिक किंवा सामाजिक घटना, ग्रंथगत एखादा मुद्दा, वृत्तपत्रातील एखादी राजकीय वार्ता, यावरून आमचे बोलणे सुरु होई. सरदारांनी त्या विषयाचे सूक्ष्म चिंतन केलेले असे. त्या विषयीची बलस्थाने व शबलस्थानेही त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होत जात. कोणत्याही गोष्टीचा सुटेपणाने विचार करण्याऐवजी समग्र समाजजीवनाच्या भव्य ‘कॅनव्हास’ वर सरदार त्या गोष्टीचा परामर्श घेत असत.

‘प्रबोधनातील पाऊलखुणा’ हे पुस्तक १९७८ मध्ये सरदारांनी मला भेट म्हणून दिले. ते ग्रंथोपायन मला आवडले. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी त्यात सरदारांचे दहा स्फुट लेख संपादित केले होते आणि त्यांनी त्या संग्रहाला विवेचक प्रस्तावना दिली होती.

त्यातील लेखांशिवाय त्यांचे अन्य अनेक निबंध विविध नियतकालिकांतून विखुरलेले होते. मी ते वाचले होते. हे सर्व स्फुट लेखन ग्रंथरूपाने एकत्रित यायला हवे, असे मला जाणवले. याच जाणीवेतून डॉ. प्र. चिं. शेजवलकर, डॉ. ल. रा. नसिराबादकर आणि प्रा. वि. शं. चौघुले या माझ्या तीन मित्रांचे सहकार्य मी मिळवले. त्यातूनच १९८२, १९८७ व १९८८ या तीन वर्षी त्या तिघांनी संपादिलेले सरदारांचे तीन लेखसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

सरदारांच्या सहवासातून आणि त्यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चांमधून त्यांच्या वैचारिक वाटचालीचा आलेख रेखाटता येतो. ‘महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी’ हे त्यांचे पुस्तक १९४१ मध्ये प्रकाशित झाले. तो काळ महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनात मार्क्सवादी विचारप्रवाहांचा होता. पण मुळामध्ये सरदारांच्या मनाची मशागत महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानातून झालेली होती. सरदारांचे गांधीजींच्या विचारांवरील हे प्रेम त्यांच्या ‘गांधी आणि महाराष्ट्र’ तसेच ‘गांधी आणि आंबेडकर’ या दीर्घ निबंधांतून प्रतीत होते. संतसाहित्यातील ‘आध्यात्मिक मानवतावादा’ चे त्यांना आकर्षण वाटले. या आकर्षणाचीच ‘फलश्रुती’ पुढे पुस्तकाच्या रूपाने साकार झाली. १९४२ च्या चळवळीने जो धक्का दिला, त्यातून सरदार भौतिकवादाकडे वळले. मार्क्सवाद, गांधीवाद, अध्यात्मवाद व भौतिकवाद या चारही निष्ठांचे अपूर्व विलयन (‘फ्यूजन’) सरदारांच्या विचारप्रणालीत, आणि म्हणूनच त्यांच्या वाङ्‌मयातही झाले.

प्रा. गं. बा. सरदार यांच्याविषयीच्या या पुस्तकाची रचना पुढीलप्रमाणे :

अनुक्रमणिका

आरंभी सरदारांचा जीवनवृतान्त संक्षेपाने दिला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी होत गेली, याचा मागोवा त्यानंतर घेतला आहे. त्यापुढील एकेका प्रकरणात, अव्वल इंग्रजीतील मराठी गद्य, संपादित ग्रंथ, प्राचीन मराठीतील संतसाहित्य, समाजप्रबोधन आणि दलित साहित्य या विषयांची सरदारांनी जी मीमांसा केली आहे, तिचा परिचय करून दिला आहे आणि शक्य तेथे त्या मीमांसेचा परामर्शही घेतला आहे. शेवटच्या समारोपाच्या प्रकरणात येथवर केलेल्या विवेनचनातून हाती आलेले निष्कर्ष दिलेले आहेत. तसेच संतसाहित्याची सरदारांनी केलेली समीक्षा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याला त्यांनी केलेले योगदान यांचे महत्व त्याच संदर्भात विशद केले आहे.

शेवटी सरदारांची कौटुंबिक माहिती व जीवनपट. साहित्यसूची, संपादित ग्रंथ, संदर्भसूची, अशी चार परिशिष्टे दिली आहेत.


सरदारांच्या समाजचिंतनाच्या संदर्भात मित्रवर्य डॉ. ल. रा. नासिराबादकर यांच्याशी केलेली चर्चा उपयुक्त ठरली. सरदारांच्या भगिनी डॉ. सौ. सुलोचना नाडकर्णी यांनी सरदारांविषयीची कौटुंबिक माहिती पुरवली. माझे आप्त श्री. अशोक आचार्य यांनी मुद्रणप्रत तयार करण्यासाठी मदत केली. त्या तिघांना हार्दिक धन्यवाद.

या पुस्तकाचा निमित्ताने प्रा. गं. बा. सरदार यांचा व्यक्तिमत्त्वाचा आणि लिखाणाचा परिचय करून देण्याची संधी 'राज्य मराठी विकाससंस्थे' च्या सौजन्यामुळे मला मिळाली. या संस्थेच्या संचालक, डॉ. सौ. सरोजिनी वैद्य आणि संस्थेचे उपसंचालक प्रा. वसंत आबाजी डहाके या दोघांचा मी मनोमन आभारी आहे.

संतोष, भारती निवास कॉलनी,
६०/१५ एरंडवणे पुणे ४११ ००४

**हेमंत विष्णू इनामदार**

अनुक्रमणिका



पुणे, ७-८-८८.

आचार्य फाटक यांस —

स. न. वि. वि.

आपले पत्र पावले. गेली वीसपंचवीस वर्षे, गांधी-नेहरूंसारखे युगप्रवर्तक लोक सोडल्यास, कोणत्याही वैयक्तिक गौरवग्रंथात मी लेखन केलेले नाही. मी सार्वजनिक जीवनात काही विचार सुसंगतपणे मांडीत आलो आहे. त्या माझ्या विचारांना खंबीर नैतिक अधिष्ठान हवे, म्हणून हे पथ्य मी कसोशीने पाळले आहे. संस्था, आंदोलने, तत्त्वज्ञाने यांवर मी लिहिले; पण व्यक्तींवर लिहीत नाही. तेव्हा आपण याबाबतीत मला क्षमा करावी. जीवनात कितीही किंमत द्यावी लागली, तरी तत्त्वच्युती न पत्करण्याची माझी प्रवृत्ती आहे. आपण रजिस्ट्रारना माझी भूमिका समजावून द्याल, अशी मला खात्री आहे. माझी आपणांस तशी विनंती आहे.

कळावे, ही विनंती.

आपला

ग. बा. सरदार

**गंगाधर बाळकृष्ण सरदार यांचे हस्ताक्षर**

अनुक्रमणिका

# १.
# जीवनवृत्त आणि व्यक्तिमत्त्व

## जीवनवृत्त

प्रा. गंगाधर बाळकृष्ण उर्फ अण्णासाहेब सरदार यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील जव्हार या गावी दि. २ ऑक्टोबर १९०८ रोजी झाला. बाळकृष्ण महादेव सरदार हे त्यांचे वडील. आईचे नाव रुक्मिणी. या दांपत्यास पाच मुली व गंगाधर हा एकच मुलगा होता. सरदारपरिवाराचे मूळ गाव 'भालावळी' हे होते. सरदारांचे पूर्वज' तेंडूलकर-भालावळकर' असे नाव लावीत. जव्हार हे छोटेसे संस्थान होते. सह्याद्रीच्या डोंगरपठारावरील या गावात भरपूर पाऊस पडत असे. सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध असलेले डॉ. सुधीर फडके हेही जव्हारचेच. सरदारांचे ते बालमित्र होते. ते लिहतात, 'सह्याद्रीच्या या रमणीय प्रदेशातील कड्याकपारीत खेळण्याबागडण्यात सरदारांचे व माझे बालपण गेल्यामुळे आमची शरीरे काटक झाली. निसर्गाच्या औदार्याचा व उदात्ततेचा साक्षात्कार आमच्या वाढत्या शरीराला व मनाला सतत होत राहिल्यामुळे आमचे स्वभाव पण निरोगी व मनमोकळे झाले. याच वेळी दुसरी एक गोष्ट आम्हांला विचारप्रवण करीत होती. तिथली प्रजा आदिवासी होती. वारली, कोळी, ठाकुर, कातकरी इत्यादी जमातींचा त्यात समावेश असे. राजसेवकांना करभार द्यावा, अर्धपोटी गुजराण करावी व कमरेला एखादे सुडके असावे, अशा अवस्थेत या जमाती राहत होत्या. आमच्या बालमनावर या परिस्थितीचा खोल ठसा उमटला.'

सरदारांचे वडील कष्टाळू, करारी आणि तत्त्वनिष्ठ होते. आई शांत आणि सोशिक होती. सरदारांना एक काकू होती, तिचे तीन मुलगे, एक मुलगी, वडिलांची आत्या, मावशी, स्वतः सरदार व त्यांच्या पाच बहिणी एवढ्यांचे हे एकत्र कुटुंब होते. बालवर्गापासून व्हर्नाक्युलर फायनलपर्यंतचेसर दारांचे शिक्षण जव्हारच्या 'कृष्ण विद्यालया' त झाले.

इंग्रजी शिक्षणासाठी सरदार मुंबईस आपल्या चुलत्याकडे राहिले. दादरच्या छबिलदास हायस्कूलमधून १९२४ मध्ये मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक्युलेशन परीक्षा ते उतीर्ण झाले.

त्यानंतर सरदारांनी एकदोन वर्षे काही सामाजिक कामे करण्यात वेचली. आपले जुने स्नेही डॉ. सुधीर फडके यांच्या मदतीने त्यांनी पंचवीस साली जव्हारला 'शिवमंडळ' स्थापन केले. शिवजयंतीचा उत्सव, गणेशोत्सव, अस्पृश्यतानिवारण, नाट्यस्पर्धा, क्रीडास्पर्धा, गीतापठण असे अनेक उपक्रम या मंडळाने सुरु केले. मंडळाच्या कामात शिंपी, मराठा, चांभार, मुसलमान अशा अनेक जातिधर्मांच्या मुलांच्या सहवासात ते असत. त्यामुळे सामाजिक समतेचा वस्तुपाठ त्यांनी सहजपणानेच गिरवला.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी सरदार पुण्याला आले. सर परशुरामभाऊ महाविद्यालयातील पहिल्या वर्गात त्यांनी नाव नोंदविले. १९२५ च्या आसपासचा, राष्ट्रीय चळवळीचा तो काळ होता. सरदार महात्मा गांधींच्या विचारांनी प्रभावित झाले. त्यांनी गांधीवादाचा स्वीकार केला. खाडीचे कुडते, पंजेवजा धोतर व अनवाणी चाल अशी त्यांची राहणी होती. तीस सालच्या मिठाच्या सत्याग्रहात ते सहभागी झाले. बेळगावच्या तुरुंगातून इतर सत्याग्रहींबरोबर सरदारांची सुटका झाली. त्या वर्षी त्यांची बी. ए. ची परीक्षा हुकली. ब्रह्मचारी राहून समाजसेवा करावी, अशी त्यांची इच्छा होती. पण आपल्या मुलाने स्थिरपणाचे जीवन जगावे, असे त्यांच्या आई-वडिलांना वाटत होते. शेवटी अंतर्मुख होऊन सरदारांनी एक निर्णय घेतला. चळवळीतल्या

अनुक्रमणिका

धावपळीपेक्षा शांततेतील चिंतन हेच आपल्या प्रकृतीला मानवेल, असे त्यांना जाणवले. राजकारणाच्या धुमाळीत आणि समाजसेवेच्या चळवळीत प्रत्यक्ष सहभागी होणे आपल्याला मानवणार नाही, त्यापेक्षा वैचारिक भूमिकेवरून सामाजिक प्रबोधन हेच आपले जीवितकार्य असावे, हे त्यांनी ठरविले.

१९३२मध्ये सरदार बी. ए. झाले. फेब्रुवारी १९३३मध्ये मुलुंड येथे कु. गुलाब लोटलीकर यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. लग्नानंतर त्या सौ. सुमती सरदार झाल्या.

चौतीस साली सरदारांनी एम. ए. ची पदवी मिळविली. त्या काळात नोकऱ्यांची वानवा होती. त्यामुळे पुढील सहा वर्षे सरदार मोकळेच होते. मात्र या काळात मराठी संतांचे वाङ्मय, महात्मा गांधींचे साहित्य, कार्ल मार्क्स यांचा ‘कॅपिटल’ हा ग्रंथ, तसेच अन्य वैचारिक वाङ्मय या सर्वांचे वाचन आणि चिंतन त्यांनी भरपूर केले.

१९४१मध्ये पुण्याच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला महाविद्यालयात मराठीचे व्याख्याते म्हणून सरदारांना नोकरी मिळाली. तिथूनच मराठीचे प्रपाठक म्हणून १९६८मध्ये ते रीतसर सेवानिवृत्त झाले. या महाविद्यालयातील अठ्ठावीस वर्षाचा त्यांचा सेवकाल चांगल्या प्रकारे व्यतीत झाला. आयुष्यात सरदारांनी एवढी एकच नोकरी केली. महर्षी कर्वे, वामन मल्हार जोशी, रा. कृ. लागू, वा. दा. गोखले, कमलाबाई देशपांडे, चित्रकार स. कृ. पिंपळखरे अशा ख्यातनाम व जेष्ठ प्राध्यापकांबरोबर सरदारांनी काम केले. या महाविद्यालयाच्या मराठी विभागात मुक्ताबाई दीक्षित, सरोजिनी शिंदे, मालती किर्लोस्कर हे. वि. इनामदार हे सरदारांचे कनिष्ठ सरकारी म्हणून होते.

पद्मा गोळे, संजीवनी मराठे, मालती दाते, मंदा खांडगे, सेवा चौहान, अलका इनामदार, वंदना अकोलकर, कुंता जगदाळे अशा गुणी विध्यार्थिनी सरदारांच्या हाताखाली शिकल्या. त्यांनी आपले अध्यापनकार्य एक व्रत म्हणून पार पाडले. लेडी प्रेमलीला ठाकरसी, शारदाबेन दिवाण, ज्योतिबेन त्रिवेदी, कमलिनीबेन भणसाळी, प्राचार्य द. शं. फाटक अशा समर्थ, शिक्षणप्रेमी विद्यापीठीय अधिकाऱ्यांना सरदारांच्या व्यासंगाविषयी व कर्तव्यनिष्ठेविषयी आदर होता.

सेवानिवृत्तीपर्यंतच्या काळात सरदारांनी, लेखणी आणि वाणी यांच्या माध्यमांतून अध्यापनाव्यतिरिक्तही भरीव काम केले. ‘अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका’ (१९३७), ‘महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी’ (१९४१) आणि ‘संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती’ (१९५०) ही त्यांची तीन पुस्तके याच काळात प्रकाशित झाली. पुढे त्या पुस्तकांच्या अनेक आवृत्याही निघाल्या.

काही वर्षे सरदारांनी आपल्या घरी एक अनौपचारिक अभ्यासमंडळ चालविले. द. रा. कानेगावकर, मु. ग. पानसे, पु. ल. देशपांडे, ह. श्री. शेणोलीकर, नलिनी पंडित प्रभृती अभ्यासक याच मंडळात येत असत.

विविध व्यासपीठांवरून सरदारांनी या काळात व्याख्याने दिली. १९५८ व १९६३ या दोन वर्षी आकाशवाणी लाड स्मारक व्याख्यानमालेत संतसाहित्यावर त्यांनी आपले विचार मांडले. एक समाजमनस्क विचारवंत आणि प्रभावी वक्ता अशी त्यांची प्रतिमा त्यांतून लोकांसमोर उभी राहिली.

अनुक्रमणिका

सेवानिवृत्तीनंतर सरदारांच्या लेखनाला आणि प्रबोधनकार्याला वेग आला. नोकरीचे बंधन नसल्यामुळे त्यांना शारीरिक स्वास्थ्य व मानसिक मोकळीकही मिळाली. संत ज्ञानेश्वर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर व महात्मा फुले यांच्यावरील सरदारांच्या व्याख्यानमालांच्या संहिता ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाल्या. मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन (१९७५), दलित साहित्य संमेलन (१९७८) आणि बार्शी येथे भरलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (१९८०) यांची अध्यक्षपदे त्यांना लाभली. याशिवाय विविध अभ्यासवर्ग आणि प्रबोधन-शिबिरे यांतून उभ्या महाराष्ट्रातील युवा पिढीला व तळागाळातल्या बांधवांना सरदारांनी मार्गदर्शन केले.

विविध नियतकालिकांतून सरदारांचे जे स्फुट लेख वेळोवेळी प्रसिद्ध होत गेले, त्या लेखांचे चार संग्रह संपादित स्वरूपात अभ्यासकांनी सिद्ध केले. 'प्रबोधनातील पाऊलखुणा' (निर्मलकुमार फडकुले, १९७८), 'नव्या युगाची स्पंदने' (प्र. चिं. शेजवलकर, १९८२), 'नव्या ऊर्मी, नवी क्षितिजे, '(ल. रा. नसिराबादकर, १९८७) आणि 'परंपरा आणि परिवर्तन' (वि. शं. चौघुले व मो. स. गोसावी, १९८८) या चार लेखसंग्रहांतून सरदारांचे बरेच विचारधन सामावलेले आहे.

'परंपरा आणि परिवर्तन' हा सरदारांचा लेखसंग्रह दि. २ ऑक्टोबर १९८८ रोजी पुण्यात थाटाने प्रकाशित झाला. त्या दिवशी त्यांचा ऐंशीवा वाढदिवस होता. "स्फुट स्वरुपात आजवर मी काही वेळोवेळी जे काही लिहीत आलो, त्यातील एकही लेख आता संग्रहीत करायचा राहिला नाही!" असे समाधानाचे उद्‌गार त्या समारंभात सरदारांनी काढले. त्यानंतर महिनाभराने ते बरेच आजारी पडले. काही दिवस ते घरीच निजून होते. औषधोपचार चालू केले होते. पण आजारपण वाढत गेले. दम्याचा जुना विकार बराच बळावला. शेवटी पुण्यातील अलका तो टॉकीजजवळच्या 'पूना हॉस्पिटल' मध्ये त्यांना ठेवण्यात आले. तिथे ते आठवडाभर होते. वैद्यकीय उपचारांची शिकस्त करण्यात आली. पण त्या उपचारांचा उपयोग झाला नाही.

दि. १ डिसेंबर १९८८ रोजी पुणे मुक्कामी सरदारांचे दुःखद निधन झाले.

**व्यक्तिमत्त्व**

अनुवंश, निसर्ग, काळ आणि परिस्थिती या चार घटकांच्या प्रभावांतून माणसाचे व्यक्तिमत्त्व घडत असते. सरदारांच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत या घटकांचा कसा व कितपत प्रभाव पडला, याचा शोध घेता येईल.

बालपणी सरदारांच्या मनावर त्यांच्या पित्याच्या व्यावसायिक नीतिमत्तेचा संस्कार झाला. त्यांचे वडील ठाणे जिल्ह्यातील 'जव्हार' या संस्थानाच्या छोट्या गावी सावकारी व दुकानदारी करीत असत. त्यांनी दुकानदारीचा व्यवसाय सचोटीने केला. माणुसकी सांभाळून सावकारी केली. कुळांना नाममात्र व्याजात पैसे पुरवून त्यांच्या जमिनी सोडवून दिल्या. आदिवासी विद्यार्थी वसतिगृह चालवले. धर्मशाळा बांधली. आदिवासी बांधव व्यसनमुक्त व्हावेत, यासाठी प्रयत्न केले. ते स्वभावाने शिस्तप्रिय व तडफदार होते. त्यांचे वर्तन सरळ होते आणि मन निर्मळ होते. वडिलांच्या या वृत्तीचे संस्कार सरदारांच्या बालमनावर निश्चितच झाले.

'निसर्ग' हा व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा दुसरा घटक होय. सरदारांच्या स्वभावाचे काही पैलू मूळचेच, म्हणजे नैसर्गिक होते. ते वृत्तीने संवेदनक्षम व चिंतनशील होते. "*दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पहातो।*" हे रामदासांचे वचन त्यांना पूर्णपणे लागू होते. शरीराने लोकान्तात असूनही मनाने ते बऱ्याच वेळा

एकान्तात असत. आर्जव व सहिष्णुता हे गुणविशेष तर त्यांच्या ठिकाणी जन्मजातच असावेत. वादाच्या धुमाळीतही त्यांचा आवाज चढत नसे किंवा त्यांच्या मनाचा तोल ढळत नसे. अपरिग्रह हाही त्यांचा अंगभूत गुण होता. कोणत्याही सन्मानाची, पदाची, सत्काराची किंवा धनलाभाची अपेक्षा त्यांनी स्वप्नात सुद्धा बाळगली नाही. ‘साधी राहणी आणि उच्च विचारसरणी’ त्यांच्या रक्तातच होती.

काळ’ या तिसऱ्या घटकाचाही परिणाम सरदारांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला असला पाहिजे. आपल्या संस्कारक्षम वयोदशेत त्यांनी देशाचे पारंतत्र्य पाहिले होते आणि त्यांचे चटके अनुभवले होते. पुण्यात महाविद्यालयीन शिक्षण घेताना सरदार आचार-विचारांनी गांधीवादी बनले होते. १९२५ च्या सुमाराचा तो काळ गांधीजींच्या विचारधारेने प्रभावित झाला होता. सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने विचार करता तेव्हाची तरुण पिढी फुले, आगरकर व रानडे यांच्या विचारांनी भारलेली होती. स्पृश्य आणि अस्पृश्य यांचे दसऱ्याचे एकत्रित सीमोल्लंघन, तात्त्विक विचारांना वळण देणारे गीतामंडळ, तसेच समाजाची सेवा करणारे शिवमंडळ यांची वैचारिक बैठक व कार्यपद्धती सरदारांनी आखली होती. १९३४ मध्ये एम. ए. होऊनही पुढील सहा वर्षे नोकरीच्या अभावी त्यांना घरी बसून काढावी लागली. तो काळच बेकारीचा होता. त्या रिकामपणाच्या काळात सरदारांनी भरपूर वाचन व सखोल चिंतन केले. व्यासंगाच्या दृष्टीने ते रिकामपण वरदान ठरले. सरदार ज्या कालखंडात वाढले आणि वावरले, त्या कालखंडाचा ठसा त्यांच्या व्यक्तिमत्वावर पडला.

‘परिस्थिती’ हा घटकही महत्त्वाचा आहे. सरदाराच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यात परिस्थितीने सुद्धा हातभार लावला. जव्हारला त्यांच्या घरची आर्थिक स्थिती चांगली होती ; पण आपली सुबत्ता आणि आसपासच्या आदिवासी बांधवांची हलाखी यांतील अंतर त्यांच्या मनाला बोचत असे.

सरदारांनी आपले प्राथमिक शिक्षण जव्हारला घेतले. त्यांचे माध्यमिक शिक्षण मुंबईत झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी म्हणून सरदार पुण्यात आले. त्यानंतर ते पुण्यातच स्थायिक झाले. पुण्यास येण्याऐवजी सरदार जव्हारला किंवा मुंबईस कायमचे राहिले असते, तर वेगळ्या वातावरणात त्यांचे जीवन व्यतीत झाले असते. पुण्यातील सामाजिक वातावरण आणि व्यावसायिक जीवन मुंबईपेक्षा बरेच वेगळे होते.

महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या महिला महाविद्यालयात सरदारांनी अठ्ठावीस वर्षे काम केले. महर्षी कर्वे यांचा स्त्रीशिक्षणविषयक ध्येयवाद, वामन मल्हारांचे अभिजात सौजन्य आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांचे मनोगत, या सर्व गोष्टींशी सरदारांचे मन सहजपणे समरस झाले. बालपणी जव्हारला आदिवासींचे करुणास्पद जीवन त्यांनी जवळून पहिले होते. त्या बांधवांचे दैन्य आणि दुःख पाहून सरदार मानाने व्यथित झाले होते. डॉ. सुधीर फडके हे जव्हारमधील त्यांचे बालमित्र समवयस्क व समविचारांचे होते. सामाजिक करुणाबुद्धीचे बीज त्यांच्या व सरदारांच्याही अंतःकरणात रुजले होते; सुप्तावस्थेत असलेले हे बीज सेवानिवृत्तीनंतर अंकुरित झाले. त्यातूनच दलितांचे जीवन आणि दलित साहित्य यांविषयी सरदारांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या दोन दशकांत विचारप्रवर्तक लेखन केले. दलित समाजातून पुढे आलेल्या नव्या दमाच्या लेखकांना व कवींना त्यांनी मार्दर्शन केले. दलितांच्या शिबिरांतून सहभागी होऊन भरीव स्वरूपाचे वैचारिक योगदान केले. सरदार ज्या परिस्थितीत वाढले, तिचा ठसा त्यांचा व्यक्तिमत्वावर कळत-नकळत उमटत गेला.

समाजमनस्कता हा सरदारांच्या समग्र साहित्याचा पृथगात्म गुणविशेष आहे. वडिलांची व्यावसायिक नीती, गावगाड्यातल्या विविध जातिजमातींमधला मित्रपरिवार, स्वा. सावरकर, म. गांधी आणि कार्ल मार्क्स

यांच्या वैचारिक वाङ्मयाचे वाचन, व्यासायिक स्थैर्य आणि संसारातील मनःस्वास्थ्य या सर्वांचा मेळ सरदारांच्या जीवनात बसत गेला.

या सर्व घटकांतून सरदारांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. त्यातूनच एक सहृदय, समाजसन्मुख, समतोल व साक्षेपी विचारवंत अशी त्यांची प्रतिमा सिद्ध झाली.

सरदारांचे बालपण ठाणे जिल्हयातील जव्हारसारख्या खेड्यात गेले होते. जव्हारच्या पंचक्रोशीत आदिवासी बांधव बहुसंख्येने आहेत. त्यांच्यातच सरदार वागले-वावरले. तसेच ब्राह्मण, मराठा, शिंपी, कुणबी, चांभार व मुस्लिम अशी विविध जातींची मुले त्यांच्या मित्रपरिवारात होती. सरदारांच्या घरात समतावादी विचारांचे वातावरण असल्यामुळे भेदाभेदांचा विचार त्यांच्या मनात कधीच आला नाही. स्पृश्यास्पृश्यतेचा प्रश्न त्यांच्या मनाला शिवला नाही. त्यांचे अनेक मित्र होतकरू व हुशार होते. पण घरच्या गरिबीमुळे त्या मित्रांची होत असलेली कुचंबणा सरदारांनी पहिली होती. आदिवासींच्या समस्यांवर लिहिणारे डॉ. सुधीर फडके यांनीही सरदारांप्रमाणे आदिवासींची ही कुचंबणा जाणवत होती. शंकर लोखंडे, भालचंद्र लोटलीकर, एकनाथ गडनेरकर अशा आपल्या अदिवसी मित्रांची दुःखे सरदारांनी जवळून पाहिली होती. आपल्या या मित्रांना सरदार म्हणाले होते, "तुम्हाला मी कधीच विसरणार नाही. संधी मिळेल तेव्हा तुमच्या भावना मी बोलून दाखवीन." शंकर लोखंडे हा त्यांचा आदिवासी मित्र अकाली निधन पावला. आपले एक पुस्तक सरदारांनी त्यांच्या स्मृतीला अर्पण केले आहे. बालपणी जव्हारला जी सामाजिक परिस्थिती सरदारांनी पाहिली, तिचा ठसा त्यांच्या मनावर उमटला. त्या जिवंत अनुभवातून त्यांना सामाजिक कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा मिळाली.

शाळेत शिकत असताना सरदारांनी स्वामी रामतीर्थ, रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांचे वाङ्मय वाचले होते. जव्हारचे दिवाण चिपळूणकर हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सासरे होते. सावरकर जव्हारला जात असत. त्यांच्यासंबंधीच्या रोमांचकारी कथा सरदारांनी बालपणी ऐकल्या होत्या. सावरकरांच्या विचारांनी सरदार काही काळ भारलेले होते. 'मी हिंदू म्हणून जगणार! या शीर्षकाची सरदारांची कविता 'श्रद्धानंद' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली होती.

सावकारांच्या संस्कृतिनिष्ठ राष्ट्रवाद व गांधीजींचा लोकसन्मुख ध्येयवाद यांतील द्वंद्व तरुणपणी आरंभकाळात सरदारांच्या मनात निर्माण झाले होते. पण त्यांची मनःप्रवृत्ती गांधीवादाला अधिक अनुकूल असल्यामुळे ते अखेरीस तिकडेच वळले. महाविद्यालयात शिकत असताना कुडता व पंचा असा पोशाख करून ते अनवाणीसुद्धा जात असत. पुढे मार्क्सवादाचे त्यांनी वाचन केले. देवाधर्मावरची त्यांची श्रद्धा नाहीसी झाली. हळूहळू सरदार गांधीवादाकडून साम्यवादाकडे वळत गेले. १९३० ते १९४२ या काळात त्यांच्या मनावर गांधीवादाचा मोठाच प्रभाव होता. 'रणशिंग फुंकिले कुणी, स्वातंत्र्य महायुद्धाचे?' ही त्यांची कविता दि. ५ एप्रिल १९३० च्या 'केसरी' मध्ये प्रसिद्ध झाली होती. पण देशातील बदलत्या परिस्थितीत गांधीवाद कुठेतरी कमी पडत आहे, असे त्यांना जाणवू लागले. मार्क्स व एंगल्स यांच्या विचारधारा समजून घेण्यासाठी डॉ. सुधीर फडके आणि प्रा. नलिनी पंडित यांच्याशी त्यांनी साम्यवादी तत्त्वज्ञानावर अनेक चर्चा केल्या. साम्यवादी भूमिकेतून सामाजिक प्रश्नांचा व धार्मिक दृष्टिकोनाचा विचार करायला त्यांनी आरंभ केला. संतवाङ्मयाच्या सामाजिक फलश्रुतीचा त्यांनी घेतलेला शोध या अभ्यासातून सिद्ध झाला आहे. मात्र 'महाराष्ट्रातील संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य' विशद करून मांडणाऱ्या बा. रं. सुंठणकरांप्रमाणे सरदार

साम्यवादाच्या आहारी गेले नाहीत. मार्क्सची ऐतिहासिक वस्तुवादी मीमांसा मांडताना भारतीय परिस्थितीचे संदर्भ सरदारांनी सतत डोळ्यापुढे ठेवले आहेत.

तीस सालच्या सत्याग्रहात सरदार सहभागी झाले होते. पण सक्रिय राजकारण हा आपला पिंड नसल्याचे लवकरच त्यांच्या ध्यानात आले. त्यामुळेच त्यांनी वैचारिक व्यासपीठावरून समाजप्रबोधन करण्याचे उद्दिष्ट हे आपले जीवितकार्य म्हणून ठेवले.

१९०८ ते १९८८ असे ऐंशी वर्षाचे दीर्घायुष्य सरदारांना लाभले. १९४१ ते १९६८ अशी अठ्ठावीस वर्षे पुण्यातील ठाकरसी महिला महाविद्यालयात त्यांनी मराठीचे अध्यापन केले. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, श्री. म. माटे. रा. श्री. जोग. न. र. फाटक, वा. ल. कुळकर्णी व वि. भि. कोलते हे व्यासंगी व ख्यातनाम असे मराठीचे प्राध्यापक सरदारांचे साधारणपणे समकालीन होते. सरदारांचा व्यासंग व अधिकार या सर्व प्राध्यापकांच्या तोलामोलाचा होता. महिला महाविद्यालयातील वामन मल्हार जोशी, कमलाबाई देशपांडे, रा. कृ. लागू आणि डॉ. वा. दा. गोखले हे त्यांचे सहकारी- प्राध्यापक नामवंत अभ्यासक व अध्यापक म्हणून प्रसिद्ध होते. त्या सर्वांचे प्रेम व सहकार्य सरदारांना लाभले. त्यांच्या काही थोड्या विद्यार्थीनींनी पुढे साहित्यक्षेत्रात नावलौकिकही मिळवला. पण पु. ग. सहस्त्रबुद्धे, रा. श्री. जोग किंवा वा. ल. कुळकर्णी यांना आपल्या विद्यार्थ्यांची परंपरा (किंवा ‘स्कूल्स’) जशी लाभली, तशी ती सरदारांच्या वाट्याला आली नाही. आपली ही खंत खाजगी संभाषणात सरदार बोलूनही दाखवीत असत. गुणी विद्यार्थीनीसुद्धा पुढे प्रपंचात गढून जातात, आपली ‘करिअर’ त्या निर्माण करू शकत नाहीत, हे सरदारांना जाणवत अस. आपल्या स्वतःच्या घरीच हुशार विद्यार्थ्यांची व महत्त्वकांक्षी युवकांची अनौपचारिक अभ्यासमंडळे चालवून ही उणीव सरदारांनी भरून काढली. दि. के. बेडेकर या समविचारी प्रज्ञावंत सन्मित्राचा सहवास हा सरदारांच्या विचारविश्वातला मोठाच विरंगुळा होता. या सहवासाचा सरदारांच्या समाजचिंतनावर लक्षणीय प्रभाव पडला होता.

सरदारांनी केलेल्या ज्ञानप्रसाराच्या कार्याचे स्वरूप दि. के. बेडेकर यांनी आपल्या लेखातून विशद केले आहे. [‘साहित्यकार आणि समाजचिंतन :’ संपादक : भा. शं. भणगे, १९६८, पृ. ४२८-४३३] लोकहितवादी, रानडे, टिळक व आगरकर यांच्या कार्यपद्धतीचा आदर्श सरदारांच्या पुढे होता. त्याचबरोबर ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम अशा संतांचा आदर्शही त्यांनी अंगीकारला होता. गांधीप्रणीत आंदोलनाचा व तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांचा मनावर होता. त्यामुळे केवळ आपल्या आवडत्या विषयांचे संशोधन करीत राहणे त्यांना मानवले नाही. ज्ञानाचे लोण सामजिक परिस्थितीचा अनुबंध राखून लोकमानसापर्यंत पोचविणे महत्त्वाचे आहे, हे त्यांनी मनोमन मानले. ज्या लोकांसाठी ज्ञानाचा प्रसार करायचा, त्यांच्याबद्दल दृढ श्रद्धा हवी, अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांच्या लेखनात सात्त्विक संयम आढळतो.

आपले अध्यापनाचे कार्य सरदारांनी जबाबदारीने पर पाडले. त्याशिवाय अभ्यास मंडळे व शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांनी विविध मतप्रणालींची जीज्ञासूंना ओळख करून दिली; ते करताना भारतीय परिस्थितीचा संदर्भ त्यांनी सतत सांभाळला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यातही त्यांनी भाग घेतला. त्यावेळी वाङ्मयेतीहासाच्या प्रश्नावर जो संघर्ष झाला, त्या सरदारांना तत्त्वनिष्ठेसाठी वाईटपणा पत्करावा लागला. शासकीय पातळीवर चाललेल्या भाषाविषयक कार्यात सरदारांनी भाग घेतला. शासनाच्या ‘भाषा सल्लागार मंडळ’ चेही ते सभासद होते. भौतिक शास्त्रे, सामाजिक शास्त्रे व मानव्य विद्या यांच्या अभ्यासासाठी या मंडळाने पारिभाषिक संज्ञांचे कोश सिद्ध केले. त्या सिद्धीत सरदारांचा मोठाच सहभाग होता. विद्वत्तेला

विनयाची जोड हवी, तसेच विद्वान हा निस्पृह असला पाहिजे. सरदारांच्या अंगी हे दोन्ही गुण होते. त्यामुळेच 'ते ज्ञानप्रसारकांपुढील एक आदर्श होते' हे बेडेकरांचे मत सार्थ ठरते.

संस्कारक्षम वयात सरदारांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी होत गेली, याचा आलेख त्यांचे मित्र डॉ. सुधीर फडके यांनी सुरेख शब्दांकित केला आहे. फडके लिहितात, 'देशात त्यावेळी चालू असलेल्या घडामोडींकडे आस्थेने पहाणाऱ्या सरदारांच्या मनावर राष्ट्रीय चळवळींचे नेतृत्व करणाऱ्या महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव पडू लागला. १९२१ सालचा सविनय कायदेभंगाचा लढा स्थगित करून गांधींनी खादी, ग्रामोद्योग, अस्पृश्यतानिवारण इत्यादी कार्यक्रमांवर जनतेचे लक्ष केंद्रित करण्याचे कार्य सुरु केले होते. जव्हारच्या संस्थांनी प्रजेत कोणतीही राजकीय चळवळ करणे आम्हांला शक्य नव्हते. अशा वेळी आमच्या तरुण उत्साहाला व संतापाला सामाजिक सुधारणांच्या विधायक चळवळीकडे वळविण्याचे महत्वाचे कार्य अण्णासाहेबांनी त्यावेळी केले. सीमोल्लंघनाच्या निमित्ताने स्पृश्यास्पृश्यांनी एकत्र येऊन सोने वाटणे, तसेच मंदिरात नाही, तरी मंदिराच्या पडवीत प्रवेश देणे, गीता-मंडळ व शिव-मंडळ चालविणे, अशा गोष्टींचे पुढारीपण जरी माझ्यासारख्या संतप्त तरुणाकडे होते, तरी त्यांच्या मागची खरी प्रेरक शक्ती व वैचारिक बैठक अण्णासाहेबांची होती. त्यामुळे कॉलेजला सुट्टी केव्हा होते व ते गावी परत केव्हा येतात, याची आम्ही मित्रमंडळी वाट पाहत असू. बाहेरच्या जीवनात मिळालेल्या अनुभवातून तयार झालेल्या विचारांचे लोण ते आमच्यापर्यंत आणून पोचवित असत.... कॉलेजच्या जीवनात अण्णासाहेबांनी गांधीवादाचा स्वीकार नुसत्या विचारातच केला असे नसून, तो आचरणात पण आणायला सुरुवात केली होती. अंगात खादीचा एक कुडता, गुडघ्यापर्यंत पंचेवजा धोतर व अनवाणी राहणे, इतक्या त्यांनी स्वतःच्या गरजा कमी करून ठेवल्या होत्या. त्यांनी पायात चप्पल घालावी व पंचाची रुंदी चार बोटे वाढवून त्याला धोतराची प्रतिष्ठा द्यावी म्हणून आम्हा मित्रांना त्यांच्याच सत्याग्रहाच्या हत्याराचा उपयोग करावा लागत होता- वैयक्तिक संबंधात त्यांचा स्नेह हा एक दुर्मिळ ठेवा आहे.' ['साहित्यकार आणि समाजचिंतन' , १९६८, पृ. ४१८-४२५]

जगाच्या अज्ञात भूप्रदेशाचे संशोधन रानावनांतून व दऱ्याखोऱ्यांतून वाट काढीत काढीत शेवटी एखाद्या प्रचंड पर्वतावरील विस्तृत पठारावर येऊन पोचतात. तिथून त्यांना मानवी जीवनाचा भव्य पसारा पाहायला मिळतो. तसाच काहीसा अदभूत अनुभव व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणाऱ्या अभ्यासकाला येतो. व्यक्तीच्या दर्शनी तऱ्हेतील व एकंदर वर्तनातील सर्व बाह्य आविष्कार आणि तिच्या आंतरिक भावभावना यांचा समावेश व्यक्तिमत्त्वात होतो. हा विचार दोन रीतींनी करता येतो. इतरांना ती व्यक्ती कशी दिसते, याचा विचार पहिल्या रीतीत येतो. शरीरयष्टी, वर्ण, वृत्ती, आवाज, अविर्भाव, पोषाख इत्यादी गोष्टींवर समाजातील इतर माणसे त्या व्यक्तीला कसा प्रतिसाद देतील, हे काही अंशी ठरते. व्यक्तिमत्त्वाच्या दुसऱ्या बाजूचा संबंध व्यक्तीच्या बौद्धिक, भावनात्मक व सामाजिक विकासाकडे येतो. व्यक्तीचे स्वतःकडे व इतरांकडे पाहण्याचे दृष्टिकोन, जगाविषयीची तिची वृत्ती, जीवनदृष्टी, आकांक्षा व अभिरुची या सर्वांचाच समावेश व्यक्तीमत्त्वात होतो.

सरदारांचे बाह्यरूपदर्शन साधे व सत्वसंपन्न होते. उंची साडेपाच फूट, अंगलट काहीशी स्थूल, चेहरा वाटोळा, जिवणी संभाषणास उत्सुक अशी वाटणारी, वर्ण तांबूस-निमगोरा, डोळे तेजस्वी व बोलके, कपाळ रुंद व एकूण शरीरयष्टी भारदस्त, असे त्यांचे दर्शन घडे. त्यांची वृत्ती कमालीची शांत व प्रसन्न असे. त्यांच्या आवाजाला एक विलक्षण ताल व तोल होता. वयाने किंवा विद्वत्तेने लहान-मोठ्या अशा सर्वांशीच ते समरस होऊन बोलत असत. त्या बोलण्यात आधी विचार व मग उच्चार असा क्रम आहे, हे जाणवे. खाजगी गप्पागोष्टी किंवा संभाषण करण्यात ते मनापासून एकरूप होत असे. माडीवरील त्यांची बैठकीची खोली साधारणपणे

दहा फूट रुंद व चौदा फूट लांब अशी होती. त्या खोलीच्या रस्त्याकडील बाजूला तीन फुट रुंद व पाच फुट लांब अशी गॅलरी होती. सरदार एकटेच असले म्हणजे आरामखुर्चीत पहुडत किंवा गॅलरीच्या कठड्याला हात टेकून उभे असत. त्यांच्या मनात अखंड कोणते न कोणते चिंतन चालू आहे, हे आपण सहज त्यांच्याकडे पाहिले तरी ध्यानात येत असे. 'तुका म्हणे होय मनाशी संवाद। आपुलाची वाद आपणासी,' या तोलाचे हे चिंतन असे.

सरदारांची राहणी अगदी साधी असे. बैठकीच्या खोलीत मधोमध एक छोटे पार्टिशन असे. त्यांच्या पलीकडे भिंतीला लागून टेबल-खुर्ची, निवडक पुस्तके व लेखन-साहित्य असे. त्यांच्याकडील भेट लक्षात राही, ती त्यांच्याशी झालेल्या संभाषणामुळे. या संभाषणात आपली भूमिका अनेकदा जिज्ञासूची किंवा प्रश्नकर्त्याची असे. प्रश्नाचा छोटाही धागा पुरेसा असे. तोच उचलून त्याच्याशी सुसंगत व सविस्तर अशा विणीने विचारवस्त्र सरदार गुंफून टाकीत असत. त्यांचे ते जणू प्रगट चिंतनच असे. ढगांचे पडदे दूर होऊन पूर्ण चंद्राचे धवलदर्शन व्हावे तसे आपल्या शंकांचे पटल नाहीसे होऊन, काही नवा चैतन्यमय विचार समजल्याचा प्रत्यय आपल्याला येत असे. त्यांचा विचारधारेत अशी ऊर्जा असे की बॅटरी चार्ज करावी, तशी आपली प्रज्ञा पल्लवित होत असे.

सभा –संमेलनांतून चर्चा असो किंवा व्याख्यान असो, सरदारांची रसवंती बहरून येई, खरोखरच ते वागीश्वर होते. संथ, शांत व धीम्या लयीत ते बोलायला आरंभ करीत. हळूहळू त्यांच्या शब्दांना एक विलक्षण लय व तेज प्राप्त होई. विचारांच्या आवर्तात ते स्वतः शिरत व श्रोत्यांनाही आपल्याबरोबर घेऊन जात. काठाकाठाने पोहणाऱ्या नवशिक्या माणसाला त्याच्या शिक्षकाने आधार देऊन खोल पाण्यात न्यावे, तसा सरदारांच्या व्याखानाचा बाज असे. वक्ता व श्रोता यांच्यामध्ये एक अनाम, अबोध पण उत्कट नाते जुळून येई. '*हृदया हृदय मिळालें। ये हृदयींचे तें हृदयीं घातलें*,' अशी त्यांची वक्तृत्वशैली होती. '*सुज्ञेंही ऐकताचि डोलावें। ऐसेंचि बोलणें जरि, तरि मानुजानें दहांत बोलावें।* या उक्तीची आठवण व्हावी, अशा वैचारिक उंचीवरून त्यांचे व्याख्यान होत असे.

सरदारांच्या व्यक्तिमत्वाच्या या बाह्य आविष्काराशी सुसंगत असेच त्यांचे आंतरिक जीवन होते. ज्ञानेश्वरांच्या तेराव्या अध्यायात अमानित्व, शांती, आर्जव, शुचित्व स्थैर्य, अनहंकार, असक्ती, समचित्तत्व, अ-रती इत्यादी ज्ञानाची अठरा लक्षणे ज्ञानदेवांनी सांगितली आहेत. सरदारांच्या विचारात आणि आचारात त्यातील अनेक गुणांचा आढळ होत असे.

सरदारांच्या निरिच्छ व निःस्पृह वृत्तीविषयी एक घटना नमूद करण्याजोगी आहे. 'महाराष्ट्र जीवन 'या, सरदारांनी संपादिलेल्या ग्रंथाच्या दोन्ही खंडांचे प्रकाशन, तेव्हाचे मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते १९६० मध्ये झाले. जोशी-लोखंडे प्रकाशन संस्थेचे संचालक नानासाहेब जोशी यांनी समारंभाच्या आधी चहापान ठेवले होते. आम्ही पाच-सहा निवडक मंडळी जमलो होतो. त्या वेळी यशवंतरावांनी मोठे समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, 'सरदार, महाराष्ट्राच्या ज्ञानकरणाला योग्य दिशा मिळावी, असे मला मनापासून वाटते. तर्कतीर्थांच्या अध्यक्षतेखाली 'साहित्य संस्कृति मंडळ' सुरु झाले आहे. अशा प्रकारचे दुसरे एखादे कोणते उपयुक्त काम हाती घेता येईल का?' त्यावर सरदार म्हणाले "राजकीय अंगाने महाराष्ट्राचा इतिहास लिहिला गेला आहे. वाङ्मयेतिहासाचे ग्रंथही बरेच आहेत. पण महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास उपलब्ध नाही. त्या प्रकल्पाची फार मोठी गरज आहे."

अनुक्रमणिका

यशवंतरावांना सरदारांची हि सूचना एकदम पसंत पडली. 'तुम्ही ते काम हाती घ्या. त्यासाठी स्वतंत्र विभाग मी उघडून देतो. तुम्ही त्याचे संचालक व्हा. सरकारीही तुमचे तुम्ही निवडा, माझा पूर्ण पाठिंबा राहील' , असे यशवंतरावांनी सांगितले. त्यावर एका क्षणाचाही विलंब न लावता सरदार त्यांना म्हणाले, "कुणीतरी ही जबाबदारी घेतली पाहिजे, हे तर खरंच आहे. पण ही जोखीम मला पेलणार नाही. शासकीय चाकोरीत राहून काम करण्याची मला सवय नाही. याला आणखी एक कारण आहे. गतकाळचा सामाजिक संदर्भ शोधात बसण्याऐवजी समाजाच्या भविष्यकालीन जडण-घडणीत मला अधिक रस आहे. खेड्यापाड्यातल्या आणि तळागाळातल्या आपल्या बांधवांच भविष्य उजळलं पाहिजे, याचा मला ध्यास आहे. उत्तरायुष्यात त्या दिशेनं काही करावं, असा संकल्प मी केला आहे. आपण मला माफ करा!"

शासकीय सन्मानाचा हा राजयोग सरदारांनी सहजपणानं डावलला. त्यात त्यांची निरिच्छता जशी दिसून येते. तशीच त्यांच्या प्रबोधनकार्याची चाहूलही इथं लागते. पण यशवंतरावांचा प्रस्ताव त्यांनी नाकारला, त्याला तिसरेही एक कारण होते. त्यांच्या सौजन्यापोटी निर्माण झालेले ते अंतस्थ कारण होते. द्विखंडात्मक 'महाराष्ट्र जीवन 'हा ग्रंथ रीतसर प्रकाशित झाला. त्यानंतर दोनच दिवसांनी सरदार माझ्या घरी आले होते. ग्रंथाविषयी बोलणे निघाले. ग्रंथाच्या दुसऱ्या भागात 'प्रादेशिक बोली आणि लोकभाषा' हा डॉ. गा. गो. कालेलकरांचा लेख आहे. त्यातील पृ. २०६ वरील पुढील मजकूर सरदारांना मी वाचून दाखविला—

'केवळ पाणिनीचे व्याकरण मुखोद्‌गत असले आणि संस्कृतवर प्रभुत्व असले म्हणजे भाषाशास्त्र लिहिता येते, ही समजूत आता मागे पडली आहे. पण राजवाड्यांच्या इतका व्यासंग नसलेले आणि भाषाशास्त्राचे मुळीच ज्ञान नसता, भाषाशास्त्रज्ञ म्हणून ख्यातनाम झालेले, त्यांच्याच परंपरेतील श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनी पुष्कळ लेखन केलेले आहे. पण त्यातले कोणतेही, काहीही किमतीचे नाही, असे निश्चितपणे म्हणता येते.'

त्यानंतर मी सरदारांना म्हणालो, प्रा. श्री. कृ. पां. कुलकर्णी यांनी 'पुष्कळ लेखन' केलेले आहे ही कालेलकरांनी केलेली 'भलावण' बरोबरच आहे. त्यापैकी 'मराठी भाषा : उद्‌गम आणि विकास' तसेच 'मराठी व्युत्पत्तीकोश' या दोन ग्रंथांची उपयुक्तता वादातीत आहे. ग्रंथांच्या गुणवत्तेविषयी कुणाचाही साधार मतभेद असायला हरकत नाही. पण भाषाशास्त्रीय अभ्यासातील त्यांचे ऐतिहासिक महत्त्व तरी मान्य करावेच लागेल. 'त्यातले कोणतेही काहीही किमतीचे नाही 'ही कोपरखळी अकारण आहे; अनुदारपणाची आहे. त्यात औचित्यविवेक नाही, असं मला वाटतं. ग्रंथाचे प्रमुख संपादक या नात्यानं तुम्ही त्या, तेवढ्या मजकुराचं संस्करण करायला हवं होत.' सरदार त्यावर मनमोकळे म्हणाले, "तुम्ही सांगताय, ते अगदी बरोबर आहे. मलाही ते अप्रस्तुत मत खटकलं होतं. पण कालेकरांना तसं सांगण्यात मला संकोच वाटला. या प्रसंगाने मी एक निर्णय मनाशी घेतला आहे. अनेकांच्या लेखांचं संपादन करून, तसा लेखसंग्रह आपण यापुढे काढायचा नाही, असं मी ठरवलं आहे." - सरदारांचं हे चांगुलपण म्हणजे एका अर्थाने दुबळेपण आहे, असे मात्र त्यावेळी माझे मत झाले.

'सेवाधर्म गहन असतो' , असे म्हणतात. पण महिला विद्यापीठाच्या सेवेत असताना सरदारांच्या स्वभावातील निर्भयपणा आणि बाणेदारपणा या गुणांचेही दर्शन झाले. महिला विद्यापीठाचे एक 'जर्नल' काढण्याचे विद्यापीठीय अधिकाऱ्यांनी जानेवारी १९६५ मध्ये ठरविले. प्रमुख संपादक म्हणून सरदारांकडे विद्यापीठाने ते काम सोपविले. पण त्यानंतर त्यावेळच्या अधिष्ठात्या बाईंच्या सूचना सरदारांकडे वरचेवर

जाऊ लागल्या. सरदारांना तो हस्तक्षेप आवडला नाही. त्या संदर्भात त्यांनी मुंबईतील महिला महाविद्यालयाचे प्राचार्य द. शं. फाटक यांना दि. २८-२-१९६५ रोजी पुढील पत्र पाठविले ; "कार्यकारी संपादकाने तज्ज्ञांच्या सहाय्याने लेखांची निवड करावी आणि याबाबतीत त्यांचा निर्णय अखेरचा राहावा, असा संकेत आहे. एकदा धोरण ठरवून दिल्यानंतर विद्यापीठातील वरिष्ठांनी दैनंदिन कामात मुख्य संपादकाला पूर्ण स्वातंत्र दिले पाहिजे. तरच काम निट होऊ शकेल. अन्यथा हे काम दुसऱ्या कोणाकडेही सोपविण्यास माझी हरकत नाही. पेचप्रसंग टाळण्याचीच माझी इच्छा आहे. पण हे कसे जमणार, तोच प्रश्न आहे. समक्ष बोलताना अधिकउणा शब्द जाऊ नये, अशी माझी इच्छा आहे."

सरदारांच्या या पत्राचा उपयोग झाला. प्राचार्य फाटक सरदारांचा मोठेपणा जाणून होते. त्यांनी अधिष्ठाता बाईंना सरदारांचे म्हणणे पटवून दिले. सरदारांना पूर्ण स्वातंत्र्य मिळाले.

दुसरी आठवण 'लेडी प्रेमलीला ठाकरसी गौरव ग्रंथा' च्या संदर्भातील आहे. लेडी ठाकरसी यांच्याविषयी सरदारांनी लेख लिहावा, अशी त्यांना विनंती करण्यास प्राचार्य फाटकांना सुचविण्यात आले होते. त्याप्रमाणे फाटकांनी सरदारांना विनंती केली. त्यावर दि ७ जून १९६६ रोजी फाटकांना पाठविलेल्या पत्रोत्तरात सरदार लिहितात, "गेली वीस-पंचवीस वर्षे, गांधी-नेहरूसारखे युगप्रवर्तक लोक सोडल्यास, कोणत्याही गौरव—ग्रंथात मी लेखन केलेले नाही. मी सार्वजनिक जीवनात काही विचार सुसंगतपणे मांडीत आलो आहे. त्या माझा विचारांना खंबीर नैतिक अधिष्ठान हवे, म्हणून मी पथ्य कसोशीने पाळले आहे. संस्था, आंदोलने व तत्त्वप्रणाली यांवर मी लिहितो ;पण व्यक्तींवर लिहित नाही. तेव्हा आपण या बाबतीत मला क्षमा करावी. जीवनात कितीही किमंत द्यावी लागली, तरी तत्त्वच्युती न पत्करण्याची माझी प्रवृत्ती आहे. आपण कुलसचिवांना माझी भूमिका समजावून द्याल अशी मला खात्री आहे. माझी आपणांस तशी विनंती आहे."

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत महिला विद्यापीठाला मराठीच्या प्रपाठकाची एक जागा 'विद्यापीठ अनुदान आयोगा' ने दिली होती. सरदार १९४१ मध्ये पुण्यातील महिला महाविद्यालयात मराठीचे व्याख्याते म्हणून नोकरीस लागले होते. त्यांची पंचवीस वर्षाची दीर्घ सेवा व साहित्यनिर्मिती विचारात घेऊन, जाहिरात न देता, मराठीचे प्रपाठक म्हणून विद्यापीठाने १९६५ मध्ये त्यांची नियुक्ती केली होती. आठवड्यातील पाच दिवस पुण्यातील महाविद्यालय आणि एक दिवस मुंबईस महिला विद्यापीठात, असे सरदार काम पाहू लागले

'मोडेन पण वाकणार नाही,' हा मराठी बाणा सरदारांनी सेवेच्या अखेरच्या पर्वातही कायम ठेवला होता. दि २ ऑक्टोबर १९०८ हा त्यांचा जन्मदिनांक होता. २ ऑक्टोबर १९६८ रोजी त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होणार होती. तोपर्यंत रीतसरच महिला विद्यापीठाच्या पुण्यातील (घटक) महाविद्यालयात ते काम करू शकत होते. पण त्यानंतरही एकेक वर्षाची मुदतवाढ मिळून वयाच्या पासष्टाव्या वर्षाच्या अखेरपर्यंत काम करता येण्याची त्या काळात सोय व सवलत होती.

चौथ्या पंचवार्षिक योजनेत विद्यापीठ अनुदान आयोगाने महिला विद्यापीठाला मराठीच्या प्राध्यापकाची एक जागा दिली. त्या वेळी जाहिरात देऊन प्राध्यापकाची जागा भरण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. तेव्हा सरदारांनी प्रपाठक पदाचाही राजीनामा दिला. मुंबईस दि. २ एप्रिल १९६८ रोजी प्राचार्य द. शं. फाटक यांना पाठविलेल्या पत्रात सरदार लिहितात, "आजच मी तीन महिन्यांच्या पूर्वसूचनेसह माझे त्यागपत्र महाविद्यालयाकडे दिले आहे. सेवानिवृत्त प्राध्यापकांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे काही प्रकल्प आहेत, असे आपण मला कळविले आहे. मी त्याबद्दल आपला फार आभारी आहे. माझ्यापुढे कामाची

काही योजना आहे. तिच्यावर सर्व लक्ष व शक्ती केंद्रित करण्याचा माझा विचार आहे. तेव्हा विद्यापिठ अनुदान आयोगाकडून निवृत्त प्राध्यापकाला मिळणारे मानधन घेण्याची माझी इच्छा नाही. आपण ते कागदपत्र मजेकडे धाडू नयेत. मात्र अगत्यपूर्वक केलेल्या विचारणेबद्दल मी पुन्हा आपले आभार मानतो."

सरदारांचे हे पत्र त्यांच्या बाणेदार व स्वाभिमानी वृत्तीचे द्योतक आहे. वास्तविक अडुसष्ट साली त्यांची आर्थिक स्थिती फार चांगली होती, असे नव्हे. त्यांचा गृहपरिवार मोठा होता. पैशाची गरज होती. विद्यापीठाच्या जाहिरातीनुसार त्यांनी अर्ज केला असता, तर निवड त्यांचीच झाली असती, यात संदेह नाही. त्यांना होणारा पावसाळ्यातला दम्याचा थोडा त्रास वजा केला तर त्यांची प्रकृती तशी चांगली होती. प्राध्यापक म्हणून पाच वर्षे ते सुखाने काम करू शकले असते. त्यानंतरही विद्यापीठ अनुदान आयोगाचे मानधन त्यांना मिळत राहिले असते. पण उभ्या आयुष्यात नोकरीसाठी किंवा नोकरीतील पदोन्नतीसाठी त्यांनी कुठेही अर्ज केलेला नाही. एक उमेदवार म्हणून कुणापुढेही मुलाखतीसाठी ते उभे राहिले नाहीत. ज्या तत्त्वनिष्ठेसाठी त्यांनी हयातभर आपली वाणी आणि लेखणी झिजवली, त्या तत्त्वनिष्ठेचे उपयोजन आपल्या आयुष्यात प्रत्येक कसोटीच्या प्रसंगी त्यांनी खंबीरपणे केले. 'बोले तैसा चाले' ही तुकोबांची उक्ती त्यांना पूर्णपणे लागू होती.

[टीप १ : (कै.) प्राचार्य द. श. फाटकांचे पत्र, तसेच सरदारांची तीन पत्रे प्रस्तुत लेखकाच्या संग्रही आहेत. ]

अनुक्रमणिका

# २.
# अव्वल इंग्रजीतील गद्याचे मूल्यांकन

‘अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका’ (१९३७), हा सरदारांचा पहिलाच ग्रंथ. तसेच त्यांचा संशोधनपर असा हा एकमेव ग्रंथ आहे.

संशोधन दोन प्रकारचे असते. पूर्वज्ञात नसलेली एखादी संहिता प्रथमच प्रकाशात आणणे व लोकांना ती नव्याने उपलब्ध करून देणे, हा संशोधनाचा एक प्रकार होय. ‘क्रिस्तांचे यातनागीत’ हे बाड प्रा. अ. का. प्रियोळकरांनी प्रयत्नपूर्वक मिळविले व ते साक्षेपाने संपादून प्रकाशित केले. हे त्यांचे संशोधनकार्य आहे. तसेच तुकाराम महाराजांच्या मुद्रित, सांप्रदायिक गाथेत नसलेले काही अभंग कोणाला एखाद्या जुन्या बाडात आढळले व त्यांची संहिता – निश्चिती करून ते त्याने प्रसिद्ध केले, तर तेही संशोधनच होय.

संशोधनाचा दुसराही एक प्रकार आहे तो म्हणजे, आधीच उपलब्ध असलेल्या ग्रंथातील वा लेखातील आशयाचा व त्यातील विचारसरणीचा काही नवा अन्वयार्थ लावून दाखविणे; त्याचे स्वतंत्र ‘इंटरप्रिटेशन’ करणे हा होय. ‘ज्ञानेश्वरी ही केवळ तत्त्वविवेचानासाठी लिहिलेली नसून हा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरांच्या विदग्ध रसवृत्तीचा विलास आहे’ . हा दृष्टिकोन संशोधनात्मकच म्हटला पाहिजे.

इसवी सन १८०० ते १८७४ या अव्वल इंग्रजीच्या कालखंडात मराठी वाङ्मयामध्ये जे विविध ग्रंथ प्रसिद्ध झाले, त्यांचा परामर्श सरदारांनी येथे घेतलेला आहे. अव्वल इंग्रजीतील दुर्मिळ पुस्तकांचा व अपरिचित लेखकांचा शोध घ्यावा आणि त्यातून हाती आलेली माहिती संकलित व सुसंगत स्वरुपात वाचकांपुढे ठेवावी, अशी सरदारांची भूमिका आहे. कथात्मक साहित्य, नाटक, निबंध, समाजचिंतन, इतिहास, चरित्र इत्यादी प्रकारांबरोबर अन्य क्षेत्रांतील साहित्याचाही परिचय यात करून दिलेला आहे. त्यात धर्म, नीती, तत्त्वज्ञान, शास्त्र, व्यवसाय, कला तसेच ख्रिस्ती वाङ्मय, संकीर्ण वाङ्मय व नियतकालिके यांचाही आढावा सरदारांनी घेतला आहे. शेवटी कोशसूची, ग्रंथसूची, लेखसूची, व्यक्तिनाम –सूची व संस्था –सूची अशा उपयुक्त सूची दिलेल्या आहेत.

पूर्वपीठीकेचा विचार करताना देशातील मुद्रणकलेचा इतिहास लक्षात घ्यायला हवा, हे सरदारांनी आवर्जून सांगितले आहे. एका खिस्ती धर्मप्रसारक मंडळीने श्रीरामपूर येथे इ. स. १८०० मध्ये स्वतःचा छापखाना काढला. त्यानंतर मुद्रणकलेचा प्रसार हळूहळू होत गेला. त्यामुळे पद्यरचनेची प्रथा मागे पडून गद्यरचनेची प्रवृत्ती वाढली. खिस्ती धर्मप्रसारकांनी इथल्या पंडितांची मदत घेऊन चाळीस भाषांत बायबलची भाषान्तरे प्रसिद्ध केली. त्याशिवाय मराठी भाषेचे व्याकरण, सिहासन-बत्तीशी, पंचतंत्र, हितोपदेश इत्यादी बारा ग्रंथ श्रीरामपूर, मिशनतर्फे प्रसिद्ध करण्यात आले. डॉ. केरी, कर्नल केनेडी व काही महाराष्ट्रीय पंडीत यांच्या प्रयत्नांतून महाराष्ट्र भाषेचा कोश प्रसिद्ध झाला. संस्कृत ग्रंथ व इंग्रजी ग्रंथ यांची मराठी भाषान्तरे होऊ लागली. या संदर्भात बॉम्बे बुक अँड ट्राक सोसायटी, ज्ञानप्रसारक सभा, दक्षिणा प्रैज कमिटी अशा संस्थांचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत. ज्योतिष, वैद्यक, शिल्प, रसायन, नौकानयन इत्यादी शास्त्रांतील विषयांवर भाषान्तरवजा पुस्तके प्रकाशित झाली. वृत्तपत्रसृष्टीत ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश व इंदुप्रकाश या नियतकालिकांनी भारदस्त लेख प्रसिद्ध करून मराठी गद्याला वळण लावले.

अनुक्रमणिका

१८५७ ते १८७४ हा दुसरा टप्पा आहे. मागील एकवीस वर्षांच्या काळात मराठी भाषेमध्ये मुख्यतः शालोपोयोगी व शास्त्रीय ग्रंथ प्रसिद्ध झाले. या सतरा वर्षांच्या काळात कथा, कादंबरी, नाटक अशा ललित वाङ्मयाच्या निर्मितीला आरंभ झाला. इतिहास, व्याकरण, कोश, धर्म, नीती, तत्त्वज्ञान व शास्त्र या विषयांवरील ग्रंथही अल्पस्वल्प निघाले. विविधज्ञानविस्तार, दंभहारक, ज्ञानसंग्रह व पुणे पाठशाला पत्रक या मासिकांनी, तसेच 'ज्ञानोदय' , 'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्रांनी गद्याच्या विकासाला मदत केली.

एकोणीसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भाषान्तरासाठी निवडलेले इंग्रजी साहित्य सामान्य प्रतीचे होते. "वाघिणीचे दूध पचविण्याची शक्ती आमच्या अंगी तेव्हा नव्हती, म्हणून हे घडले असावे.", असे सरदार सांगतात. मात्र "बाल्यावस्थेतील हे मराठी गद्य सदोष असले तरी ते निराशाजनक नाही", असाही विचार त्यांनी मांडला आहे.

यानंतर सरदारांनी कथात्मक वाङ्मयाचा परिचय करून दिला आहे. याबाबतीत कृष्णशास्त्री चिपळूणकर, भवानी विश्वनाथ कानविंदे, गोविंद शंकर शास्त्री बापट, लक्ष्मण मोरेश्वर शास्त्री हळबे, मोरोबा कान्होबा विजयकर इत्यादी ग्रंथकार तसेच रासेलस, यमुनापर्यटन, मुक्तामाला, राजा मदन, मोचनगड इत्यादी साहित्यकृती या सर्वांची ओळख त्यांनी करून दिली आहे. शेवटी एकशेआठ कथात्मक साहित्यकृतींचे परिशिष्ट त्यांनी जोडले आहेत. या कालखंडात स्वतंत्र कादंबऱ्यांची परंपरा निर्माण झाली आहे, याची नोंद सरदारांनी केली आहे.

यापुढील एकेका प्रकरणातून नाटके, निबंध, सामाजिक वाङ्मय, इतिहास व चरित्रे या प्रकारांत निर्माण झालेल्या साहित्याचा सुसूत्र परिचय सरदारांनी करून दिला आहे त्या प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र परिशिष्ट जोडलेले असून त्यामध्ये त्या त्या वाङ्मय प्रकारातील साहित्यकृतींच्या व्यवस्थित नोंदी केलेल्या आहेत. हे सर्वच लेखन संशोधन पद्धतीला अनुसरून झालेले आहे. आधुनिक संशोधनशास्त्र सहा दशकांपूर्वी फारसे स्थिरपद झालेले नव्हते. त्या काळात सरदारांनी सादर केलेला संशोधनपद्धतीचा हा वस्तुपाठ स्पृहणीय आहे.

मालापूर्व मराठी वाङ्मयाच्या दुर्मिळ इतिहाससाधनांची सुसंगत जुळणी सरदारांनी केली आहे. मुद्रणकलेचा आरंभ, पाठशाळांची स्थापना, मराठी पंडितांच्या मदतीने मिशनरी मंडळीने केलेले ग्रंथनिर्मितीचे प्रयत्न व शिक्षणप्रसाराचे कार्य या सर्वांमुळे मराठी गद्य वाङ्मयाचे पाऊल पुढे पडायला मदत झाली. मिशनऱ्यांचे छापखाने, गावोगावी सुरु झालेल्या शाळा, मुंबई विद्यापीठाची स्थापना, विविध नियतकालिकांची निर्मिती अशा प्रयत्नांतून वाङ्मयविकासाला अनुकूल वातावरण निर्माण झाले, हे सरदारांनी नोंदविले आहे. अव्वल इंग्रजीत निबंध, कादंबरी, नाटक हे वाङ्मयप्रकार मराठीत प्रथमच आले मात्र हा कालखंड भाषान्तरवजा लेखनाचा कालखंड होता. त्यात स्वतंत्र ग्रंथलेखनाची प्रवृत्ती अभावानेच आहे. इंग्रजी, संस्कृत व बंगाली नाटकांची मराठी भाषांतरे झाली, त्यामुळे मराठीत अभिनव गद्यशैली अवतरली, हे सरदारांनी लक्षात आणून दिले आहे. या काळातील निबंधलेखन बांधेसूद नसले तरी ते सविस्तर व प्रभावी होते. त्यामुळे साहित्यक्षेत्रात नवा मनू येण्यास मदत झाली. नवे लेखक पुढे आले.

लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित व महात्मा फुले यांनी जातिभेद, अस्पृश्यता, विधवा-विवाह व स्त्रीशिक्षण यांविषयी आपली पुरोगामी मते समाजापुढे निर्भयपणे मांडली. धर्मशास्त्र, यंत्रशास्त्र, शेतकी,

पदार्थविज्ञान, वैद्यक अशा विषयांची माहिती देणारे ग्रंथ लिहून त्यांच्या लेखकांनी शास्त्रीय ग्रंथलेखनाची पायाभरणी केली. या कालखंडातील गद्य ग्रंथाची वाङ्मयीन गुणवत्ता बेताची असली, तरी त्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षणीय आहे, असा सरदारांचा निष्कर्ष आहे.

सरदारांच्या प्रस्तुत ग्रंथाच्या संदर्भात काही गोष्टी नमूद करणे जरुरीचे आहे. त्यांचा हा ग्रंथ प्रकाशित होण्याच्या अगोदर पंधरा वर्षे, म्हणजे १९२२ मध्ये, दत्तो वामन पोतदार यांच्या 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार अथवा इंग्रजी अमलातील मराठी गद्य वाङ्मयाचा निबंधमालेपूर्वीचा इतिहास : इ. स. १८१० ते १८७४ 'या ग्रंथाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली होती. पोतदार हे सरदारांचे प्राध्यापक होते. त्यांच्या आणि सरदारांच्या ग्रंथांचा विषय एकच आहे. पण पोतदारांच्या ग्रंथाचा उल्लेख करण्याचे सरदारांकडून राहून गेले आहे. पोतदारांच्या ग्रंथाची दुसरी आवृत्ती १९५६ मध्ये निघाली. या अवृत्तीत पोतदारांनी सरदारांच्या ग्रंथाची भलावन केलेली आहे. 'सरदारांचा ग्रंथ आम्ही लिहिलेल्या काळातील वाङ्मयावरच आहे, अभ्यासकांनी हा अवश्य पहावा,' असे पोतदारांनी म्हटले आहे.

पोतदारांच्या ग्रंथाची प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत; स्वराज्यातले गद्य (इ. स. १८१०), छत्रे आणि मंडळी (१८१० ते १८३६), दादोकृत व्याकरण ते नवनीत (१८३६ ते १८५७), आणि ललित वाङ्मयाचा प्रारंभ (१८५७ते १८७४) असे आपल्या विवेचनांचे चार भाग त्यांनी मांडले आहेत. या भागांतील निवडक लेखकांच्या वाङ्मयातील उतारे ग्रंथाच्या उत्तरार्धात त्यांनी दिले आहेत. स. का. छत्रे, स्टीव्हन्सन, बाळशास्त्री जांभेकर, हरी केशवजी, गो. ना. माडगावकर, विष्णुबाबा ब्रम्हचारी, मोरोबा कान्होबा, दादोबा पांडुरंग, बाबा पद्मनजी व लोकहितवादी यांचे उतारे दिल्यामुळे अव्वल इंग्रजीतील गद्याचा विकासपट डोळ्यांसमोर उभा राहतो.

या गद्य लिखनांची चार वळणे पोतदारांनी दिली आहेत. पेशवाई गृहस्थी वळण, शास्त्री संस्कृती वळण, इंग्रजी भाषान्तरी वळण व संमिश्र वळण अशी या गद्य शैलीची वळणे त्यांनी नोंदविली आहेत. तसेच ज्ञानप्रसार, इंग्रजी सुधारणांची भुरळ व धर्मप्रसार हे या गद्य सारस्वतांच्या लेखनामागील हेतू असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

इंग्रजी अवतार घेतलेल्या या मराठी गद्याचे मूल्यमापन पोतदारांनी पुढील शब्दांत परखडपणे केले आहे : '१८०० ते १८७५ या पाऊणशे वर्षांत एकही अलौकिक किंवा अजरामर ग्रंथ मराठीत झाला नाही. लहानसहान सटरफटर ग्रंथ भाराभर आले. 'तारागण' पुष्कळ उगवला, पण तामोनाशक चंद्र मात्र कोठेच आढळला नाही !' ___

पोतदारांचा हा अभिप्राय गंभीर स्वरूपाचा आहे. सरदारांच्या ग्रंथात या अभिप्रायाविषयीची प्रतिक्रिया अपेक्षित होती, पण त्यांनी ते केलेले नाही. वास्तविक लोकहितवादींच्या 'शतपत्रां' विषयी सरदारांनी गौरवाने लिहिले आहे. त्या ग्रंथाच्या आधारे त्यांना पोतदारांच्या मताचा परामर्श घेता आला असता. पण सरदारांनी ते केलेले नाही.

अव्वल इंग्रजीतील गद्याविषयी गं. दे. खानोलकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, त्र्यं. शं. शेजवलकर, श्री. के. क्षीरसागर प्रभृती समीक्षकांनी मौलिक विचार प्रगट केले आहेत. वानगीदाखल त्यांपैकी काही मतांचा उल्लेख करता येईल. 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' , या ग्रंथमालेच्या तिसऱ्या भागात खानोलकर लिहितात, 'विष्णुशास्त्री पंडित यांनी 'इंदुप्रकाश' या पत्रात लेखन केले आहे. ते वाचले म्हणजे

समाजाची प्रगती कशी घडले, याखेरीज त्यांना अन्य ध्यास नव्हता हे लक्षात येते.' तसेच 'ज्योति-निबंध' या पुस्तिकेत तर्कतीर्थ जोशी यांनी ज्योतिबा फुले यांच्या लेखनाचा मर्म विशद केले आहे. तर्कतीर्थांनी ज्योतीबांची विचारसरणी व त्यांची चळवळ 'सहानुभावी अंतःकारणाने समजून घेऊन' त्यांनी शुद्ध विवेकवाद्याच्या भूमिकेवरून मार्मिक चिकित्सा केली आहे.

वरील सर्वच समीक्षक व्यासंगी विचारवंत होते. त्यांच्या लेखनातून सरदारांच्या ग्रंथाला पूरक व त्याच्याशी समान्तर असे विचार आलेले आहेत. सरदारांच्या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीत या सर्व मौलिक लेखनाची नोंद अपेक्षित होती. पण ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही. आपल्या ग्रंथाच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तीत सरदारांनी प्रस्तावनेत मांडलेली ग्रंथलेखनामागची भूमिका वाचकाच्या मनात गोंधळ उत्पन्न करणारी आहे. "मराठी गद्य वाङ्मयाच्या बाल्यावस्थेत अनेक व्यक्तींनी त्यांचे परिश्रमपूर्वक संवर्धन केले. त्यांची स्मृती...जागृत ठेवावी अशा भावनेने हा ग्रंथ लिहिण्यास मी प्रवृत्त झालो". असे पहिल्या आवृत्तीत ते सांगतात (१९३७). दुसऱ्या आवृत्तीत ते म्हणतात, "आता पुष्कळच नवे साहित्य उपलब्ध झालेले आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षात माझ्या विचारांची बैठक बदललेली आहे...त्यावेळचा 'मी' जणू काही आज मला दुरावल्यासारखा झालो आहे. म्हणून या ग्रंथाचे संस्करण करण्याचा मी प्रयत्न करणे हे दुसऱ्याच्या लेखनात अनधिकृतपणे हस्तक्षेप करण्याइतकेच अप्रयोजकपणाचे होईल, असे वाटते."(१९५६).

सरदारांचे हे निवेदन त्यांच्यापुरते सोयीचे असले, तरी वाचकांच्या दृष्टीने ते अडचणीचे आहे. सरदारांनी ग्रंथात मांडलेल्या मतांशी वाचक सहमत नसले तर, 'आता माझी भूमिका बदललेली आहे' , असे सरदार म्हणू शकतात. तसेच 'आता पुष्कळच नवे साहित्य उपलब्ध झालेले आहे' , हे लक्षात घेऊनही त्याचा परामर्श मात्र ते घेत नाहीत. केवळ आपल्या स्वतःच्या समालोचनात समाधान मानून ते स्वस्थ राहतात.

आणखी असे की, 'दुसरी आवृत्ती (पुनमुर्द्रण) ही ग्रंथातील नोंद सदोष वाटते. आवृत्ती पुढची असेल, तर तिचे संस्करण अपेक्षित असते. केवळ ते पुनमुर्द्रणच असेल, तर ती अपेक्षा नसते. १९५६ मध्ये प्रकाशित झालेले या ग्रंथाचे हे केवळ 'पुनमुर्द्रण' आहे, ही दुसरी 'आवृत्ती' नव्हे.

मात्र सरदारांच्या ग्रंथातील या उणीवा मान्य करूनही त्यातील विवेचनाची व्याप्ती मोठी आहे, असे निःसंदिग्धपणे म्हणता येईल. अव्वल इंग्रजीतील गद्याची मीमांसा आज करताना सरदारांच्या ग्रंथाचे महत्त्व विशेष जाणवते. १८८५ ते १९२० या कालखंडात मराठी गद्य वाङ्मयाला स्वतःचे 'रूप' सापडत गेले. त्याचे कलामूल्य स्थिरपद होत गेले, त्या गद्याला एक प्रकारचा डौल प्राप्त झाला. हरिभाऊ आपटे, चिपळूणकर, टिळक, आगरकर कोल्हटकर प्रभृती लेखकांनी या कालखंडात मराठी गद्याला प्रौढता, प्रगल्भता व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. या 'सुप्रतिष्ठित' गद्याची पार्श्वभूमी अव्वल इंग्रजीतील गद्याने तयार केली. या कालखंडातील गद्यलेखकांनी नांगरणी व पेरणी करून ठेवली, पीक पुढिलांनी काढले. अव्वल इंग्रजीत हि जी पूर्वपीठिका तयार झाली, तिचे साधार, सविस्तर व सुसूत्र विवेचन सरदारांनी केले आहे. कथा, कादंबरी, नाटक, निबंध व चरित्र या विविध वाङ्मयप्रकारांचा उपन्यास अव्वल इंग्रजीत झाला. तसेच ज्ञानोपासना व लोकशिक्षण या लेखनहेतूंचे शुभारंभही आरंभकाळातील या गद्याने कसे केले, याची मार्मिक चर्चा सरदारांनी केली आहे. आपल्या या चर्चेला आधारभूत होणाऱ्या साहित्यकृतींचे परिशिष्ट त्यांनी ग्रंथात प्रत्येक प्रकरणाला जोडले आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहास-लेखकाला सरदारांचे हे संशोधनकार्य उपयुक्त वाटेल.

अनुक्रमणिका

# ३.
# संपादित ग्रंथांचा परिचय

शैक्षणिक हेतूने केलेली संपादने आणि सामाजिक भूमिकेवरून केलेली संपादने, असे सरदारांच्या संपादनकार्याचे दोन प्रकार आहेत. त्या कार्याचा तपशील असा आहे :

**शैक्षणिक संपादने**

१. तुकारामदर्शन अर्थात् अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची (१९६८)
२. रामदासदर्शन (१९७२)
३. एकनाथदर्शन अर्थात् एकनाथदर्शन एकनाथांच्या समग्र वाङ्मयाचे सार-तत्व (१९७८)
४. मराठी पद्य-गद्य वेचे (विद्यापीठपूर्व वर्गासाठी, १९७८)
५. एस. एन डी. टी. विमेन्स युनिवर्सिटी रीसर्च जर्नल (१९६६)
६. एस, एन. डी. टी विमेन्स युनिव्हर्सिटी कॉमेमोरेशन व्हॉल्युम (१९६८)
(पहिली तीन संपादने वाङ्मयीन स्वरुपाची असली, तरी विद्यापीठीय परीक्षांसाठी अभ्यासावयाची पाठ्यपुस्तके असेच त्यांचे शैक्षणिक उद्दिष्ट आहे.)

**सामाजिक संपादने**

१. महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड पहिला, (१९६०)
२. महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड दुसरा, (१९६०)
३. संक्रमणकाळाचे आव्हान (१९६६) (भारतीय जीवनातील प्रमुख प्रश्न)
वरील दोन्ही प्रकाराच्या संपादनांची वैशिष्ठ्ये लक्षणीय आहेत. त्यांचा परिचय करून घेणे उपयुक्त ठरेल.

**शैक्षणिक संपादने**

तुकाराम, रामदास, एकनाथ या संतकवींच्या समग्र काव्यसंपदेतून प्रातिनिधिक स्वरूपाचे वेचे निवडून सरदारांनी त्यांचे संपादन केले आहे. सरदारांची विवेचक प्रस्तावना व शब्दार्थ कोश यांमुळे या वेच्यांचा रसास्वाद घेणे सुलभ झाले आहे. या प्रस्तावनांतून सरदारांनी त्या त्या संतांच्या काळातील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरून त्याचे तत्त्वचिंतन व कार्य यांचा मागोवा घेतला आहे. तसेच संताचा चरित्रपट, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण, अभंगवाणीचा विकासक्रम आणि निवडलेल्या अभंगांचे विषयावर वर्गीकरण व सूचक शीर्षके या वैशिष्ट्यांमुळे हे संपादन उपयुक्त व उद्‌बोधक झाले आहे.

'तुकारामदर्शन' मध्ये तुकोबांच्या साडेचार हजार अभंगांतून आठशे अभंगांचे वेचक संकलन केलेले आहे. तीव्र संवेदनक्षमता व सखोल चिंतनशीलता यांमुळे तुकोबांच्या अभंगवाणीला जे वेगळे परिमाण लाभले आहे आणि त्यांच्या पारमार्थिक प्रवासात रसरशीत अनुभूतीचा जो अर्क आहे, त्यांचे चित्रण सरदारांनी नेमकेपणाने केले आहे. माणसाच्या आयुष्यातील सुखदुःखे, आशानिराशा, विवेकनिष्ठा-विकार व ऱ्हास या साऱ्या द्वंद्वांचे दर्शन तुकोबांच्या अभंकवितेतून कसे घडते ते सरदारांनी सुसूत्रपणे सांगितले आहे.

'रामदासदर्शन' हा समर्थांच्या समग्र साहित्यातील वेच्यांच्या संग्रह आहे. समर्थांचे व्यक्तिमत्त्व, वाङ्मय, तत्वज्ञान आणि जीवितकार्य असे चार विभाग सरदारांनी पाडले आहेत. दासबोध, गाथा. करुणाष्टके, मनाचे श्लोक, लघु रामायण, आनंदवनभुवन, स्फुट कविता, पदे, भारुडे, स्तोत्रे, भूपाळ्या,

आरत्या, अशा लहानमोठ्या सर्व रचनांचा सरदारांनी साक्षेपाने विचार केला आहे. सूक्ती-शतकाचाही त्यात त्यांनी समावेश केला आहे.

'एकनाथ दर्शन' या संपादनासाठी वेचे निवडताना सरदारांनी नाथांच्या समग्र वाङ्मयाचा विचार डोळ्यांसमोर ठेवला आहे. नाथ- भागवत, रुक्मिणीस्वयंवर, भावार्थरामायण, चतुःश्लोकी भागवत, स्फुट प्रकरणे, गौळणी, पदे, भारुडे, अभंग... यांमधून तेहतीस वेचे येथे निवडलेले आहेत. त्याद्वारे सोळाव्या शतकातील धार्मिक व सामाजिक प्रवृत्ती व अपप्रवृत्ती यांचा अंदाज करता येतो. सरदारांची प्रस्तावना सर्वस्पर्शी आहे. नाथपूर्वकालीन धार्मिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर नाथांच्या कार्याचे महत्त्व ते विशद करतात. ज्ञानेश्वरांच्या कार्याची खंडित झालेली परंपरा नाथांनी पुन्हा सुरु केली आणि भागवत धर्माच्या विकासाला गती दिली हे सांगून नाथांच्या समन्वयशील व समाजसन्मुख वृत्तीचे मोल सरदार स्पष्ट करतात.

संतसाहित्यविषयक ही तिन्ही संपादने सरदारांच्या संपादकीय साक्षेपाची ओळख करून देतात. वेच्यांची त्यांनी केलेली निवड सूत्रबद्ध आहे. संतांचे व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयसंपदा यांचे दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या प्रस्तावना मार्मिक आहेत. संतांचे मूळ गाव, जन्मस्थळ, जन्मकाळ, निर्वाणशक अशा मुद्यांच्या वादात सरदार पडत नाहीत. संतकालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर संतांचे काव्य, तत्त्वचिंतन व कार्य यांचे मूल्यमापन ते करतात. आपल्या या भूमिकेस पोषक ठरतील अशा वेच्यांची निवड ते करतात. त्यामुळे त्यांची ही संपादने संतकाव्याच्या अभ्यासाला उपयुक्त आणि उद्‌बोधक ठरणारी आहेत.

यानंतरची तीन संपादने महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय स्तरांवरील कर्तव्याचा भाग म्हणून सरदारांनी केलेली आहेत. तेव्हाच्या विद्यापीठपूर्व वर्गासाठी एक पाठ्यपुस्तक म्हणून 'मराठी गद्य-पद्य वेचे' सरदारांनी विद्यापीठाच्या सूचनेवरून संपादित केले. भास्करभट्ट बोरींकर ते इंदिरा संत आणि लोकहितवादी ते दि. के. बेडेकर यांच्या काव्याचे / लेखांचे उतारे यात निवडलेले आहेत. ग्रंथकारांचा संक्षिप्त परिचय व उताऱ्याचा संदर्भ देऊन उताऱ्याची साहिंता ते देतात. महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेणाऱ्या विध्यार्थिनीला मराठी साहित्याचा विकासपट अभ्यासता यावा, अशी दृष्टी या संपादनाच्या मागे ठेवलेली आहे.

'एस. एन. डी. टी. विमेन्स युनिव्हर्सिटी रिसर्च जर्नल' चा शुभारंभ सरदारांच्या संपादने १९६६मध्ये झाला. दोनशे-ऐंशी पृष्ठांच्या या नियतकालिकात एकंदर एकवीस शोधनिबंध समविष्ट केलेले आहेत. इंग्रजी (१३), हिंदी (०२), गुजराती (०२) व मराठी (०४) अशी त्यांची भाषानिहाय विभागणी आहे. शैक्षणिक, वाङ्मयीन, ग्रंथालयीन, भाषिक व ललित कलाविषयक निबंध येथे वाचायला मिळतात. धर्मशास्त्र. कवी भूषण. क्लासिसिझम, नागानंद हे नाटक, शालेय ग्रंथालये, भांडवलशाहीचे अर्थकारण, चित्रकलेची अध्यात्मनिष्ठा असे महत्त्वाचे विषय त्यात आले आहेत. 'ज्ञानेश्वरांची धर्मकल्पना' हा स्वतः संपादक सरदारांचा निबंधही या अंकात समाविष्ट केलेला आहे.

'कॉमेमोरेशन व्हॉल्यूम' हा श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाचा सुवर्ण महोत्सवी संस्मरण ग्रंथ१९६८ मध्ये प्रकाशित झाला. प्राचार्य शकुंतला मेहता व डॉ. नीरा देसाई या दोघींच्या सहकार्याने सरदारांनी त्याचे संपादन केले. इंग्रजी विभाग (२०३ पृष्ठे), मराठी विभाग (३८ पृष्ठे), विद्यापीठीय विविध विभागांचा तपशील (३२ पृष्ठे) व ग्रंथसूची (११५ पृष्ठे) असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. ग्रंथातील सूची स्त्रीशिक्षणाविषयक संदर्भ साहित्याची ओळख करून देणारी आहे. न्या. छागला. डॉ. कोठारी, दुर्गा देशमुख,

अनुक्रमणिका

जे. पी. नाईक. दत्तो वामन पोतदार, सुलभा पाणंदीकर, माधुरी शाह. द. शं. फाटक, हे. वि. इनामदार प्रभृतींचे शिक्षणविषयक शोधनिबंध या ग्रंथात आहेत.

महाविद्यालयीन सेवाकालात सरदारांनी व्यावसायिक कर्तव्यबुद्धीने केलेल्या या पाचही संपादनात त्यांची विवेचन वृत्ती व व्यापक दृष्टी यांचा प्रत्यय येतो.

**सामाजिक संपादने**

या विभागातील तिन्ही ग्रंथ सरदारांनी एक विशिष्ट विचारसूत्र सांभाळून संपादिले आहेत. १९५६मध्ये 'महाराष्ट्र दर्शन' या विषयावरील सरदारांची व्याख्यानमाला गाजली. त्यातूनच चिं ग. कर्वे व दा. न. शिखरे यांच्या मदतीने 'महाराष्ट्र जीवन' ही द्विखंडात्मक ग्रंथ-योजना सिद्धीस नेली. ललित वाङ्मय आणि वैचारिक वाङ्मय अशा दोन भागांत हे दोन खंड त्यांनी संपादिले आहेत. परंपरा, प्रगती व समस्या या त्रिविध दृष्टिकोनातून महाराष्ट्र जीवनाची चिकित्सा इथे केलेली आहे. पहिल्या खंडात ध. रा. गाडगीळ, मु. ग. पानसे, रा. वि. ओतुरकर, ज. स. करंदीकर, दा. न. शिखरे, दि. के. बेडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ग. सहस्रबुद्धे, चिं. ग. कर्वे, ना. र. देशपांडे व नी. वि. सोवनी यांनी आंग्लपूर्व काळ व आधुनिक काळ यांतील इतिहास, परंपरा, धर्मसंस्था, तत्त्वमीमांसा, समाजकारण, राजकारण व अर्थकारण या विषयांचे विवेचन केले आहे.

साहित्य व कला यांतील उपविषय दुसऱ्या खंडात आले आहेत. यातही आंग्लपूर्व व आधुनिक असे दोन कालखंड कल्पिलेले आहेत. शिक्षण, संशोधन, ललित वाङ्मय, लोकशिक्षण व ललितकला (नृत्य, चित्र, शिल्पव गायन) या विषयांचे समालोचन इथे वाचायला मिळते. म. दा. साठे, ना. वि. पाटणकर, मो. वा. चिपळूणकर, इरावती कर्वे, वि. म. बेडेकर, ग. ह. खरे, दुर्गा भागवत, श्री. ना. बनहट्टी, रा. शं. वाळिंबे, के. नारायण काळे, रोहिणी भाटे, ग. ह. रानडे, ग. प्र. प्रधान, शं. ग. दाते इ. लेखकांबरोबर स्वतः सरदारांनीही या खंडासाठी लेखन साहाय्य केले आहे.

सरदारांनी हे संपादनकार्य निःस्पृह वृत्तीने केले आहे, "तुम्ही या कामासाठी मला मानधन देणार असाल, तर संपादन –समितीचे काम मी करणार नाही" हे त्यांचे उद्‌गार 'महाराष्ट्र जीवन' च्या पहिल्या भागातील प्रकाशकीय निवेदनात उद्‌धृत आहेत.

दुसऱ्या भागात 'नव्या महाराष्ट्राचे भवितव्य' हा स्वतः सरदारांचा प्रदीर्घ लेख आहे. त्यात त्यांनी विज्ञानाची प्रेरणा, लोकशाही जीवनपद्धती, उच्चवर्णीयांचे कर्तव्य इत्यादी विषयांचा ऊहापोह केला आहे.

नवसमाजनिर्मितीचा पल्ला लांबचा आहे. मात्र तात्कालिक यशापयशाची तमा न बाळगता योग्य दिशेने वाटचाल करीत राहण्यासाठी कार्यकर्त्यांच्या ठायी आत्मप्रत्यय असावा लागतो. तो नुसत्या ग्रंथाध्ययनाने निर्माण होत नाही. त्यासाठी 'चक्षुर्वै सत्यम' या न्यायाने सर्वसामान्य जनतेच्या उदंड सामर्थ्याची साक्षात प्रचीती यावी लागते, असा 'हितोपदेश' सरदारांनी केला आहे.

'महाराष्ट्र जीवन' या ग्रंथात सरदारांनी महाराष्ट्रातील समस्यांचे नेमके स्वरूप काय आहे, याचे दिग्दर्शन केले आहे. इंग्रजांची राजनीती, औद्योगिक परिवर्तन व पाश्चात्य विद्येचा प्रभाव यांच्या द्वारा आपल्याकडील मध्ययुगीन समाजव्यवस्थेवर आघात झाले. गेल्या दीडशे वर्षात ज्या क्रमाने व ज्या पद्धतीने

आपल्या मध्ययुगीन समाजव्यवस्थेवर आघात झाले. गेल्या दीडशे वर्षात ज्या क्रमाने व ज्या पद्धतीने आपल्या समाजाचा कायापालट घडून आला, त्यामधून आजचे आपले बहुतेक प्रश्न निर्माण झाले आहेत. अपुरी व कमी उत्पादक शेती, सामाजिक विषमता, जातीनिष्ठेचे प्राबल्य, अज्ञान व मागासलेपणा यांचा जाच भारतातील सर्वच जनतेला सहन करावा लागत असला, तरी प्रत्येक प्रदेशाची भौतिक पार्श्वभूमी व सांस्कृतिक परंपरा यांच्या अनुषंगाने तेथील प्रश्नांना विशिष्ट रूप आले आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर शहरातील मूठभर पांढरपेशा मध्यमवर्ग आणि गावोगाव विखुरलेला बहुजनसमाज यांच्यामध्ये निर्माण झालेला दुजाभाव दूर करून समाजजीवन एकसंध बनावे, यासाठी उच्चवर्णीयांकडून गांधीयुगापर्यंत तरी कोणतेच लक्षणीय प्रयत्न झाले नाहीत.

महाराष्ट्र जीवनाची सरदारकृत ही मीमांसा विचारप्रवर्तक आहे, हे मान्य होण्यासारखे आहे.

'महाराष्ट्र जीवन' चे दोन्ही खंड १९६० मध्ये प्रकाशित झाले. त्या काळाला धरून सरदारांनी नव्या महाराष्ट्र राज्याची प्रतिष्ठा भारतात वाढविण्याच्या दृष्टीने काही सूचना केल्या आहेत. अशी प्रतिष्ठा मिळविण्यासाठी इतर प्रांताच्या बरोबरीने भारताच्या आर्थिक, राजकीयव सामाजिक जीवनावर आपला प्रभाव पडला पाहिजे. तशी महत्त्वाकांक्षा आपण बाळगली पाहिजे. त्यासाठी सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी आत्मपरीक्षण करायला हवे. सत्ताकांक्षेला ज्ञाननिष्ठेची, त्यागाची व कर्तव्यबुद्धीची जोड द्यायला हवी. राजकीय क्षेत्रात ज्या वर्गांनी पुढारीपण मिळविले आहे, त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही पदार्पण केले पाहिजे. आज महाराष्ट्रातील सांस्कृतिक धन बव्हंशी ब्राह्मण व तत्सम जातींतच सामावलेले आहे. ही स्थिती बदलली पाहिजे.

सरदारांचे हे निरीक्षण एकतर काहीसे कालसापेक्ष आहे. दुसरे असे की, त्यांना अपेक्षित असलेला बदल१९६० ते १९९७ या तीन तपांच्या कालावधीत हळूहळू होत आहे. त्यांनी केलेली सामाजिक समस्यांची मीमांसा सर्वच विचारवंतांना मानवेल असे नाही, पण त्यांची चिकित्सा मूलगामी व स्वयंसिद्ध आहे, हे कुणालाही मान्य होईल.

महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास अभ्यासण्यासाठी 'महाराष्ट्र जीवन' चे दोन्ही खंड उपयुक्त आहेत. हे खंड प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्रीय समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत बरेच बदल झाले आहेत. त्या बदलांची दखल घेऊन नव्या पिढीतील विचारवंतानी पुढे आले पाहिजे. आजच्या परिस्थितीचे विश्लेषण करणाऱ्या नव्या खंडांचे संपादन होण्याची गरज आहे.

'संक्रमण काळाचे आव्हान' या आपल्या संपादित ग्रंथातील प्रस्तावनेत सरदार लिहितात, "अलीकडच्या काळात काही प्रश्नांनी स्फोटक रूपे धारण केल्याचे दिसून येत आहे. दिवसेंदिवस जीवनकलह कठीण होत चालल्यामुळे सर्वसामान्य लोक दिङ्मूढ होऊन प्रवाहपतित बनत आहेत. त्यांच्या अपेक्षा वाढत्या आहेत. पण आपल्या मनाप्रमाणे जीवनाला आकार देण्याची जिद्द त्यांच्या ठिकाणी राहिलेली नाही. त्यामुळे आपल्याला काही चांगले दिवस येतील, हा विश्वासच त्यांच्यामधून लुप्त झाला आहे.' '

वास्तविक हे चित्रण १९६६ मधील आहे, पण ते आजच्याही परिस्थितीचे दर्शन आहे असे वाटले. आता तर समाजातील परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. अशा स्थितीत प्रस्तुत ग्रंथातील्ल समाजचिंतन निश्चितच उद्‌बोधक ठरेल.

[अनुक्रमणिका]

अन्नप्रश्न (स. ह. देशपांडे), अर्थविकास (कांता रणदिवे), नियोजन (भा. शं. भणगे), राजकीय प्रश्न (व. मं. सिरसीकर), नेतृत्व (नलिनी पंडित), शिक्षण क्षेत्रातील प्रश्न अ. के. भागवत), ऐहिक निष्ठा (मे. पुं. रेगे.), ज्ञाननिष्ठा व समाजपरिवर्तन (गं. बा. सरदार) इत्यादी क्षेत्रांतील आव्हानांची चिकित्सा या ग्रंथात केलेली आहे. ज्या समाजाने आपल्याला घडविले, त्याचे आपण काही देणे लागतो, या जबाबदारीच्या जाणिवेने विविध लेखकांनी सामाजिक समस्यांची मीमांसा येथे केली आहे.

विचारवंतांची उदासीनता सरदारांना खटकते. ज्ञान हे जीवनातील प्रचंड सामर्थ्य आहे. ज्ञानवंतांनी उदासीन राहून चालणार नाही, हे स्पष्ट करताना सरदार लिहितात, "भारतीय विचारांत समाज-धारणेची आस्था आहे, पण समाज-परिवर्तनाची दृष्टी नाही. अनासक्त बुद्धीने आपापले लहान- मोठे कर्तव्य करीत राहण्यातच व्यक्तीचे हित आहे, अशी आपल्या धर्मपंथांची शिकवण आहे. त्यामुळे सामान्य लोकात प्राप्त परिस्थितीशी जुळते घेण्याची वृत्ती निर्माण झाली. आत्मपुष्टी व औदासीन्य, नैष्कर्म्य व निष्क्रियता यांची गल्लत होऊ लागली. बहुश्रुतपणा तरी शास्त्रशुद्ध ज्ञानाची प्रतिष्ठा लाभली नाही. त्यामुळे सृष्टिविज्ञान व समाजविज्ञान ही काही मर्यादेपर्यंत प्रगत होऊन पुढे त्यांचा विकास खुंटला,"

अलीकडील विद्यावंतांची भूमिका सरदारांना आक्षेपार्ह वाटते. सुखसोयींचा पाठलाग करणारा उच्च मध्यमवर्ग देशात निर्माण झाला आहे. पैसा व प्रतिष्ठा ही त्यांची दैवते बनली आहेत. कनिष्ठ मध्यम वर्ग मात्र जीवनकलहात पिचून जात आहे. सध्याचे बहुतेक राजकीय कार्यकर्ते लोकांच्या भावनेला आवाहन करतात; पण त्यांच्या विवेकबुद्धीचे संगोपन करण्यासाठी झटत नाहीत.

हे चित्र चिंताजनक स्वरूपाचे असले तरी सरदार निराशावादी नाहीत. विचारवंतांना समाजात जे विशिष्ट स्थान आहे, ते भविष्यातले आशास्थान आहे. कोणाच्याच रागलोभाची क्षिती न बाळगता विचारवंतांनी आपली बुद्धी निर्मळ ठेवली तर अजूनही ते समाजाला मार्गदर्शन करू शकतील. मात्र त्यासाठी त्यांनी बौद्धिक कार्यक्षेत्राच्या खोट्या प्रतिष्ठेची व सोवळेपणाची कल्पना सोडली पाहिजे आणि बहुजनसमाजाशी त्यांनी कर्तव्यभावनेने समरस झाले पाहिजे, असा इशारा सरदारांनी दिला आहे. सुजाण लोकमत आणि विवेकनिष्ठ नेतृत्व यांवर लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असल्याचे त्यांनी लक्षात आणून दिले आहे.

संपदित स्वरूपाच्या ग्रंथांतूनही सरदारांची समाज-सन्मुख वृत्ती लोककल्याणाच्या चिंतनात रमलेली दिसते. विद्यानंद हा अलौकिक व आत्मनिष्ठ असतो, पण विद्येच्या अभिवृद्धीचा सामाजिक संदर्भ सुटता कामा नये आणि विद्यावंतांनी आपले सामाजिक दायित्व पार पाडले पाहिजे हे आपले आवाहन सरदारांनी संपादित साहित्यांतूनही आवर्जून सांगितले आहे.

## ४.
# संतसाहित्याचा परामर्श

संताच्या सामजिक कामगिरीचा शोध त्यांच्या काव्यासंपदेच्या आधारे सरदारांनी घेतला आहे. सरदारांनी केलेली मीमांसा अजमावताना दोन अडचणींना तोंड द्यावे लागते. एक तर मध्ययुगीन महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास स्वतंत्रपणे व सलग रीतीने उपलब्ध नाही. संतकाव्य हे मध्ययुगीन महाराष्ट्राचे सामाजिक इतिहास स्वतंत्रपणे व सलग रीतीने उपलब्ध नाही. संतकाव्य हे मध्ययुगीन महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित आहे. तेव्हा काव्यात समाजजीवनाचे चित्र उमटत का, व तसे असेल तर ते प्रमाण मानावे काय, असे प्रश्न पडतात.

काही सामजिक हेतूंनी प्रेरित होऊन संतांनी आपले काव्यलेखन केले नव्हते, हे तर उघड आहे. तरीपण धार्मिक व अध्यात्मिक उद्देशांनी अंकित होऊन लिहिलेल्या संतकाव्यात सामाजिक परिस्थितीचे प्रसंगोपात्त उल्लेख येतात. व्यक्तिजीवनातील विविध अनुभूतींचा अविष्कार करण्याच्या ओघात आणि मनोविकारांचे चित्रण करण्याच्या अनुषंगाने आपल्या अवतीभोवतींची माणसे, परिस्थिती, काळ, व एकूण वातावरण या सर्वांचे निर्देश संतांनी सहजपणे केले आहेत. या गोष्टींचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंध असतो, म्हणूनच त्यांची वर्णने ते करतात.

संत साहित्याचा अभ्यास पाच प्रमुख भूमिकांवरून केलेला आढळतो. संशोधकीय, ऐतिहासिक, पारमार्थिक, वाङ्मयीन आणि सामाजिक अशा पंचविध पातळ्यांवरून आजवर संत वाङ्मयाचे समालोचन करण्यात आले आहे. पांडुरंग शर्मा, अ. का. प्रियोळकर, रा. चिं. ढेरे प्रभृती संशोधकांनी चरित्रचिकित्सा व साहिंतानिश्चिती ही प्रधान उद्दिष्टे ठेवून आपला संतविषयक अभ्यास मांडला आहे. वि. ल. भावे, ल. रा. पांगारकर, ह. श्री. शेणोलीकर इत्यादी ग्रंथकारांनी वाङ्मयेतिहास-लेखनाच्या संदर्भात संतकाव्याचा परामर्श घेतला आहे. संतकाव्यातील परमार्थविचारला प्राधान्य देऊन रा. द. रानडे, शं. वा. दांडेकर, शं. दा. पेंडसे प्रभृती पंडितांनी संतसाहित्याच्या अन्वयार्थ विशद केला आहे. श्री. व्यं. केतकर, वा. ब. पटवर्धन. रा. शं. वाळिंबे इत्यादी समीक्षकांनी शुद्ध वाङ्मयीन भूमिकेतून संतकाव्याचे समालोचन केले आहे. पाचवा दृष्टिकोन सामजिक स्वरूपाचा आहे. त्यातही निषेधपर आणि विधायक अशा दोन परस्परविरुद्ध बाजू आहेत. वि. का. राजवाडे, आचार्य स. ज. भागवत आणि पु. ग. सहस्रबुद्धे यांना संतविचार हा समाजप्रगतीच्या मार्गातील अडसर वाटतो. म. गो. रानडे, श्री. म. माटे. वि. भि. कोलते इत्यादी विचारवंत संतकाव्यातील सामाजिक फलिताचा शोध घेतात. गं. बा. सरदार यांनीही संतवाङ्मयाच्या सामाजिक फलश्रुतीचा गौरव केला आहे. या अभ्यासाच्या पंचधारांतील अंतिम धारेचा विधायक पैलू त्यांनी पुरस्कारिला आहे.

संशोधकीय, ऐतिहासिक, पारमार्थिक आणि वाङ्मयीन या पहिल्या चार दृष्टीकोनांचे महत्त्व सरदारांना मान्य असले, तरी त्यांनी स्वतः मात्र सामाजिक दृष्टिकोनालाच प्राधान्य दिले आहे. संतांच्या समाजसन्मुखतेवर सरदारांच्या विवेचनाचा भर आहे. संतकाव्याच्या संदर्भात संशोधकीय आणि वाङ्मयेतिहासविषयक या दोन अभ्यासपद्धतींच्या वाटांना ते कधीच वळले नाहीत. पारमार्थिक दृष्टिकोनाचा पाठपुरावा त्यांनी प्रसंगोपात्त केला आहे. 'ज्ञानेश्वर हे केवळ मतानेच नव्हे तर मनानेही साक्षात्कारवादी होते' , असे ते म्हणतात. ['ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' ए, पृ. २५] तसेच संतकाव्याच्या वाङ्मयीन वैभवावरही ते लुब्ध होतात. 'ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील वातावरण काव्यात्मतेचे आहे यात मुळीच संशय नाही हे त्यांनी आवर्जून सांगितले आहे. [तत्रैव] मात्र संतांची परमार्थप्रवणता अथवा त्यांचा वाङ्मयविलास यांचे विवेचन सरदारांनी कारणवशात

किंवा अन्य विषयमीमांसेच्या अनुषंगाने केले आहे. त्यांच्या मनाची ओढ संतकाव्यातील सामाजिक आशयाचा शोध घेण्याकडे आहे.

**‘संतवाङ्मयाची सामजिक फलश्रुती’**

सरदारांचा हा छोटा लेखसंग्रह खूप गाजला. या पुस्तकाने त्यांना संतसाहित्याचा अभ्यासकांत स्वतंत्र आणि श्रेष्ठ स्थान मिळवून दिले. ‘भक्तिसंप्रदायाच्या सामाजिक फलश्रुतीचे हे दर्शन संतवाङ्मयाच्या अभ्यासकांस उद्‌बोधक वाटल्यावाचून राहणार नाही,’ अशी पहिल्या आवृत्तीची रास्त भलावण परिषदेचे तेव्हाचे कार्याध्यक्ष प्रा. रा. श्री. जोग यांनी केली आहे.

सरदारांच्या संत-मीमांसेचा कस कोणत्याही अंगाने पारखला तरी त्याचा अस्सलपणाच पुनःपुन्हा जाणवतो. एकतर संत मंडळ म्हणजे ज्ञानेश्वर व त्यांची प्रभावळ अशा सीमित भूमिकेतून सरदार या विषयाचा परामर्श घेत नाहीत. वारकरी संप्रदायावर त्यांनी भर दिलेला असला तरी त्यांच्या अनुषंगाने ज्ञानदेवांचा मूळचा नाथ पंथ आणि एकनाथांचा आरंभीचा दत्त संप्रदाय यांचाही प्रसंगोपात्त मागोवा ते घेतात. त्याशिवाय जैनांची कामगिरी, महानुभावांची वाङ्मयसंपदा, रामदासांचा महाराष्ट्र धर्म इत्यादी विषयांची साधार आणि तौलनिक चिकित्सा करून महाराष्ट्र संस्कृतीच्या संवर्धनातील संतांचा वाटा ते निश्चित करतात. त्यामुळे त्यांचे संत-समालोचन बरेच व्यापक असल्याचे प्रत्ययास येते.

वस्तुवादी इतिहासमीमांसा करून मगच सरदारांनी संत चळवळीचे समालोचन केले आहे. ‘फलश्रुती’ तील प्रत्येक निबंधात त्यांच्या या भूमिकेचा पडताळा येतो.

सामाजिक इतिहासाकडे पाहण्याचा जो एक विशिष्ट दृष्टिकोन आहे, त्याला कार्ल मार्क्स यांनी ‘वस्तुवादी इतिहासमीमांसा’ असे म्हटले आहे. पण ‘वस्तु म्हणजे केवळ जडसृष्टी’ एवढा मर्यादित अर्थ नसून, भौतिक परिस्थितीशी सुसंगती राखून, जनमनाची पकड घेणाऱ्या विचारप्रवाहांचाही त्यात अंतर्भाव होतो. इतिहासाच्या शास्त्रशुद्ध अध्ययनाची हीच दिशा आहे, असे सरदारांना वाटते. ऐतिहासिक संस्थांचे मुल्यमापन करताना त्यांचे प्रवाही स्वरूप ध्यानात घ्यावे; आणि त्यांच्या विविध अवस्थांचे समाजावर काय परिणाम झाले, ते स्पष्ट करावे ; इतिहासकाराचे हे आद्य कर्तव्य आहे, असे सरदार सांगतात.

संतांच्या चळवळीची वस्तुवादी इतिहासमीमांसा करण्यासाठी साधन म्हणून संतांचे साहित्य एवढेच आपल्यासमोर आहे. इतर प्रमाणभूत साधन उपलब्ध नाहीत. संतसाहित्याच्या अनुरोधाने भौतिक परिस्थितीचे चित्रण करावे लागते. हे साहित्य परमार्थपर आहे. उपमा-दृष्टांत यांच्या द्वारेच लौकिक बाबींचा अंदाज बांधावा लागतो. त्यामुळे संत साहित्यावरून तत्कालीन सामाजिक वातावरणाविषयी जे निष्कर्ष काढायचे, ते जपून काढले पाहिजेत अशी मौलिक सूचना सरदारांनी केली आहे.

संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य विशद करताना, संतकालीन महाराष्ट्र कसा होता, याचा मागोवा सरदारांनी घेतला आहे.

भक्तिपंथांने जीवनाची व्यापक, संग्राहक व समतोल अशी जी जीवनदृष्टी दिली, तिचे अनन्यसाधारणत्व सरदारांनी महाराष्ट्र समाजाच्या भौतिक पार्श्वभूमीवर तपासून पाहिले आहे. महानुभावांचा

आत्यंतिक निवृतिवाद आणि त्यांची निषेधनीती यांचा परामर्श त्यांनी तेराव्या शतकांतील समाजस्थितीच्या संदर्भात घेतला आहे. बहामनी काळातील पीछेहाट ध्यानात घेऊन, मगच एकनाथकृत सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचे महत्त्व सरदारांनी सांगितले आहे. शिवकालीन समाजाच्या स्थितीगतीच्या संदर्भात त्यांनी तुकाराम-रामदासांच्या कामगिरीतील साम्य-भेद विशद केला आहे. अशा रीतीने संतकार्याचा वेध घेताना काळाचा संदर्भ ते कोठेही सोडत नाहीत. त्यामुळेच त्यांनी केलेले संतकार्य-विवेचन तर्कसंगत, वस्तुनिष्ठ व प्रत्ययकारी झाले आहे.

संतकार्याचे तुलनात्मक विवेचन सरदारांच्या लेखणीस विशेष मानवते. उदाहरणार्थ, 'नामदेवांच्या सगुणोपासनेत आत्मसमर्पणाची ओढ आहे, तर तुकारामांच्या भक्तिभावनेत आत्मविकासाची प्रेरणा आहे' . किंवा 'एकनाथांच्या वाणीत प्रबोधक शक्ती आहे, तर रामदासांच्या वाक्प्रवाहत प्रक्षोभक तेज आहे' .

मोजक्या पण मार्मिक शब्दांत आपला मुद्दा मांडण्याचे चातुर्य सरदारांच्या लेखणीत आहे. अनेक फुलांचा अर्क अत्तराच्या चार-दोन थेंबात साठावा, त्याप्रमाणे त्यांनी उपयोजिलेल्या मोजक्या शब्दकळेतून अर्थाचे अनेक संघात सूचित होत जातात. उदाहरणार्थ, 'निवृत्ती हवी, पण निष्क्रियता नको; वैराग्य हवे, पण करंटेपणा नको;उपासना हवी, पण एकदेशीयपणा नको, असा रामदासांच्या शिकवणुकीचा रोख होता.' किंवा 'संतांनी कर्मठपणाचे बंड मोडले, पण कर्मप्रवृत्तीचा नाश केला नाही. त्यांनी पढिकतेचा निषेध केला, पण डोळसपणाचा आग्रह सोडला नाही. मनुष्याचा मोठेपणा हा त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेवर नसून वैयक्तिक चारित्र्यावर आहे, ही गोष्ट त्यांनी पुनःपुन्हा आवर्जून सांगितली.'

संतांनी साधलेले सांस्कृतिक प्रबोधन मोठे आहे, हे सरदारांच्या विचारसरणीचे सारस्वत आहे, ते म्हणतात, "संतचळवळीतून उत्पन्न झालेले मराठी समाजातील नवचैतन्य महाराष्ट्राचा सर्व क्षेत्रांतील इतिहास घडविण्यास कारणीभूत झाले आहे. या इतिहासाचे राजकीय व सामाजिक स्वरूप तर मोठे आहेच; पण यापेक्षाही महाराष्ट्रातील भक्तिपंथाचे कार्य सांस्कृतिक दृष्ट्या जास्त व्यापक व मूलगामी आहे.... ज्ञानेश्वरांनी रूढीपेक्षा मानवतेला, शब्द-प्रामाण्यापेक्षा अंतःस्फूर्तीला आणि उपचारापेक्षा अत्मविकासाला प्राधान्य दिले."

'संतसाहित्याची सामजिक आणि राष्ट्रीय कामगिरी' या आपल्या पुस्तिकेतही सरदारांनी संतांच्या समाजमन्स्कतेचाच मागोवा घेतला आहे. "मराठी संत हेच मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्यभावाचे खरे शिल्पकार होत. ख्रिस्तोत्तर तेराव्या सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्यभावाचे खरे शिल्पकार होत. ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना करून आणि ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा कायापालट घडून आणून, महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. नामदेवांनी आपल्या भावोत्कटतेने, श्रद्धाबळाने व समर्पणशीलतेने निरनिराळ्या जातींतील विठ्ठलभक्तांची मने वेधून घेतली; आणि तत्कालीन धार्मिक आंदोलनात सामील होण्यास त्यांना प्रवृत्त केले... पुढे एकनाथांनी एकंदर कालमान लक्षात घेऊन दूरदर्शीपणाने, निर्धाराने, कल्पकतेने पण सावधानतेने भागवत धर्माच्या चळवळीस चालना दिली. तुकाराम-रामदासांनी एकनाथांच्या जीवननिष्ठेतील एकेका प्रवृतीचा स्वतंत्रपणे व साकल्याने पाठपुरावा करून तिचा उत्कर्षबिंदू गाठला, आणि धर्मसुधारणेचे व लोकजागृतीचे कार्य त्या काळापुरते पूर्णतेस नेले."

संतांच्या सामाजिक कामगिरीचा सरदारांनी रेखाटलेला हा आलेख असाधारण आहे. आपल्या याच मतांचा पाठपुरावा त्यांनी दोन्ही व्याख्यानांतून विस्ताराने आणि नेटकेपणाने केला आहे. जीवनातील जडतेची

व भेदभावनेची पाळेमुळे खणून काढण्याची स्फूर्ती संतसाहित्यातून सर्वांना मिळावी, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' हे सरदारांचे पुस्तक १९७१ मध्ये प्रसिद्ध झाले. पुण्यास कौशिक व्याख्यानमालेत त्यांनी दिलेल्या तीन व्याख्यानांची संहिता या पुस्तकात समाविष्ट केलेली आहे. ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्व, त्यांचे तत्वचिंतन आणि त्यांची कामगिरी यांचे समालोचन सरदारांनी या पुस्तकांत केले आहे. आत्मानुभवी संत, क्रांतदर्शी तत्त्वज्ञ आणि अभिजात साहित्यिक अशी ज्ञानदेवांची भूमिका असल्याने सरदारांनी इथे सांगितले आहे. महाराष्ट्रातील तळागाळातल्या बांधवांना गीतेतील गतिशील तत्त्वज्ञानाचा ठेवा उपलब्ध करून द्यावा या हेतूने ज्ञानदेवांनी 'भावार्थदीपिका' लिहिली. मुक्तीपेक्षा भक्तीला त्यांनी श्रेष्ठ मानले आहे, हे सरदारांनी स्पष्ट केले आहे. 'तरी झडझडोनि वहिला निघ। इयें भक्तिचिये मार्गा लाग।। असा ज्ञानदेवांचा संदेश आहे. ज्ञानदेवांच्या साहित्याचे जितक्या समरसतेने आणि साकल्याने परिशीलन केले जाईल, तितक्या प्रमाणात त्यांच्या जीवनदृष्टीचे मर्म उकलता येईल, अशी सरदारांची विचारसरणी आहे.

गीतातत्त्व आणि आत्मविद्या ही एकच आहेत, अशी ज्ञानदेवांची धारणा होती. म्हणूनच त्यांनी गीतेवर मराठी भाष्य लिहिले. त्यांच्या मनावर पूर्वसूरींचे संस्कार असले, तरी त्यांची भूमिका स्वतंत्र आहे.

ज्ञानेश्वरी, अनुभवामृत व चांगदेव पासष्टी या तिन्ही ग्रंथांचा आशय पहिला म्हणजे ज्ञानदेव हे साक्षात्कारी कवी होते हे लक्षात येते. ज्ञानदेवांच्या काव्यसृष्टीत सत्य आणि सौंदर्य तसेच ज्ञानोपासना आणि रसास्वाद यांचे अद्वैत आहे असे सरदार सांगतात. ज्ञानदेवांचा साक्षात्कारवाद पोथीनिष्ठ नाही. ती एक जीवनदृष्टी आहे. लौकिक जीवनात जे ज्ञान मिळते त्याने माणसाची भूक शमत नाही. त्यांची दृष्टी प्रत्यक्षाकडून परोक्षाकडे वळते. वास्तवाचे पाश झुगारून देऊन आदर्शाकडे झेप घालणाऱ्या मानवी मनोधर्मात अध्यात्मनिष्ठ साक्षात्कारवादाचा उगम आहे असे सरदारांना वाटते.. साक्षात्काराचे अनुभव हे क्षणाचे असतात, पण ते अनंताला गवसणी घालतात; आणि शाश्वताचे दर्शन घडवून आणतात. विश्वाच्या ऐक्यभावाची जाण आणि शाश्वताची चाहूल यांची अनुभूती एकरस आहे, अशी ज्ञानदेवांची धारणा असल्याचे सरदार सांगतात.

ज्ञानदेवांना गीतातत्त्वाचा चिंतनात आपल्या जीवनदृष्टीचा साक्षात्कार झाला. ज्ञानेश्वरीच्या श्रोत्यांमध्ये ज्ञानी पुरुषांपासून आर्त भक्तांपर्यंत सर्व प्रकारचे लोक होते. त्यामुळे त्यांचे विवेचन श्रोतुसापेक्ष आहे. श्रोत्यांच्या मनांवर आपले म्हणणे कसे ठसेल हे ज्ञानदेवांनी पाहिले आहे. ज्ञानदेवांना आत्मानंदात रंगून जाणे रुचले नाही. त्यांना लोकोद्धाराची तळमळ होती. '*मार्गाधारे वर्तावें। विश्व हे मोहरे लावावें*' ही ज्ञानदेवांची भूमिका सरदारांनी विशद केली आहे.

ज्ञानदेवांचे चिद्विलासमत सरदारांनी उलगडून दाखवले आहे. चैतन्यतत्त्व हे स्फूर्तिमय आहे आणि विश्व हा त्या तत्वाचा विलास आहे, अशी प्रचीती ज्ञानदेवांना येत होती. परमात्मा जगातील नानाविध नामरूपांनी नटला तरी त्याचे एकमेवाद्वितीयत्व भंग पावत नाही. चंद्र आणि चंद्रिका, गूळ आणि गोडी किंवा अग्नी आणि ज्वाला जशी अभिन्न आहेत, तसे परमात्मा आणि जग अभिन्न आहेत. परमेश्वराच्या दर्शनासाठी जग बाजूला सारण्याची गरज नाही. विश्वामध्येच विश्वात्म्याचा शोध घेता येईल. हा ज्ञानदेवांचा विचार सरदारांनी मार्मिकपणे स्पष्ट केला आहे.

अनुक्रमणिका

भक्तिमार्ग सर्वांना खुला आहे म्हणून त्याची गुणवत्ता तिळमात्रही कमी नाही, हे ज्ञानदेवांनी अनेकदा सांगितल्याची आठवण सरदार करून देतात. भक्तिपंथात बाह्य उपचारापेक्षा निखळ भक्तीभाव हे प्रमाण असल्याचे सरदार सांगतात. माणसाचे मन आणि बुद्धी ही ईश्वराकडे वळली की, सगळे जीवनच भक्तिमय होते. मन उपास्य दैवताशी समरस होऊ लागले, म्हणजे हळूहळू भेदबुद्धी लयाला जाते. देव आणि भक्त असा वेगळेपणा उरत नाही. भक्त अद्वैताच्या आनंदात रंगून जातो. त्याची प्रत्येक कृती ही परमेश्वराची पूजा बनते. त्यामुळे त्याला भक्तीसाठी वेगळे असे काही करावे लागत नाही. त्याच्या जीवनात ज्ञान, कर्म व भक्ती ही त्रयी एकजीव होऊन जाते.

विज्ञानपूर्व काळात सर्व क्षेत्रांतील व्यवहार धर्मावर अधिष्ठित होता. धर्म आणि संस्कृती, तसेच अध्यात्मविद्या आणि तत्त्वमीमांसा एकमेकांशी निगडित होती. म्हणूनच समाजजीवनाला नवे वळण लावणाऱ्या या तत्वचिंतकाचे लोकहितासाठी धर्मसुधारणेचे कार्य हाती घेतले. आपल्या तत्त्वज्ञानात समाजाची स्थितीप्रणवता कशी प्रतिबिंबित झाली आहे, हे सरदारांनी स्पष्ट केले आहे. आपले चैतन्यतत्त्व नित्य व निर्विकार आहे. त्याला विकार नाही. ते न बदलणारे आहे. बदल म्हणजे विकृती आणि शबलता अशी आपल्या तत्त्वचिंतकांची कल्पना असल्यामुळे आपल्या विचारधारणेत धारण व रक्षण या कल्पना रुजल्या. पण परिवर्तन व प्रगती या कल्पनांना वाव मिळाला नाही. समाजात बदलाबद्दल एक प्रकारचे भय उत्पन्न झाले. त्यामुळे आपल्या तत्त्वप्रणेत्यांना स्वतःचे विचार जुन्या परंपरेला सोडून नाहीत हे सांगावे लागले. ज्ञानदेव हे त्यांपैकी एक आहेत. त्यांनी आपले तत्त्वज्ञान अद्वैताचा आधार न सोडता निर्विकारतेच्या व नैष्कर्म्याच्या चौकटीतच मांडले, असे सरदारांनी म्हटले आहे.

प्रपंचापेक्षा परमार्थात जीवनाची कृतार्थता आहे, अशी संतांची शिकवण असल्याचे म्हटले जाते. ही समजूत किती फोल आहे हे ज्ञानदेवांच्या साहित्याचा आधारे सरदारांनी स्पष्ट केले आहे. ज्ञानदेवांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा विचार करूनच केले पाहिजे असे सरदारांचे सांगणे आहे. त्या काळच्या परिस्थितीचा विचार करून ज्ञानदेवांनी आध्यात्मनिष्ठ भक्तियोगाचा पुरस्कार केला आहे. संसार सांभळून परमार्थप्राप्ती करून घेता येईल असा आत्मविश्वास समाजात निर्माण केला. आत्मोद्धारासाठी सर्व जातींच्या लोकांना त्यांनी भागवत धर्माची दीक्षा दिली. सर्वसामान्य लोक हे संसारातच राहणारे असल्यामुळे लोकसंस्थेचे रक्षण केले पाहिजे ही भावना लोकमानसात रुजवली. ज्ञानी पुरुषांनी लोकसंग्रहासाठी व इतरांनी चित्तशुद्धीसाठी स्वधर्माचे पालन केले पाहिजे असे सांगितले. ज्ञानदेवांच्या भक्तियोगात पलायनवाद नाही. परिस्थिती बदलण्याची प्रेरणा त्यात नसली, तरी प्राप्त जीवनक्रम सकस व अर्थपूर्ण बनविण्याची शिकवण आहे. असे सरदारांनी सारांशरूपाने सांगितले आहे.

या पुस्तकात सरदारांनी ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचे आणि कार्याचे समालोचन तत्कालीन परिस्थितीच्या प्रकाशात केले आहे. सरदारांनी काढलेले निष्कर्ष लक्षणीय आहेत. ते म्हणतात, त्यावेळच्या सामाजिक व धार्मिक परिस्थितीतही मिळते-जुळते घेऊन ज्ञानेश्वरांनी सामाजिक जीवनातील संकुचितपणा, भेदभावना, भोगपरायणता, उच्चवर्णीयांचा अहंकारव शूद्रातिशूद्रांचा न्यूनगंड या गोष्टींचा निषेध केला आहे. भूतदया, विश्वबंधुत्व, समता, सत्त्वनिष्ठा इत्यादी नीतीतत्वे लोकांच्या जीवनात रुजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. शूद्रातिशूद्रांच्या धर्मजीवनाला विशुद्ध व व्यापक स्वरूप दिले. त्यातील अज्ञान व भीती नाहीशी करून त्याला तत्त्वज्ञान भक्ती व नीती यांचे अधिष्ठान मिळवून दिले. ज्ञानदेवांच्या समतेच्या तत्त्वामुळे सर्व थरांतील लोकांत भागवतधर्माबद्दल आत्मीयता निर्माण झाली. सगळेजण दैनंदिन जीवनातील भेदभाव विसरून,

विठ्ठलाचे भक्त या एकाच नात्याने एकत्र येऊ लागले यावरून ज्ञानेश्वरांची भूमिका व्यापक व सर्वसंग्राहक होती हे दिसून येईल.

सरदारांची ही पुस्तके वाचल्यानंतर काही शंका मनात डोकावतात. एक तर त्यांचे हे सारे विवेचन मराठी संत आणि महाराष्ट्र यांच्यापुरतेच मर्यादित राहिले आहे. त्यांचे गृहीतकृत्यच मर्यादित आहे, असे याविषयीचे समर्थन सुचण्यासारखे आहे. ख्रिस्ती संत तर राहू द्या, पण नरसी मेहता, कबीर, नानक, पुरंदरदास, तुलसीदास, सूरदास, मीराबाई, प्रभृती विविध प्रांतीय आणि विविध भाषिक संतांच्या तुलनात्मक अभ्यासातून महाराष्ट्रीय संतांच्या सामाजिक कार्याची फलश्रुती पारखून पाहणे अधिक प्रत्ययकारी ठरले असते. 'साधू दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले।' या उक्तीचा सुखद प्रत्ययही या तौलनिक परामर्शातून आला असता. भारतीय संत साहित्याच्या भव्य 'कॅनव्हास' वर हे विवेचन अधिक उठून दिसले असते. पण त्या दिशेने थोडाही प्रयत्न या पुस्तकांत केलेला आढळत नाही.

संतांनी जातीयतेचे बंड मोडून काढले, पढीकतेचा निषेध केला, क्षुद्र दैवतांच्या उपासनेवर प्रहार केले व नैतिक गुणांचे श्रेष्ठ आदर्श उभे केले, अशा आशयाचे संतसंकीर्तन या दोन्ही ग्रंथातून सरदारानी केले आहे. प्रश्न पडतो तो असा कि, संतांना प्रबोधन-कार्यात खरोखर घवघवीत यश मिळाले का? मिळाले असे मानले तर, आजही सात शतकांनंतर जातीयता, पढिकता, क्षुद्र दैवतोपासना, चारित्र्यशून्यता इत्यादी दुर्गुणांचे जे अमाप पीक समाजात माजलेले दिसते, त्याचा खुलासा कसा करता येईल? की संतांच्या पदरात यशाचे अधिक झुकते माप आपण कळत-नकळत टाकत आहोत?

विधायक दृष्टीकोनातून संतकार्याचे पहिलेवहिले समालोचन न्या. म. गो. रानडे यांनी केले. ['मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' , मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद, आवृत्ती तिसरी, पुणे, १९२५] 'महाराष्ट्रातील साधुसंतां' नी पुढील गोष्टी साधल्या, असे न्या. रानडे यांचे मत आहे :

१. साधुसंतांस गृहस्थाश्रमाची पवित्रता फार उत्तम तऱ्हेने अवगत होती. संसारत्याग केला म्हणजे मग जगात काळजी किंवा दुःख काही नाही, असा जो सर्व लोकांचा गैरसमज होऊन गेला होता, त्यास चांगले वळण लावण्यास संतमंडळींनी आपल्या हातून होतील तितके प्रयत्न केले...गृहस्थाश्रमाचे पावित्र्य त्यांनी लोकांच्या नजरेस उत्तम तऱ्हेने आणून दिले. पुरातन काळापासून चालत आलेल्या वैराग्यावर नीतीतत्त्वाचा झालेला हा विजय साधारण नव्हे.
२. साधुसंतांनी संस्कृत भाषेस बाजूस सारून मातृभाषेची वाढ व सुधारणा करण्यात आपले सर्व श्रम खर्ची घातले.
३. आपण पूजीत असलेली ही ईश्वराची नानाविध रूपे जाऊन शेवटी एकच देवाधिदेव किंवा ब्रह्म आहे, असे संत मानीत.
४. संतांचा देव मायबाप, बंधुराय व जिवाचा सखा आहे. तो न्यायाधीश, शास्ता किंवा सत्ताधीश नाही. त्याच्या ठिकाणी आईबापांचे प्रेम असते.
५. ईश्वराविषयी ज्ञान संपादन करण्यास भक्तीसारखे दुसरे साधन नाही असे सिद्ध होऊन, वैष्णव पंथातील लोकांची, भक्ती हीच धर्माची मुख्य बाब होऊन बसली. बाह्य पूजा व विधी-उपचार या साधनांपेक्षा भक्तिभावाचे महत्त्व जास्त आहे!
६. शुद्र वर्गाला पारमार्थिक शिक्षण देऊन, समाजामध्ये त्यांचे महत्त्व वाढवून, ब्राह्मणांच्या तोडीस, संतांच्या चळवळीनेच आणून बसविले.
७. कुटुंब-संबंधाने पावित्र्य प्राप्त होऊन स्त्रियांची योग्यता वाढली.

अनुक्रमणिका

संतानी जातिभेद शिथिल केले या न्या. रानडे विचारधारेशी सरदार सुरुवातीला समरस झाले होते. 'संत वाङ्मयाची सामजिक फलश्रुती' भरीव असल्याचा सुखद प्रत्यय तेव्हा त्यांना आला होता. पण आपले हे मत दुरुस्त केले पाहिजे, असे कालान्तराने त्यांना जाणवले. १९७५ मध्ये 'मुंबई व उपनगर मराठी साहित्य समेंलना' तील अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, "दुर्दैवाने ज्ञानेश्वरादी संतांच्या ग्रंथातील तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचे निरुपण शब्दशः प्रमाण मानण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात आजही दृष्टीस पडते. या प्रवृत्तीला विद्यापीठीय अध्ययन-अध्यापनात थारा मिळता कामा नये."

सरदारांचे हे मतान्तर चिंतनीय आहे. ज्ञानेश्वरांनी मायावाद काहीसा बाजूला सारून मांडलेले चिद्विलासाचे तत्त्वज्ञान प्रवृत्तिपर जीवनदृष्टीला पोषकच आहे. कर्मठपणा व कर्मकांड दूर सारून त्यांनी आचारधर्मातील सत्त्वांशाचाच पुरस्कार केला आहे. ही जमेची बाजू ध्यानात न घेता, 'या प्रवृतीला अध्यापनात थारा मिळता कामा नये' असे सरदारांनी सरधोपटणे सांगितले आहे. त्यांचे हे सांगणे सर्वार्थाने मान्य होण्यासारखे नाही. तसेच डॉ. निर्मलकुमार फडकुले यांना दिलेल्या मुलाखतीत सरदार म्हणतात, "संतांना मी पूर्वी झुकतं माप दिलं होतं. आता मात्र मी तसं करीत नाही." [प्रबोधनातील पाऊलखुणा, १९७८, पृ. १३९] समाजाचे सांस्कृतिक नेतृत्व ब्राह्मण-क्षत्रियांच्या बरोबरीने शुद्रातिशूद्रांकडेही जावे ही संतांची दाद्पद अयशस्वी झाली, असे सरदार मानतात. त्यांच्या मतातील हा बदल, ते पुढे मार्क्सवादी विचारसरणीच्या अधिक प्रमाणात आहारी गेल्याचेच द्योतक आहे.

'फलश्रुती' हा ग्रंथ सरदारांनी पन्नास साली प्रसिद्ध केला. अडुसष्ट साली ते सेवानिवृत्त झाले. नंतरच ते दलित साहित्याकडे व दलितांच्या चळवळीकडे वळले. संतकार्याचे फलित हे मर्यादित स्वरूपाचे आहे, असे मतान्तर त्यांनी ऐंशी सालच्या आसपास हिरिरीने मांडले. त्यांच्यातील हे मतपरिवर्तन त्यांच्या दलिताभ्यासाचे कळत-नकळत उमटलेले प्रतिबिंब असावे, असे जाणवते.

ज्ञानेश्वरांच्या निरूपणाचा गाभा 'अध्यात्मनिष्ठ मानवतावाद' हा आहे, असा सरदारांचा आवडता सिद्धांत आहे. ['ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' , १९७१ पृ. ८५] मानवतावादाचा उगम अलीकडचा आहे. माणूस निसर्गाचे अपत्य आहे, असे मानवतावादाचे सांगणे आहे. त्यात ईश्वराला स्थान नाही. त्याचे स्वरूप विज्ञाननिष्ठ आहे. ज्ञानेश्वर हे एकाच वेळी अध्यात्मनिष्ठ व विज्ञाननिष्ठही होते, असे म्हणणे अवघड आहे.

याच पुस्तकात सरदार पुढे लिहितात, "ज्ञानेश्वरांच्या विचारातील नीतीगर्भ अशा सामजिक आशयामुळे यादवकालीन महाराष्ट्रातील समाजाला एक संजीवनी प्राप्त झाली. धर्मग्लानीचे दुष्परिणाम ज्ञानेश्वरांना भोवताली सर्वत्र दिसत होते. ते नाहीसे करून महाराष्ट्रातील धर्मजीवनात त्यांनी नवचैतन्य ओतले." ['ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' , १९७१ पृ. ९७] इथे सरदारांना एका ऐतिहासिक सत्याबद्दल सांगायचे आहे. पण आपले मत त्यांनी मोघमपणाने मांडले आहे. त्यासाठी पुरावा दिलेला नाही. ज्ञानेश्वरी ही गीतेवरील काव्यात्म टीका आहे. ज्ञानेश्वरीतील नैतिक बोध किंवा सामाजिक आशय गीतेप्रमाणेच साधारण स्वरूपाचा आहे. त्या आशयाने सामाजिक दुरिते अजूनही दूर झालेली नाहीत.

"रामदास हे त्या वेळच्या ब्राह्मण-क्षत्रियांचे प्रतिनिधी होत", हे आपले मत सरदारांनी आग्रहाने मांडले आहे. 'ब्राम्हणस्थाने भ्रष्ट झाली।' आणि 'राज्य नेंलें म्लेंच्छिं क्षेत्रीं।' ही रामदासांची वचने उद्धृत करून सरदार म्हणतात, "वरिष्ठ वर्गाची ही विटंबना पाहून रामदासांचे मन उद्विग्न झाले आणि या दीनवाण्या स्थितीतून त्याला मुक्त करण्याचा त्यांनी उद्योग आरंभिला. तत्कालीन परिस्थितीत ज्यांना स्वतःची प्रगती

करून घेण्याची संधी होती, त्या ब्राह्मण-क्षत्रियांनाच समर्थांचा प्रपंचबोध मानवला.” ['संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' १९८२ पृ. ११४-११५]

सरदारांचे हे मत केवळ वस्तूस्थितीनिदर्शक आहे, असे वाटत नाही. त्यांचा समग्र लेख बारकाईने वाचल्यावर त्यातील तक्रारीचा सूर जाणवतो. या प्रश्नाची दुसरी बाजू मांडताना त्र्यं. शं. शेजवलकर लिहितात, 'रामदासांच्या वेळी खरा हिंदुधर्म फक्त ब्राह्मणांत मरत-झुरत अवशिष्ट होता. त्याचे पुनरुज्जीवन करून त्याला पूर्वपदावर आणायचे तर स्वकर्मच्युत पतित ब्राह्मणांचा उद्धार अवश्य होता. त्यामुळे रामदासांनी आपले लिखाण मुख्यतः ब्राह्मणांना उद्देशून लिहिले आहे. ['निवडक लेखसंग्रह' , त्र्यं. शं. शेजवलकर, १९७७, पृ. ३०]

सरदार आणि शेजवलकर यांची ही मते दोन टोकांची आहे. रामदासांच्या लेखनात ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या स्थितीवर भर दिलेला आहे, हे खरे आहे, पण 'सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला।' याचे रामदासांना दुःख आहे. तीर्थयात्रेच्या निमित्ताने रामदासांनी जेव्हा सगळा देश पायाखाली घातला, तेव्हा गोरगरिबांची दैन्यावस्था त्यांनी पाहिली होती. ती स्थिती दूर करण्याचे कर्तव्य ब्राह्मण-क्षत्रियांनीच बजावले पाहिजे अशी रामदासांची धारणा होती. रामदासांनी त्यांना केलेला कर्तव्यबोध हाच त्यांच्या दासबोधातून पुनरुक्त झाला आहे.

संतसाहित्याचे संस्कृतिसंवर्धनासाठी केलेले योगदान स्पष्ट करून सांगताना सरदारांनी जैन पंथ आणि महानुभाव पंथ यांच्या कामगिरीचेही समालोचन केले आहे. दक्षिण भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील जैन पंथाची कामगिरी गौरवास्पद आहे. वैदिक परंपरेतील कर्मठपणा या पंथात नाही. जैनांनी धर्मसाधनेत अंतःशुद्धीला व आत्मविकासाला अग्रस्थान दिले. सर्व जातींच्या लोकांना त्यांनी आपल्या पंथात सारखाच वाव दिला. सनातनी पंडितांच्या बरोबरीने संस्कृत भाषेत ग्रंथरचना करून त्यांनी आपल्या पंथाची प्रतिष्ठा वाढविली, त्याबरोबरच प्राकृत भाषांचेही आत्मीयतेने संगोपन करून बहुजनसमाजात आपल्या धर्मतत्त्वांचा प्रचार केला. मात्र सर्वसामान्य साधकाच्या दृष्टीने जैनांच्या विचारप्रणालीत एकच मोठी उणीव होती. माणूस कितीही आशावादी व प्रयत्नशील असला, तरी केव्हा ना केव्हा तरी आपल्या कमकुवतपणाची जाणीव त्याला होतेच. मग त्याचा धीर खचू लागतो व त्याला एखाद्या गूढ शक्तीचा आधार घ्यावासा वाटतो. मध्ययुगातील तत्त्वचिंतकांनी अशा वेळी. परमेश्वरी शक्तीची कास धरली. पण जैन भिक्षूंनी परमेश्वराचे अस्तित्व नाकारल्यामुळे तो पंथ एकाकी राहिला. तेराव्या शतकात गुजरातमध्ये जैन पंथाचे केंद्र होते. हेमचंद्राच्या काळापासून तिथे श्वेतांबर जैनांचे प्राबल्य होते. आंध्र-कर्नाटकात दिगंबर जैनांची व लिंगायतांची स्पर्धा होती. महाराष्ट्राचे कार्यक्षेत्र मात्र पडीतच होते.

या पार्श्वभूमीवर चक्रधरांनी महाराष्ट्र ही आपली कर्मभूमी मानली आणि मराठीला धर्मभाषेचा मान मिळवून दिला. जैनांच्या मानाने महानुभाव हे वैदिक धर्माला खचितच जवळचे होते, हा मुद्दा सरदारांनी स्पष्ट केला आहे. आपल्या पंचकृष्णांत महानुभवांनी दत्त आणि कृष्ण यांना सामावून घेतले, त्यामुळे त्यांचे वाङ्मय पौराणिक परंपरेशी निगडीत आहे. मात्र महानुभवांच्या आचार-धर्मावर जैन पंथाची छाप आहे.

आत्यंतिक निवृतिवाद हे जैन व महानुभाव या दोन्ही पंथांच्या अपयशाचे महत्त्वाचे कारण असल्याचे सरदारांनी सांगितले आहे. जैनांनी समाजधारणेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले. केवळ व्यक्तीच्या मोक्षाची काळजी वाहिली. संन्यासावर अवास्तव भर दिला. त्यामुळे त्यांना समाजजीवन सुधारता आले नाही. महानुभावांनी निवृत्तिपरतेला प्राधान्य दिले. या दोन्ही पंथांची नीती समाजसन्मुख नव्हती. जगापासून फटकून राहून त्यांनी महंत निर्माण केले. पण लोकजीवनाशी समरस होणारे क्रियाशील संत त्यातून पुढे आले

अनुक्रमणिका

नाहीत. जैन श्रमणांनी संन्यास घेतला, पण श्रावकांना व्यापारात व व्यवहारात पडल्यावर आपल्या एकांतिक धर्मतत्त्वांना बरीच मुरड घालावी लागली. त्यामुळे त्यांच्या आचारात आणि विचारात विसंगती निर्माण झाली. ऐहिक व्यवहाराला तुच्छ लेखणाऱ्या निषेधपर नीतीचा हा परिणाम असल्याने सरदारांनी अचूकपणे नोंदविले आहे.

जैन व महानुभाव यांच्या मठ-संस्थेची युरोपातील मठ-संस्थेशी सरदारांनी तुलना केली आहे. युरोपात ख्रिस्ती मठांनी मोठाच धर्मप्रचार साधला. पण तिथल्या मठाधिकाऱ्यांनी केवळ तत्त्वज्ञान मांडले नाही. ते समाजाचे नेते झाले. शेतीकडे व इतर उद्योगांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यामुळे धर्मजीवनातले ऐक्य राखूनही त्यांना जुनी समाजरचना बदलून टाकता आली. जैन व महानुभाव महंत परमार्थसाधनेतच गुंतून पडले. अहिंसेच्या अतिरेकामुळे शेतीपासून ते दूर राहिले. त्यांना समाजाशी जवळीक साधता आली नाही. महंत आणि साधक यांचे विचारप्रवाह एका दिशेने वाहू शकले नाहीत. सरदारांची ही मीमांसा तर्कसंगत आहे.

यापुढे सरदारांनी महानुभाव व वारकरी पंथ यांच्या कार्याची तुलना केली आहे, चक्रधरांनी देशी भाषेवर भर दिला. महानुभावांची तत्त्ववचने सुटसुटीत आहेत. तरीपण त्यांच्या लेखनावर संस्कृत टीका पद्धतीचा पगडा आहे, महानुभाव आणि वारकरी या दोन्ही पंथांनी मराठीत लेखन केले आहे. मात्र महानुभावांच्या धर्मग्रंथातून कलाविलासच अधिक प्रगत होतो. त्यांनी पंचमहाकाव्यांचा जुनाट साचा पत्करला. त्यामुळे त्यांचे साहित्य सामान्य लोकांना रुचले नाही, असा निष्कर्ष सरदारांनी काढला आहे. वारकरी पंथातील कवींनी श्रोत्यांचा अधिकार व त्यांची आवडनिवड लक्षात घेतली. व जुन्या वाङ्मयाचे अनुकरण न करता आपल्या पंथाच्या वाढीला साजेसे नवे तंत्र त्यांनी स्वीकारले. त्या दृष्टीने ज्ञानेश्वर हे आदर्श भाष्यकार होत. वारकरी संतांची भूमिका प्रेमळ उपदेशकाची व ममताळू मातेची आहे. त्यांची निरुपणे व कीर्तने यांचा घाट वेगळा आहे. चंद्रभागेच्या वाळवंटात हरिनामाचा गजर करीत संत-कीर्तनकारांनी अध्यात्माचे तत्त्वज्ञान व्यवहारातले दाखले देऊन व अनुभव सांगून सोपे करून मांडले.

'वारकरी पंथाचा आधार म्हणजे भोळी भक्ती होय, त्यामुळे अडाणी असलेले असंख्य लोक त्यात सामील झाले,' हा समज बरोबर नसल्याचे सरदारांनी स्पष्ट केले आहे. वारकरी पंथाने पांडित्याचे अवडंबर माजविले नाही, तसेच त्याने अंध भक्तीलाही थारा दिला नाही. ज्ञानोत्तर कर्मप्रधान भक्ती, आत्मशुद्धी व सदाचार यांवर या पंथाने भर दिला.

जैन व महानुभाव या दोन्ही पंथांचे तत्त्वज्ञान आणि कार्य यांचा मागोवा सरदारांनी आरंभी घेतला आहे. त्या पंथांच्या कार्याची मर्यादाही त्यांनी साधार व सविस्तर स्पष्ट केली आहे. आपल्या विवेचनाचा समारोप करताना सरदार म्हणतात, "महानुभाव पंथांचे अपयश हा केवळ दैवयोग नव्हे;याच्या पाठीमागे निश्चित कारण-परंपरा आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात महानुभाव आणि वारकरी या दोन्ही पंथांचा काही विशिष्ट कार्यभाग आहे. मात्र वारकरी पंथाचे कार्य सामाजिक दृष्टीने निःसंशय अधिक व्यापकव मौलिक स्वरूपाचे आहे." महाराष्ट्रातील विविध धर्मपंथांचा इतिहास व परस्परसंबंध अभ्यासताना सरदारांचा हा विचारविमर्श निश्चितच उपयुक्त ठरेल.

संतांनी केलेल्या धार्मिक प्रबोधनांची 'फलश्रुती' विशद करताना सरदारांनी आपल्या चिंतनातून हाती आलेले काही मुद्दे सूत्ररूपाने मांडले आहेत. मराठी संतांचे कार्य हे केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नसून, ती एक व्यापक चळवळ होती. वारकरी संप्रदाय साधासुधा भक्तिपंथ नव्हता. शैव, नाथ, दत्त, चैतन्य आनंद, सुफी इत्यादी पंथांतील संस्कारक्षम भक्तजनांना सामावून घेणारे ते एक सर्वसंग्राहक उपसनापीठ होते;

प्रभावी सांस्कृतिक केंद्र होते. संत मंडळाच्या कार्याची प्रेरणा धार्मिक प्रबोधनाची होती. कनिष्ठ जातीत जन्मलेला आणि विद्येला वंचित झालेला सामान्य माणूस हाच संतांच्या चळवळीचा केंद्रबिंदू होता. या संप्रदायाचे प्रवेशद्वार सर्व जातींच्या व पंथांच्या स्त्रीपुरुषांना खुले होते. त्यात जन्मसिद्ध अधिकारभेद व उच्चनीच भाव यांना थारा नव्हता.

संतानी समाजव्यवस्थेची चौकट न बदलता जातिसंस्थेतील विषमता व न्यूनगंड कमी करण्याकडे लक्ष पुरविले. नवे काही घडवावे अशी त्यांची आकांक्षा नव्हतीच. जे सामाजिक संबंध परंपरेने रूढ झालेले होते, त्यात सुसंवाद साधावा व त्यांना अर्थपूर्णता आणावी असा त्यांचा इरादा होता.

संतांचे धोरण हे समन्वयशीलतेचे होते. त्यांनी आपल्या तत्त्वनिरुपणात अध्यात्मनिष्ठा व मानवतावाद, निर्गुणोपासना व सगुण भक्ती, गुरुबोध व आत्मप्रतीती इत्यादी गोष्टींचा समन्वय साधला. त्यांची दृष्टी मुख्यतः विधायक होती.

क्षुद्र देवता-भक्तीचा निषेद करून संतानी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला;पण कुळधर्म, जातिधर्म व ग्रामदेवता-पूजन चालू ठेवण्याची मोकळीक दिली. त्यामुळे परमार्थसिद्धीसाठी विठ्ठलभक्ती आणि कामनापुर्तीसाठी क्षुद्र देवतांची आराधना असा दुटप्पीपणा धर्मजीवनात आला.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या मायबोलीला संतांनी वाङ्मयीन माध्यमाची प्रतिष्ठा मिळवून दिली. मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांविषयी स्वत्वभावना निर्माण केली. जातपात व गावगाडा यांच्या कक्षा ओलांडून जाणाऱ्या प्रादेशिक एकात्मतेची जाणीव त्यांनी करून दिली. तिच्यातून महाराष्ट्रमंडळ व महाराष्ट्रधर्म या संकल्पना उदयास आल्या.

संतांच्या यशापयशाचा निर्णय करताना आजचे निकष लावण्यात अर्थ नाही. संत चळवळीमुळे जातिभेद, अंधश्रद्धा व रुढींचे दास्य यांचे प्रस्थ कमी झाले काय, अशा प्रश्नांचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल. पण त्यामुळे संतांचे कार्य सर्वस्वी वाया गेले, असे आपण म्हणू शकत नाही. हा लांब पल्ल्याचा मार्ग आहे. त्याच्या प्रत्येक टप्प्यावरील अपयशात भावी यशाची बीजे दडली आहेत. वेळोवेळी अशी अपयशे पचवून आपल्याला यशाचे शिखर गाठता येणार आहे, असा आशावाद सरदारांनी व्यक्त केला आहे. त्यांचा हा दृष्टिकोन खरोखरच स्पृहणीय आहे.

सरदारांच्या या दृष्टीकोनाचे महत्त्वमापन अन्य समीक्षकांनी मांडलेल्या मतांच्या पार्श्वभूमीवर करून उपयुक्त ठरेल. न. र. फाटक, बा. र. सुंठणकर, गो. म. कुलकर्णी आणि स. मा. गर्गे हे सर्वजन सरदारांच्या पिढीच्या आगेमागे असलेले विमर्शकार होत. सदानंद मोरे आणि र. बा. मंचरकर हे दोघेजण आजच्या पिढीतील अभ्यासक आहेत. जुन्या –नव्या पिढ्यांचे प्रतिनिधी म्हणून या सर्वांची संतकाव्यविषयक समीक्षा कोणत्या स्वरुपाची आहे, याचा इथे मागोवा घ्यायचा आहे. त्या समीक्षेच्या संदर्भात सरदारांच्या संतसाहित्यमिमांसेचे योगदान अजमावणे सुलभ होईल.

संत निवृत्तिवादी होते, हे वि. का. राजवाडे यांचे मत न. र. फाटक, बा. र. सुंठणकर व ग. बा. सरदार या तिन्ही विचारवंतांना मान्य नाही. मात्र त्यांच्या भूमिकेच्या मांडणीत थोडीफार भिन्नताही आहे. ती समजून घेणे उपयुक्त ठरेल. सरदारांचे प्रतिपाद्य त्यामुळे अधिक स्पष्ट होऊ शकेल.

अनुक्रमणिका

इस्लामी आक्रमकपणाला तोंड देण्यासाठीच भागवतधर्माचा उदय झाला; आणि त्या संकटातून महाराष्ट्राला सोडविण्यासाठी ज्ञानेश्वरांनी आपले गीताभाष्य लिहिले, असे फाटक ठासून सांगतात. ['श्रीज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य' , न. र. फाटक, १९७४, पृ. २२-२६] विठ्ठलभक्तीच्या रूपाने एकेश्वरमताचे प्रवर्तन, परमार्थाच्या प्रांतातील जातिनिरपेक्ष समतेचा मंत्रजागर आणि सद्‌गुणांचे संवर्धन यांच्या बळावर संतांनी संघटना उभी केली, असा फाटकांच्या विवेचनाचा रोख आहे. फाटकांचे संतप्रेम बलवत्तर असल्यामुळे त्यांच्या एकूण विवेचनात, 'इतिहास –चिकित्सेपेक्षा एक नवी बौद्धिक सर्कसच' अधिक आहे, हे पु. ग. सहस्रबुद्धे यांनी सविस्तर स्पष्ट केले आहे. ['माझे चिंतन' , पू. ग. सहस्राबुद्धे १९५५, पृ. ५०-५५]

बा. र. सुंठणकरांनी साम्यवादी भूमिकेतून संतकार्याची पाठराखण केली आहे. ['महाराष्ट्रीय संतमंडळांचे ऐतिहासिक कार्य' , बा. रं. सुंठणकर १९४८, पृ. ३४-३८] कारागीर, व्यापारी, स्त्री, शुद्र इत्यादी कनिष्ठ गणलेल्या वर्गातून व जातींतून संत चळवळ उदयास आली. हा वर्ग दीन, दरिद्री व निराशाग्रस्त होता. राजे लोक व ब्राह्मण सरंजामदार या वर्गाला पिळून काढीत होते. त्या वर्गाला जीवन असह्य झाले होते. त्यातून भक्तिमार्ग ही पळवाट संतांनी निर्माण केली. संतांची चळवळ हे पुरोहीतशाहीविरुद्ध बंड होते, असे सुंठणकर सांगतात. मात्र या कार्यात संतांना अपयश आले. तो दोष परिस्थितीचा आहे;संतांचा नाही, असे सुंठणकरांचे म्हणणे आहे. नामदेव शिंपी, नरहरी सोनार, गोरा कुंभार वगैरे संत अलुतेदार –बलुतेदार वर्गातले होते. या वर्गाचे जीवन रूढ समाजव्यवस्थेवर अवलंबून होते. त्यामुळे त्या व्यवस्थेविरुद्ध बंड करण्याची मनोवृत्ती या वर्गात निर्माण होणे शक्य नव्हते. ती व्यवस्था उलथून पाडणे म्हणजे आत्मनाश करून घेण्यासारखे झाले असते. ही व्यवस्था सोडली तर स्वतःच्या चरितार्थाची हमी हा वर्ग गमावून बसला असता. म्हणूनच संतांनी ति समाजव्यवस्था उद्‌ध्वस्त केली नाही, असे सुंठणकरांचे तर्कशास्त्र आहे. म्हणजे संतांनी क्रांती केली नाही, ती त्यांच्या पोटावर पाय आला असता म्हणून केली नाही, अशी सुंठणकरांची (अजब) मीमांसा आहे.

सुंठणकरांच्या तुलनेने सरदारांनी केलेली संतकार्याची चिकित्सा अधिक समतोल आहे. मात्र सरदारांचीही दोन मते सहज स्वीकारता येण्याजोगी नाहीत. पहिले म्हणजे भौतिक दुरवस्थेमुळे अगतिक झालेल्या जनतेला त्या स्थितीतून मुक्त करण्यासाठी संतांची चळवळ जन्माला आली होती, असे ते म्हणतात. पण भौतिक दुरवस्था दूर करण्याचा प्रत्यक्षपणे प्रयत्न संतांनी केला होता, असे दिसत नाही. संतांनी एवढेच सांगितले की, गरीबीतही मन समाधानी ठेवावे, विठ्ठलाची भक्ती करावी, संकटे शांतपणे सोसावीत; आणि आंतर जीवन समृद्ध ठेवावे. संत सांसारिक संकटांवर मत करायला सांगतात, ती या प्रकारे!

सरदारांचे दुसरे मतही चिन्तनीय आहे. कारागीर आणि शेतकरी यांना प्रयत्नवादाचे पाठ देण्याची मुळीच गरज नव्हती, कारण ते दिवसभर खपतच होते. आता 'दिवसभर खपणे' म्हणजे प्रयत्नवाद नव्हे, हे उघड आहे, शेती समृद्ध करणे व व्यवसाय जिद्दीने वाढविणे ही प्रयत्नवादाची लक्षणे या वर्गात आढळून येत नव्हती, हे मान्य करायला हवे.

आजच्या अभिव्यक्तिप्रवण नवसमीक्षेकडून संतसाहित्यातील अध्यात्मिक आशयाकडे दुर्लक्ष होण्याचा धोका संभवतो, हे गो. म. कुलकर्णी यांनी नेमकेपणाने सांगितले आहे. [साहित्यविचार आणि समाजचिंतन, गो. म. कुलकर्णी १९६८, पृ. ३०] आजची रसिक दृष्टी शुद्ध कलावादाकडे विशेष झुकणारी असल्यामुळे त्या भूमिकेवरून संतसाहित्याची मीमांसा होण्याची शक्यता आहे. तसे झाले तर प्रचारपीडीत संतविषयक साहित्यसृष्टीवर तो एक चांगलाच उतारा ठरेल, असे त्यांना वाटते.

अनुक्रमणिका

वास्तविक श्रेष्ठ सौंदर्यमूल्ये व श्रेष्ठ अध्यात्ममूल्ये यांत विरोध असण्याचे कारण नाही. ती मूल्ये परस्परांना पोषकच असतात. सत्यान्वेषणाला संतसाहित्यातील शुद्ध आध्यात्मिक पातळीने कसे साह्य केले आहे, हे समजून घेणे जरुरीचे आहे. अध्यात्म व काव्यसौंदर्य हे अलग करण्यासारखे घटक नाहीत. एखादे तत्वज्ञान सांगणे हा काव्याचा प्रधान हेतू नसला, तरी जीवनभाष्याचे तात्त्विक अधिष्ठान असल्यावाचून काव्याला सौंदर्यशोधाचे व आनंदबोधाचे आपले ईप्सित पूर्ण करता येत नाही. काव्यमयता व तत्त्वपरता यांत वस्तुतः विरोध नसतो. त्या दोहांतून मिळून कवीचे समग्र व्यक्तिमत्त्व प्रगत होत असते. 'काव्य हा मानवी ज्ञानाचा, भावनेचा व भाषेचा सुंगध आहे. असे कोलरिज् या कवीने म्हटले आहे.

सांस्कृतिक परिवर्तनाच्या संदर्भात संतांच्या कामगिरीचे यथोचित मूल्यांकन स. मा. गर्गे यांनी केले आहे. ['इतिहासाचा सामाजिक वेध' , स. मा. गर्गे १९९५, पृ. १६-१७] ज्ञानदेवांच्या समविचारी व्यक्ती सर्व जातीपातींच्या होत्या. त्यात नामदेव, गोरोबा, विसोबा, चोखोबा, नरहरी, रोहिदास, सावता माळी आशा अनेक प्रतिभाशाली भक्तकवींचा समावेश होतो. ते सारख्याच भक्तिभावाने व समतेच्या तळमळीने प्रेरित झालेले होते. समाजाच्या दलित वर्ग व स्त्रीवर्ग या दोन्ही उपेक्षित वर्गांना धार्मिक ग्रंथांचे अध्ययन करण्याची संधी मिळाली. समाजमानस अनेक देवदेवतांकडून एक-देवत्वाकडे वळले. पंढरीच्या वारीच्या निमित्ताने समाज संघटीतपणे समान दिशेने जाऊ लागला. सामान्य माणसाला पारमार्थिक मार्ग सुलभ झाला. धर्म आणि तत्त्वज्ञान यांचे विवेचन लोकभाषेत होऊ लागले. ज्ञानदेवांनी संन्यास मार्गाचा पुरस्कार केला नाही;मठ-स्थापना केली नाही. लोकांना संसारात राहून व आपले उपजीविकेचे व्यवसाय सांभाळून भक्तीचा सोपा, सुटसुटीत मार्ग चोखाळता येऊ लागला. सर्वांनाच लोकभाषेत उपासना करता येऊ लागली.

मात्र समाजाने वर्ण व जाती सोडल्या नव्हत्या. त्यांचा पीळ काही प्रमाणात सैल होऊ लागला, एवढे म्हणता येईल. हजारो लोक भक्तीच्या केंद्राकडे प्रवास करू लागले. समाज ढवळून निघण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. परिवर्तनाचे हे मर्यादित यश होय. पण साठ-सत्तर वर्षांतच त्याची समाप्ती झाली. पुन्हा समाज जुन्या मार्गाने जाऊ लागला. औषधयोजना कितीही मूलगामी असली, तरी अनेक शतके समाजपुरुषाच्या शरीरात मुरलेला आजार चार दोन दशकांतच नाहीसा होणे शक्य नव्हते, असे निदान गर्गे यांनी केले आहे.

'संतसाहित्याचे समाजशास्त्रीय अध्ययन' करण्याची गरज सदानंद मोरे यंनी स्पष्ट केली आहे. ['संतसाहित्य, अभ्यासाच्या काही दिश' , संपादक : कल्याण काळे आणि रा. शं. नगरकर, १९९२, पृ. ६६ ते ७७] संतसाहित्य हे मुख्यतः धार्मिक साहित्य आहे. संतानी व्यवहारात जातिभेद का मोडले नाहीत, असा प्रश्न करणाऱ्यांना समाजशास्त्रच कळलेले नसते. वारकरी संप्रदायात सामील झालेले लोक या ना त्या मार्गाने उत्पादन प्रक्रियेशी निगडीत असलेले आहेत. इतकेच नव्हे तर या संप्रदायाच्या कर्मकांडाचे वेळापत्रक उत्पादनाला बाधा येणार नाही, असेच केलेले आहे. भौतिक उत्पादनाला धक्का न लावता श्रमाच्या अंज उत्पादनाच्या व्यवसायांचे उन्नयन करून धार्मिक वैचारिकतेच्या चौकटीत सर्वांना समानता देणारी संतांची चळवळ होती. त्यामुळे जे भेदाभेद उरतात, ते केवळ एक व्यावहारिक सोय म्हणून. त्या मागचा धार्मिक व अध्यात्मिक बागलबोवा केव्हाच अदृश्य होतो. पर्यायी उत्पादनव्यवस्था आल्याबरोबर जातीव्यवस्था पूर्णपणे मोडण्यासाठी जी अनुकूल वैचारिकता हवी होती, ती संतसाहित्याने व आंदोलनाने महाराष्ट्रात अगोदरच निर्माण केलेली होती. भारतातील इतर प्रांतांपेक्षा महाराष्ट्रातच समाजचिंतक अधिक निर्माण झाले, याची कारणमीमांसा करताना कितीही हातचे राखायचे म्हटले, तरी संतांना श्रेय द्यावेच लागते. संतकार्याची ही जमेची बाजू मोरे यांनी स्वायत्त दृष्टीकोनातून मांडली आहे.

अनुक्रमणिका

संत परतत्त्वाचे उपासक असले तरी समाजाविषयी उदासीन नव्हते, हे प्रमेय र. बा. मंचरकरांनी मार्मिकपणे विशद केले आहे. ['संतसाहित्य, आभासाच्या काही दिशा' , संपादक : कल्याण काळे आणि रा. शं. नगरकर, १९९२, पृ. ५०] संतांच्या काव्यदृष्टीत, तत्वदृष्टीत व काव्यसृष्टीत विलगीकरणाला जागा नाही. आपल्या जीवनात त्यांनी समाजभिमुख क्रियाशील नैतिक भूमिका घेतली. जीवमात्राविषयीच्या कळवळयाने ते स्वतःच्या व इतरांच्या सुखदुःखाशी समरस झाले. त्यातून आलेल्या विविध सुखदुःखांच्या तीव्र, तरल, राकट आणि कोमल अनुभवांचा त्यांनी आपल्या साहित्यातून आविष्कार केला. जीवनाच्या समग्रतेने भान राखून आपले सबंध अस्तित्व त्यांनी आपल्या लेखनात उमटवले. संतसाहित्यातील सर्वभूतांच्या हिताची दृष्टी माणसांच्या मनांना बांधते, असा निष्कर्ष मंचरकरांनी काढला आहे.

**'फलश्रुती' चा इंग्रजी अनुवाद**

सरदारांच्या संतकाव्य समालोचन परिचय अ-मराठी भाषिकांनाही होणे जरुरीचे होते. त्या हेतूने 'संत वाङ्मयांची सामाजिक फलश्रुती' या सरदारांच्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद डॉ. कुमुद मेहता यांनी केला आहे. 'दि सेन्ट-पोएट्स ऑफ महाराष्ट्र : देअर इम्पॅक्ट ऑन सोसायटी' या नावाने हा अनुवाद प्रकाशित झाला आहे अनुवाद १९६९ मध्ये प्रसिद्ध झाला. 'फलश्रुती' चीतिसरी आवृत्ती वर्षभराने, म्हणजे १९७० मध्ये प्रसिद्ध झाली. त्यामुळे डॉ. मेहतांना १९६२ मधील 'फलश्रुती' ची दुसरी आवृत्ती वापरावी लागली. दिल्लीहून' ओरीएन्ट लॉंगमन्स' या कंपनीने या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन केले.

अनुवादित इंग्रजी पुस्तकात डॉ. मेहता यांनी अद्वैत, गुण, ओवी, समाधी, वतन, विराणी, इत्यादी साठ संज्ञांची तीन पानी 'ग्लॅासरी' दिली आहे, तेवढी पाने वजा केली, तर अनुवादित इंग्रजी पुस्तक डेमी १५७ पानांचे आहे. 'फलश्रुती' क्राऊन १३२ पानी आहे.

मध्ययुगीन मराठीतील, संतपरंपरेतील व संतकाव्यातील संकल्पना इंग्रजीत आणताना डॉ. मेहता यांनी आपले अनुवादकौशल्य प्रगट केले आहे. '*सरदारांची सोडों नये संगती। चालों नये आणिकें पंथी।*' , हे पथ्य त्यांनी पाळले आहे. तरीपण मूळ मराठीतील भावार्थ इंग्रजीत नेमकेपणाने व्यक्त व्हावा म्हणून त्यांना जरूर तेथे विस्तार करावा लागला आहे. सरदारांची मुळातील अल्पाक्षर पण अर्थबहुल असलेली गद्य शैली इंग्रजीत अवरताना थोड्याबहुत विस्ताराचा अवलंब करते. त्याशिवाय ती शैली यथार्थ आत्मप्रगटीकरण करू शकत नाही. त्यामुळे मुळापेक्षा काही पानांची वाढ समर्थनीयच म्हटली पाहिजे.

डॉ. मेहता यांनी केलेला हा अनुवाद मूळ मराठी सहिंतेस समुचित न्याय देणारा आहे. या बाबतीत एखादे उदाहरणही पुरेसे ठरेल.

**मराठी संहिता :**

"... तेव्हा संत-चळवळ ही सामाजिक लढ्यापासून लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून, धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कासाठी सनदशीरपणे झगडणारी सुधारणावादी चळवळ होती". (फलश्रुती आ. २ री, पृ. १९)

**इंग्रजी अनुवाद** :

"...The movement of the saints has, therefore, not a reactionary force seeking to divert people from the social struggle; it was a movement for reform which, within the sphere of religious life, fought in an orderly manner for their rights". (-The saint –poets of Maharashtra, 1969, p. 21)

अनुवादित मजकूर हा परभृत नसून, अनुवाद-भाषेतील मूळचाच तो आशय आहे. असे जाणवावे, हा जर अनुवाद –कौशल्याचा निकष मानला, तर डॉ. मेहतांचा समग्र अनुवाद –प्रकल्प सफळ झाला आहे, असे म्हणता येईल. त्यांच्या या अनुवाद-कार्यामुळे सरदारांचा संत-विचार इंग्रजी वाचकांनाही योग्य स्वरुपात उपलब्ध झाला आहे.

संतजनांनी भक्तीच्या क्षेत्रात उच्च-नीच, स्त्री-पुरुष व लहान-थोर अशा सर्वांचेच स्वागत केले, हे सरदारांच्या संत-समालोचनाचे मध्यवर्ती विचारसूत्र त्यांच्या ग्रंथातून स्पष्ट झाले आहे. त्यांचे हे प्रतिपाद्य बरोबरच आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. *'या लागी पापयोनीही अर्जुना। कां वैश्य शूद्र अंगना। मातें भजंता सदना-। माझिये येती।।'* असा दिलासा ज्ञानेश्वरानीं भगवंताच्या मुखातून दिला आहे. हा दृष्टिकोन सरदारांनी 'अध्यात्मिक मानवतावाद 'या शब्दात मांडला आहे.

-पण या उदारमतवादालाही एक महत्वाची मर्यादा होती. पारमार्थिक समतेचे मुक्त वातावरण फक्त चंद्रभागेच्या वाळवंटात होते. गावगाड्यातील भौतिक व्यवहार श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या विळख्यातून सुटलेले नव्हते. संत जसे परमार्थी होते तसेच ते प्रापंचिकही होते. देवाच्या दरबारात घेतलेला त्यांचा मोकळा श्वास गावगाड्यातल्या शिवाशिवीच्या वातावरणांत कोंडला जात होता. खालच्या वर्णातील संतांना ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीत मानाचे स्थान असले, तरी गावकीत त्यांची जागा वर्तुळाबाहेरचीच होती. चोखोबांची कुसवाखालची वेठबिगार सुटत नव्हती. संतमेळा नामदेवांच्या वाड्यात गोळा झाला, तेव्हा 'बाहेर कामासी गुंतले' असे म्हणून जनाबाईंना अंगणातच थांबावे लागले. त्यांचे दासीपण सुटलेले नव्हते. देवदासीपणाच्या शिक्क्यामुळे व्रतस्थ कान्होपात्रा जननिंदेचा विषय झाली होती.

संतांचे पाय ज्या भूमीत रुतलेले होते, ती भूमी सामाजिक विषमतेच्या कर्दमाने भरलेली होती. त्यांची उपेक्षा कधी जातिव्यवस्थेमुळे, तर कधी प्रतिष्ठेच्या विकृत कल्पनांमुळे होत राहिली. *'द्विजी वाळियेले। जगीं सांडियेले। शेखीं अपेक्षिले। आप्तवर्गी।।'* या दारूण अनुभवामुळे ज्ञानदेवांसारख्या शांतीच्या सरोवरावरही वादळे उठली होती. म्हणूनच मध्युगात 'पारमार्थिक लोकशाही' उदयाला आली ; आणि संतांनी 'अध्यात्मिक मानवतावादा' ची पायाभरणी केली, हे मत मर्यादित अर्थानेच स्वीकारले पाहिजे. *'चोखा डोंगा परि भाव नव्हे डोंगा।'* किवां, *'म्हणती या महाराने देव बाटविला। जिवें मारा त्याला, बैल जुंपा'।* चोखोबांच्या या उद्गारांत आर्तता आणि असहायता आहे पण त्यांनी मर्यादेचा उंबरठा ओलांडला नाही. बंडाचा झेंडा घेऊन वेगळी वाट चोखाळली नाही. त्याचे दुःख महाद्वाराच्या पायरीपाशी ओथंबून राहिले.

अनुक्रमणिका

लक्षावधी स्त्री-पुरुषांच्या निःसत्व जीवनक्रमाला अध्यात्माची जोड देण्यामागील वारकरी संतांचा उदार दृष्टिकोन स्वागतार्ह होता. लोकसंख्या रक्षणीय मानून परंपरेच्या चौकटीत संतांनी नवा प्रकाश आणला हे जितके खरे आहे, तितकेच भौतिक जीवनातील वर्णव्यवस्थेची चौकट ते मांडू शकले नाहीत, हेही खरे आहे, "संतांना तत्कालीन समाजव्यवस्थेत ढवळाढवळ करायची नव्हती", असे सरदार म्हणतात. ['संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' १९७०. पृ. १४] पण एवढे म्हणून हा प्रश्न संपत नाही. त्याऐवजी, तत्कालीन समाजजीवन धर्मप्रवाहापसून अलिप्त नव्हते, हे ध्यानात घेऊन संतकार्याच्या योगदानाबरोबरच त्यांची मर्यादाही सरदारांनी मोकळेपणाने मंडळी असती, तर त्यांचे संतविषयक विवेचन अधिक वस्तुनिष्ठ व प्रत्ययकारी झाले असते.

भक्तीपंथाने जीवनाची व्यापक आणि समतोल अशी दृष्टी दिली, या दृष्टिकोनाचे वेगळेपण समाजाच्या भौतिक पार्श्वभूमीवर सरदारांनी तपासले. संत मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक अस्मितेचे आणि सांस्कृतिक ऐक्यभावाचे खरे शिल्पकार होत, असा सरदारांचा निष्कर्ष आहे. जीवनातील जडतेची व भेदभावाची पाळेमुळे खणून काढण्याची प्रेरणा संतसाहित्यातून तुम्हा-आम्हाला मिळावी, अशी इच्छा सरदारांनी व्यक्त केली.

साहित्याचा मूलाधार असलेल्या समाजजीवनाकडे आणि वैचारिक प्रबोधनाकडे सरदारांचे अधिक लक्ष होते. सामाजिक वास्तवाचा वेध घेणे त्यांना जरुरीचे वाटे. दलित आणि ग्रामीण जीवनाविषयी त्यांना विलक्षण जिव्हाळा होता. अस्पृश्यता आजवर राहण्याचे कारण केवळ दलितांचे मागासलेपण व गरिबी हे नव्हे. आपल्या धर्मविचारातील पापयोनित्वाची व स्पर्शजन्य विटाळाची कल्पना हे त्याचे खरे कारण आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे. आपली समाजव्यवस्था जातिबद्ध असल्यामुळे तिच्यातील एका थरातील वेदना दुसऱ्या थराला कळू शकत नाही. यासाठी 'अमंगळ भेदाभेद' संपले पाहिजेत. पुरोगामी समाजजीवनासाठी विज्ञाननिष्ठेचा अवलंब केला पाहिजे. आंधळी श्रद्धा संपली पाहिजे, असे ते सांगतात. त्यांच्या विचारधारेत आत्मीयता आहे. पण अभिनिवेश नाही. स्वातंत्र्योत्तर काळात माणसाला चैतन्यशील जीवननिष्ठा व मानवतेची प्रतिष्ठा देण्याचे कार्य त्यांच्या लेखणीने व वाणीने निष्ठापूर्वक बजावले आहे. म्हणूनच महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासात सरदारांच्या संतमीमांसेचे स्थान अनन्यसाधारण स्वरूपाचे आणि महत्त्वाचे आहे.

अनुक्रमणिका

## ५.
## समाजप्रबोधनाची मीमांसा

प्रबोधन ही संकल्पना आधुनिक आहे. युरोपीय विचारवंतांकडून आपल्याकडे ही संकल्पना आली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभकाळात भारतामध्ये प्रबोधन-पर्व सुरु झाले. राजा राममोहन रॉय हे 'भारतीय प्रबोधनाचे पहिले प्रणेते' मानले जातात. ज्ञानोपासना, प्रचलित मूल्यांची नवी मांडणी व मानवतावाद अशी प्रबोधनाची तीन अंगे आहेत.

'प्रबोधन' (रिनेसान्स) या संकल्पनेतील ज्ञानोपासनेचे अंग व्यापक आहे. परंपरेने चालत आलेले ज्ञान बाजूला सारणे व जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी देणे असे या ज्ञानोपासनेचे स्वरूप आहे.

प्रबोधनाचे दुसरे अंग म्हणजे प्रचलित मूल्यव्यवस्थेचा पुनर्विचार होय. मुल्यविषयक जुन्या रूढ कल्पना व वैचारिक धारणा बदलत्या परिस्थितीत काहीशा निरुपयोगी किंवा जाचक होण्याची शक्यता असते. त्यासाठी विचारवंताना नव्या मूल्यव्यवस्थेची गरज जाणवते. परंपरा आणि नवता यांच्यातील संघर्ष प्रबोधनकाळात अपरिहार्य असतो. ज्ञानदेवांना, नाथांना व तुकोबांना अशा संघर्षास सामोरे जावे लागते.

मानवतावाद हा प्रबोधनाचा महत्त्वाचा घटक असतो. जुन्या मूल्यांची नवी मांडणी केल्यावर घडणारे ते फलित असते. त्यामुळे समाजात समता आणि बंधुता यांविषयीची ओढ निर्माण होते.

प्रबोधनाचे हे तिन्ही घटक लक्ष्यात घेऊनच सरदारांनी प्रबोधनाची मीमांसा केली आहे. त्यांच्या निवडक ग्रंथांच्या आधारे या मिमांसेचा परिचय करून घ्यायचा आहे. त्यांच्या पुढील ग्रंथांतून हे विवेचन आले आहे :

महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी (१९४१), रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा (१९७३) आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार (१९७५), प्रबोधनातील पाऊलखुणा (१९७८), महात्मा फुले : विचार आणि कार्य(१९८१), नव्या युगाची स्पंदने (१९८४), नव्या उर्मी : नवी क्षितिजे (१९८७), परंपरा आणि परिवर्तन(१९८८).

'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी (१९४१) या पुस्तकात सरदारांनी एक स्वायत्त विचार मांडला आहे. रानडे-चिपळूणकरांनी महाराष्ट्र देशाच्या थंड गोळ्याला प्रथम चेतना दिली, हे प्रमेय सरदारांना मान्य नाही. अव्वल इंग्रजीतील भाऊ महाजन लोकहितवादी, विष्णूबावा ब्रह्मचारी जोतीराव फुले व विष्णुशास्त्री पंडित या उपेक्षित मानकऱ्यांचे कार्य सरदारांनी मार्मिकपणे विशद केले आहे. या प्रत्येकाचे कार्यक्षेत्र जरी वेगवेगळे असले तरी प्रतिकूल परिस्थितीत समाजहितासाठी त्या सर्वांनी कर्तव्यबुद्धीने आपल्या हाडांची काडे केली. त्यांच्या कार्याचा उगम लहान असला तरी धैर्य, त्याग व निष्ठा या गुणांत रानडे –चिपळूणकरांची बरोबरी या कार्यकर्त्यांनी केली. त्यांची उपेक्षा करणे इष्ट नाही.

भाऊ महाजन-लोकहितवादी-फुले प्रभृती विचाराग्रणींनी लोकशिक्षणाचे कार्य प्रथम हाती घेतले. आपल्या समाजाची कुवत त्यांना कळून चुकली होती. पूर्वजांच्या गतकालीन वैभवाचे गोडवे गाऊन त्यांनी प्रतिगामी पांढरपेशा वर्गाची खुशामत केली नाही. इंग्लडसारख्या प्रगत व बलाढ्य देशासी आपली गाठ आहे,

याचे त्यांना भान होते. समाज समर्थ व सुसंघटीत झाल्याशिवाय स्वातंत्र्य-संपादनाच्या वल्गना करण्यात हशील नाही ते जाणून होते. लोकनिंदेची परवा न करता, त्यांनी आपल्या समाजातील दोषांची निर्भीडपणे चिकित्सा केली. सवंग लोकप्रियतेचा मोह न बाळगता त्यांनी जनतेला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त केले. परंपरागत रूढ कल्पनांवर त्यांनी आघात केले. त्यांच्या तत्त्वांना समाजाने आता मान्यता दिली आहे. या पाच समाजसुधारकांच्या कार्याचे सरदारांनी केलेले समालोचन त्या सुधारकांना न्याय देणारे आहे.

'न्या. रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा' (१९७३) हे सरदारांचे पुस्तक पुणे विद्यापीठाच्या 'सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाले' तून सिद्ध झालेले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात झालेल्या सामाजप्रबोधनाला न्या. रानडे यांच्या कार्यातून गती मिळाली. ते महाराष्ट्रातील उदारमतवादाचे श्रेष्ठ प्रवक्ते होते. त्यांनी संस्थात्मक जीवनाचा पाया घातला. त्यांच्या कार्यामागील तात्त्विक अधिष्ठान व सामाजिक चळवळीतील त्यांचे स्थान सरदारांनी स्पष्ट केले आहे. ज्ञानसमृद्धीसाठी इंग्रजीचा व्यासंग आणि भाषिक प्रगतीसाठी संस्कृतचा व्यासंग असा समतोलपणा आपल्या शैक्षणिक धोरणात रानडे यांनी राखला. त्याचा योग्य परिणाम त्याच्या सुधारणावादावर झाला. प्रागतिक विचारला कृतिशीलतेची जोड देऊन त्यांना समाजजीवनात परिवर्तन घडवून आणायचे होते. त्यांचा पिंड विचारवंताचा असला, तरी अमूर्त तत्त्वचिंतनात त्यांना रस नव्हता व भारतीय समाजाच्या पुनरुत्थानाची त्यांना उत्कंठा होती, हे सरदारांनी स्पष्ट केले आहे. रानडे समाजजीवनाचे केवळ भाष्यकार नव्हते; ते त्यांचे शिल्पकार होते. त्यांनी देशातील सुशिक्षितांचे नेतृत्व स्वीकारले. आशावाद व प्रयत्नशीलता त्यांच्या ठायी उत्कट होती. मनुष्यामात्राबद्दल खोल सहानुभूती हा त्यांच्या वृत्तीचा स्थायिभाव होता. विधायक दृष्टी व समन्वयशीलता हि त्यांच्या धोरणाची प्रमुख अंगे होती. ते धर्मनिष्ठ होते, पण त्यांची वृत्ती सांप्रदायिक नव्हती; जात, पंथ व देश यांच्या सीमांपलीकडील एकेश्वरी धर्मकल्पनेचा प्रभाव त्यांच्या मनावर होता.

रानडे यांनी १८७० च्या सुमारास सामाजिक प्रबोधनाच्या व सुधारणेच्या चळवळीची सूत्रे हाती घेतली. जांभेकर, दादोबा पांडुरंग व लोकहितवादी यांच्या मतांतील ग्राह्यांश त्यांनी आपल्या विचारसरणीत सामावून घेतला. त्यांची राष्ट्रीयत्वाची भावना व देशहिताची कळकळ सरदारांनी नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे, अशी रानडे यांची श्रद्धा होती. यावरून इंग्रजधार्जिणे होते, अशी टीका झाली. पण सरदारांनी त्यांच्या राष्ट्राभिमानाची अनेक उदाहरणे दिली आहेत. विविध प्रांतांतील आणि जातींतील लोकांना रानडे यांनी सामाजिक परिषेदेच्या व्यासपीठावर एकत्र आणले. त्यांच्या सुधारणावादात सहिष्णुतेला जितके स्थान आहे, तितके संघर्षाला नाही. आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक तत्त्वज्ञानाचे आद्य प्रणेते म्हणून सरदारांनी रानडे यांना आदरांजली वाहिली आहे.

आधी सामाजिक की आधी राजकीय, हा वाद व्यर्थ आहे. सामाजिक व राजकीय चळवळी एकदम चालू ठेवण्यात कोणतेही अहित नाही. समाजजीवनाची सर्व अंगे एकात्म व परस्परपूरक होऊ शकतात, या रानडे यांच्या मताचे मोल सरदारांनी विशद केले आहे. जुन्या परंपरागत जीवनाच्या ठरीव चाकोरीतून लोकांना बाहेर काढण्यासाठी रानडे यांनी सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. आपले हे प्रमुख प्रतिपाद्य सरदारांनी साधार स्पष्ट केले आहे.

'आगरकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान' या विषयावर पुण्यास १९७३ मध्ये दिलेली तीन व्याख्याने आणि ऑगस्ट १९५६ च्या 'नवभारत' मधील आपला एक लेख यांचे संस्करण करून सरदारांनी 'आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार' हा आपला ग्रंथ १९७५ मध्ये प्रसिद्ध केला आहे. धर्मचिकित्सा, समाजपरिवर्तनाचे

अनुक्रमणिका

स्वरूप व आर्थिक प्रश्न यांविषयींची आगरकरांची मते सांगून, त्यांची चिकित्सा सरदारांनी केली आहे. आगरकरांच्या विचारप्रणालीचा आशय क्रांतिकारकच होता. सामाजिक चळवळीतील त्यांची कामगिरी ही त्यांच्या उज्ज्वल देशभक्तीला व विवेकनिष्ठ प्रगतीपरतेला साजेशी होती. आपले भारतीयत्व टिकवून समाजाची सुधारणा करण्याची त्यांची जिद्द होती. सामान्य माणूस व उपेक्षित वर्ग यांच्याविषयी त्यांनी केलेले लेखन अल्प असले, तरी त्यातून त्यांची सामाजिक करुणाबुद्धी उत्कटपणे प्रत्ययास येते. आगरकरांच्या सामाजचिंतानाविषयी सरदारांनी काढलेले हे सर्व निष्कर्ष आगरकरांच्या क्रांतदर्शित्वाचे द्योतक आहेत.

'प्रबोधनातील पाऊलखुणा' (१९७८) या सरदारांच्या लेखनसंग्रहात त्यांनी 'काही मूल्यांच्या संरक्षणासाठी आपल्या वाणीची, लेखणीची व व्यक्तिमत्त्वाची शक्ती सतत पणाला लावली आहे' असे संपादकांना जाणवते. ज्ञानोपासनेचे क्षेत्र हे सदैव खुले आणि स्वयंशासित असले पाहिजे. कोणतीही विचारसरणी विशिष्ट वर्गांशी किंवा हितसंबंधांशी कायमची जखडली गेली, सांप्रदायिक अभिनिवेशाने अंध व असहिष्णू बनली, तर तिचा स्वतःचा विकास तर खुंटतोच, पण एकंदर ज्ञानाच्या वाढीलाही ती अपायकारक ठरते, असा इशारा सरदारांनी दिला आहे. तसेच सामाजिक न्याय व समता यांवर आधारलेली नवी समाजरचना अस्तित्वात आली, आत्यंतिक व्यक्तिवाद व आंधळा समूहवाद यांतील धोके लक्षात आले आणि व्यक्तीचे स्वातंत्र्य व सामाजिक बंधने याने तारतम्य राखले, तर समाजजीवनातील तणाव कमी होतील. मग अर्थात्च व्यक्तीची कुचंबणा होणार नाही व व्यक्ति आपोआपच समाजाभिमुख होईल असे निदान सरदारांनी केले आहे.

याच लेखसंग्रहात शाहू महाराज व महर्षी शिंदे यांच्या विचारांची दिशा सरदारांनी स्पष्ट केली आहे. शाहू छत्रपतींनी आपल्या सामाजिक सुधारणेच्या कार्यात शिक्षणाला प्रमुख स्थान दिले होते. जातिभेद नष्ट करायचा तर सर्व जातींची मुले एकाच वसतिगृहात, एकत्र राहिली पाहिजेत, याची महाराजांना जाणीव होती. प्राथमिक शिक्षणाला जरी त्यांनी अग्रक्रम दिला होता, तरी माध्यमिक व उच्च शिक्षणाचे महत्त्व त्यांनी कमी लेखले नाही. जातिभेद मोडण्यासाठी आपण प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे, याबद्दल त्यांच्या मनात संदेह नव्हता. अस्पृश्यता दूर करून त्या बांधवांना स्पृश्य समाजात सामावून घेण्यासाठी व त्यांचा जीवनक्रम सुधारण्यासाठी महाराजांनी जे कष्ट उपसले, त्यांची नोंद सरदारांनी केली आहे.

महर्षी शिंदे यांच्या जीवितकार्याचे वस्तुनिष्ठ समालोचन सरदारांनी केले आहे. विश्वधर्म व मानवतावाद हीच शिंदे यांच्या कार्याची मुख्य बैठक होती. ब्राह्मधर्म, अस्पृश्यतानिवारण व स्त्रीदास्यविमोचन या तीन क्षेत्रांत त्यांनी काम केले. शेतकरी चळवळीतही त्यांनी हिरिरीने भाग घेतला. शेतकऱ्यांनी व कामकऱ्यांनी आपले संघटनात्मक सामर्थ्य वाढविले पाहिजे. मात्र त्यामुळे राष्ट्रहिताला व स्वातंत्र्यसंग्रामाला बाधा येणार नाही याचा खबरदारी त्यांनी घेतली पाहिजे, असे शिंदे यांनी आवर्जून सांगितले आहे. महाराष्ट्रातील सामाजिक विचारप्रवाहाशी त्यांचा जो अनुबंध होता, त्याची नेमकी ओळख सरदारांनी करून दिली आहे.

'महात्मा फुले : विचार आणि कार्य' (१९८१) हे सरदारांचे पुस्तक म्हणजे त्यांच्या तीन व्याख्यान-संहितांचा संग्रह आहे. महात्मा फुले हे एक श्रेष्ठ कृतिशील समाजचिंतक होते. १८४८ ते १८६५ आणि १८६६ ते १८९० असे त्यांच्या कार्याचे दोन कालखंड सरदारांनी मानले आहेत. पूर्वार्धात फुले यांनी स्त्रीदास्यविमोचन व दलितोद्धार या कामात लक्ष घातले. उत्तरार्धात त्यांनी सत्यशोधक चळवळीत स्वतःला झोकून दिले. मानवतावाद, विश्वबंधुत्व व कृतिशीलता ही त्यांच्या जीवननिष्ठेची तीन अंगे होती.

महात्मा फुले यांच्या धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक विचारांचे समालोचन सरदारांनी केले आहे. फुले यांचे व्यक्तित्व चिंतनशील होते व त्यांचे नेतृत्व क्रियाशील होते. संघर्षप्रवण मानवतावाद हे त्यांच्या विचारसरणीचे मुख्य सोत्र होते. सरदारांनी फुले यांच्या कामगिरीचे मर्म साधार स्पष्ट केले आहे.

'नव्या युगाची स्पंदने' (१९८२) या संपादित ग्रंथात सरदारांचे अकरा लेख समाविष्ट झाले आहेत. समाजस्थितीचे विश्लेषण करताना सरदार वास्तवाचे भान सोडत नाहीत, हे संपादकांचे भाष्य यथार्थ आहे. आपल्या या लेखनसंग्रहाला स्वतः सरदारांनी चार शब्द लिहून आपले मनोगत व्यक्त केले आहे. "दलित आदिवासी, भटक्या विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषण—मुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल, तर तिला पाठिंबा देणे आणि तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे असे मला वाटते."

'भारतीय राष्ट्रवाद आणि ऐहिक निष्ठा' हा या संग्रहातील पहिलाच लेख प्रदीर्घ आणि मौलिक आहे. आपल्या देशात वाढत चाललेल्या फुटीरपणाच्या प्रवृत्तीबद्दल सरदारांनी खंत व्यक्त केली आहे. प्रांतीयता, जातीयता व संकुचित धर्मनिष्ठा या जाणिवांच्या योगे आपली लोकशाही धोक्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे. राष्ट्रीयत्वाची कल्पना आपल्याकडे पाश्चात्य विद्येच्या संस्कारातून आली. त्यांच्या कार्यपद्धतीतून समाजसेवेची प्रेरणा आपल्याला मिळाली. मात्र त्यांची विज्ञाननिष्ठा आपण आत्मसात करू शकलो नाही. तसेच सामाजिक व्यवहारातील धर्मनिरपेक्षता इथे रुजली नाही. महात्मा गांधींना जरी वैयक्तिक लोकप्रियता लाभली, तरी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पराभव झाला आहे. आपल्याकडे सत्तासंघर्षाच्या राजकारणातून जातिवादाची उत्पत्ती झाली. आजचा जातिवाद हा इंग्रजांच्या भेदनीतीचा परिपाक आहे. सरदारांनी केलेले हे निदान अभ्यसनीय आहे.

नव्या महाराष्ट्राचे भवितव्य कोणते, याविषयी मूलगामी चिंतन सरदारांनी केले आहे. भोवतालच्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केल्याशिवाय कोणत्याही सामाजिक समस्येचे नेमके आकलन होत नाही. त्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. अलीकडे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र इत्यादी क्षेत्रांत बरेचसे संशोधन झाले आहे. आज ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या आहेत. पण त्यातून भरीव फलनिष्पत्ती होण्यासाठी विविध क्षेत्रांतील उपक्रमांचे एकसूत्रीकरण झाले पाहिजे. तसेच विचार व कृती ही दोन्ही क्षेत्रे परस्परपूरक ठरली पाहिजेत. आपल्या सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह करताना आपण एकराष्ट्रीयत्वाची भूमिका ढळू न देण्याची दक्षता घेतली पाहिजे.व्यक्तिहित, पक्षहित व प्रदेशहित यांचा विचार करताना राष्ट्रनिष्ठेचे अनुसंधान राखले पाहिजे.. तसेच आर्थिक विकासाचा वेग वाढवून शहरे व खेडी यांच्यातील अंतर कमी केल्याशिवाय आपली सर्वांगीण प्रगती होणार नाही. आपल्या समाजात श्रमशक्तीची वाण नाही. पण ती संघटित व कार्यान्वित होईल अशी आंतरिक प्रेरणा बहुजनसमाजात निर्माण करणे हे आपल्यापुढील निकडीचे काम आहे. अजूनही खेडोपाडी रुढींचे, दैववादाचे व जन्मसिद्ध उच्चनीचभावाचे प्राबल्य आहे. ते नाहीसे करून लोकजीवनात ऐहिक जीवननिष्ठेचे व सामाजिक कर्तव्यबुद्धीचे वातावरण फैलावेल, अशी खटपट आपण केली पाहिजे. न्याय्य मार्गाने व्यक्तीचे व समाजाचे जीवन समृद्ध व सुखी करणे हाच खरा पुरुषार्थ आहे, असे सरदार सांगतात. मात्र ऐहिक जीवननिष्ठा म्हणजे भोगवाद नव्हे, असेही ते बजावतात. पुष्कळदा आपल्या सामाजिक जीवनात वैराग्याचे अवास्तव आकर्षण आणि भोगाची अनिवार लालसा असा आंतरिक विरोध

दिसून येतो. तो नाहीसा केला पाहिजे. भोग व त्याग, स्वातंत्र्य व संयम आणि उद्योगशीलता व निर्लोभ वृत्ती यांचा आपण मेळ घातला पाहिजे. सत्ताकांक्षेला ज्ञाननिष्ठेची त्यागाची व कर्तव्यबुद्धीची जोड दिली पाहिजे. यातूनच उद्याच्या महाराष्ट्राचे उज्ज्वल भवितव्य घडेल, असा आशावाद सरदारांनी व्यक्त केला आहे. सांस्कृतिक परिवर्तनाला सामाजाकाडून साद मिळेल असा विश्वासही त्यांना मनोमन वाटतो.

सरदारांच्या विचारांवर प्राचीन संतकवी आणि आधुनिक राष्ट्रपुरुष यांच्या जीवनदृष्टीचा प्रभाव असल्याचे जाणवते. ज्ञानेश्वर, एकनाथ, आणि तुकाराम या संतांच्या कार्याचे मर्म त्यांनी जाणले आहे. गांधीजी व कार्ल मार्क्स यांचे संस्कार त्यांच्या मनावर झालेले आहेतच. तसेच लोकहितवादी, रानडे, फुले, टिळक व आगरकर यांचेही आदर्श त्यांच्यासमोर आहेत. या सर्व थोर व्यक्तींच्या विचारसंपदेचे एक अद्भुत रसायन होऊन सरदारांचे समाजचिंतन आकाराला आले आहे.

'नव्या ऊर्मी, नवी क्षितिजे' , (१९८७) या आपल्या ग्रंथाच्या आरंभी सरदारांचे संदेशवजा, पुढील विचारदर्शन दिलेले आहे : "नवविचारांच्या प्रणेत्यांना स्वतःच्या पूर्वग्रहांशी तर झगडावे लागेलच, पण त्याबरोबर प्रस्थापित हितसंबंधाचा कडवा विरोध वारंवार सहन करावा लागतो. त्यावेळी विचारवंतांची खरी कसोटी असते. म्हणून आपल्या भूमिकेचे पावित्र्य राखण्यासाठी पडेल ती किंमत द्यायला तो तयार असेल, तो खरा नैष्ठिक विचारवंत असे म्हटले पाहिजे."

संस्कृतिसंवर्धन आणि ज्ञानोपासना यांतील अनुबंध एका लेखात सरदारांनी स्पष्ट केला आहे. जुन्या जमान्यात कुटुंब, जात व गाव हे समाजाचे प्रमुख घटक होते. आता व्यक्ती हा मूलभूत घटक बनला आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा, इहवाद, व्यवसायस्वातंत्र्य व संधीची समानता ही तत्त्वे मान्यता पावली आहेत. स्पर्धा हा उद्योगप्रधान संस्कृतीचा मूलाधार आहे. आर्थिक क्षेत्रातील या स्पर्धा- तत्त्वाने आता शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातही आपला जम बसवला आहे. पैसा हे दैवत समजून त्याची आराधना सर्वत्र चालू आहे.वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपायी कितीतरी कर्तबगार विद्यावंत लोक हे कौटुंबिक ऋणानुबंध, सामाजिक जबाबदारी व राष्ट्रहितबुद्धी यांविषयी चक्क उदासीन होत असल्याचे आढळते.

आपल्याकडे आणखी एक वैगुण्य वाढू लागले आहे. एकीकडे ऐहिक उत्कर्षाची ओढ व प्रयत्नवाद आढळून येतो, तर दुसरीकडे धर्मश्रद्धा व प्रारब्धवाद यांचा पगडा दिसून येतो. अजूनही मनाने आपण संन्यासपूजकच आहोत. धनाढ्य व प्रतिष्ठित वर्गातही प्रापंचिकतेबद्दल व ऐहिकतेबद्दल अपराधाची भावना दिसून येते. आपल्या आधुनिक जीवनपद्धतीत घडून आलेला बदल बराचसा अनुकरणात्मक व वरवरचा आहे. त्यामुळे असंख्य युवक विवेकशून्य उपभोगवादात गुंतलेले आहेत. या सुखवादाच्या प्रसाराचे खापर विज्ञानावर फोडण्यात हशील नाही. धर्म नीती शिकवतो आणि विज्ञानामुळे उपभोगाची वृत्ती बळावते असे मानणे बरोबर नाही. विज्ञान जगाकडे चिकित्सकपणे पाहण्याची दृष्टी देते, पण ते मूल्यनिर्णय करू शकत नाही. त्याच्या प्रकाशात जे अनेक पर्याय उपलब्ध होतात, त्यांपैकी कोणता पर्याय घ्यायचा, याचा निर्णय माणसालाच करावा लागतो. संस्कृतीच्या घडणीत कोणता ना कोणता मूल्यविवेक अनुस्यूत असतो. यासाठी विचारवंतांनी आपले औदासीन्स झटकून टाकून सामाजिक चळवळीतल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्राच्या भूमीला एक परंपरा आहे. इथेच आंबेडकर झाले, फुले झाले, शाहू महाराज झाले, शिंदे झाले, यालाही काही एक क्रम आहे. शंभर वर्षांमध्ये विद्यावंतांनी मोठे कार्य केले आहे. यापुढेही विचारवंतांच्या हातून काही निष्पन्न होणार नाही, असे म्हणायला जागा नाही. कर्मवीर भाऊराव

पाटील यांच्यासारखा द्रष्टा शिक्षणप्रसारक आणि समाजसुधारक केवढे मोठे कार्य करून ठेवतो, याचा इतिहास ताजा आहे.

समाजवादाचे ध्येय समोर ठेवून समाजपरिवर्तनासाठी करायच्या आंदोलनात सांस्कृतिक अंगाला महत्व असते, याची जाणीव सरदारांनी करून दिली आहे. क्रांतिकारक आंदोलनात समाजवादी नैतिकतेची जोपासना व्हायला हवी. चळवळीतले नेतृत्व जसे कार्यक्षम हवे, तसेच ते नैतिक उंचीचेही हवे. भौतिकवादी माणूस हाही ध्येयनिष्ठ व नीतिमान असतो, याचा लोकांना प्रत्यय आला पाहिजे. नवी धर्मनिरपेक्ष, समाजवादी व विज्ञाननिष्ठ नैतिकता जोपासली पाहिजे. त्याबरोबरच परिवर्तनवादी शक्तींची एकजूट झाली पाहिजे. राजकीय पक्ष, श्रमिक संघटना व सामाजिक संस्था यांच्या नित्य-नैमित्तिक कार्यात एकजूट असायला हवी. विचारांच्या पातळीवर ऐक्याची ओढ, पण व्यवहारात फुटीरपणा असा विसंवाद घातक आहे. परिवर्तनवादी चळवळीला प्रबोधनाची जोड नसेल, तर ती चळवळ दिशाहीन बनू लागते. मध्ययुगीन जीवनसरणीतील रुढींचे दास्य, शास्त्रप्रामाण्य व जन्मसिद्ध अधिकारभेद याचे पाश झुगारून दिले पाहिजेत. त्याबरोबरच भांडवलशाही युगातील सामाजिक संस्था व विचारप्रवाह यांच्याविरुद्ध झगडा केला पाहिजे. या दुहेरी संघर्षाला प्रबोधनाचे कार्य उपकारक ठरले पाहिजे. आपल्या देशातील नाना जातिजमाती व त्यांत विभागलेला विराट समाज प्रथमच आधुनिक अर्थाने जागा होत आहे. *'कौतुक तू पाहे संचिताचें।'* अशी त्याची मनोवृत्ती आता राहिली नाही. ऐहिक जीवनसमृद्धीची आकांक्षा त्याच्यात निर्माण झाली आहे. दलित, आदिवासी स्त्रिया व भटक्या विमुक्त जमाती हे घटक आपल्या न्याय्य हक्कासाठी झगडण्यास पुढे येत आहेत. तळातल्या थरांतील तरूण वर्गातून आज ना उद्या क्रांतिकारी नेतृत्व उदयास येईल. आपण त्याचे मनापासून स्वागत केले पाहिजे. त्याला पाठिंबा दिला पाहिजे. त्याच्या हातूनच आपल्या सामाजिक जीवनातील कोंडी फुटणार आहे. नेतृत्वाला जन्मतःच परिपक्वता व द्रष्टेपणा लाभेल असा भाबडा आशावाद बाळगण्यात हशील नाही. त्यासाठी या कार्यकर्त्यांना दीर्घकाळ तपस्या करावी लागेल.

एका भव्य कॅनव्हासवर सरदारांनी सामाजिक परिवर्तनाच्या प्रयत्नांचे मूल्यांकन व मार्गदर्शन येथे केले आहे.

'परंपरा आणि परिवर्तन' (१९८८) या ग्रंथात सरदारांचे एकंदर अकरा लेख समाविष्ट केलेले आहेत. ज्ञाननिष्ठा व सामाजपरिवर्तन, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक संस्थांचे दायित्व, धर्मकल्पना, मराठी संत, समाजवाद, ईश्वरनिष्ठा, कर्मकांड, स्वातंत्र्योत्तर साहित्य, दलित साहित्य, उपेक्षितांचे जीवन अशा ज्वलंत विषयांचे स्वरूप, व्याप्ती आणि प्रभाव यांविषयीचे मूलगामी चिंतन सरदारांनी इथे केले आहे.

दलितांचे विचारपरिवर्तन, महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांचे कार्य, संस्थात्मक जीवन, आजचे धर्मजीवन, परिवर्तनवादी संघटना, भारतीय लोकशाही, धर्मजीवनाची वस्तुस्थिती, कलाव्यापाराची स्वायत्तता अशा महत्त्वाच्या विषयांसंबंधीचे सरदारांचे विचार कोणते आहेत, ते स्पष्ट करून त्यांची मौलिकता संपादकांनी दाखवून दिली आहे. समाजप्रबोधन व धर्मजीवन यांचे विवेचन करून सरदारांनी आपला स्वतंत्र साहित्यविचारही मांडला आहे. त्यांची भूमिका समन्वयशीलतेची आहे. साहित्य समाजापासून अलग करता येणार नाही, असे सरदार सांगतात. सामाजिकता व कलात्मकता यांच्या समतोलाची अपेक्षा त्यांनी केली आहे. सामाजिक प्रबोधनाच्या संदर्भात, परंपरेच्या स्वीकृतीतून परिवर्तनाची अपेक्षा हे त्यांच्या विचाराचे सूत्र सतत जाणवत राहते. मात्र त्यांच्या लेखनात अभिनिवेश येत नाही. सहिष्णुता व समन्वयशीलता हे त्यांच्या लेखनाचे विशेष गुण आहेत.

अनुक्रमणिका

व्यक्ती व सामाजिक संस्था यांच्यातील अनुबंधाची चिकित्सा एका लेखात सरदारांनी केली आहे. आज लक्षावधी लोकांचे व्यक्तिजीवन विस्कळीत झाल्याचे दिसते. जीवनाविषयी नव्या जाणिवा व आकांक्षा विविध थरांतील व्यक्तींमध्ये निर्माण होत आहेत. पण त्यांची कुचंबणा होत आहे. सर्वसामान्य माणसे वैफल्याने ग्रासली जात आहेत. बहुसंख्य जनतेला गरिबी, अज्ञान, रूढिवादाचा पगडा व अगतिकता यांच्यापासून मुक्त करायचे आहे. दुसरीकडे वरिष्ठ वर्ग व मध्यम वर्ग यांमध्ये व्यक्तिवाद व स्पर्धा यांचा प्रभाव आहे. स्वार्थ, संधिसाधूपणा, भोगवाद व पलायनवाद यांच्यात या दोन्ही वर्गातील व्यक्ती बुडालेल्या दिसतात. आपल्या समाजात आमूलाग्र व सर्वंकष परिवर्तन घडून आल्याशिवाय व्यक्तिजीवनाचे हे प्रश्न सुटू शकणार नाही. सत्ताधारी पक्ष हे प्रश्न सोडवू शकत नाही. पण आपणही तोकडे पडत असल्याची जाणीव परिवर्तनवादी शक्तींना झाली आहे. अशा परिस्थितीत या संघटना बलशाली होणे व त्यांचा प्रभाव वाढणे महत्त्वाचे आहे. प्रस्थापित व्यवस्थेत राहून तिच्यातून या संघटनांना आपले बळ उभे करायचे असते. या व्यवस्थेच्या पलीकडे किंवा तिला समान्तर असे वेगळे अस्तित्व परिवर्तनवादी संस्थेला असू शकत नाही. उदाहरणार्थ, प्रस्थापित शिक्षणपद्धती सदोष असली, तरी तिच्यातून शिक्षण घेणे ही, परिवर्तनाचा विचार व्यक्तीमध्ये येण्याची पूर्व अट आहे. तसेच व्यक्तीचे जीवन, चालू कायद्याचे राज्य मानून वागल्याशिवाय शक्यच होणार नाही. कायद्याला आधी किमान मान्यता देऊन मगच तो योग्य तेव्हा पाळायचा व योग्य तेव्हा मोडायचा, असे करावे लागते.

या संदर्भात कुटुंबसंस्थेचे उदाहरण घेता येईल. जुन्या काळात कुटुंब हाच मूलभूत घटक होता. आज व्यक्ती असा घटक बनली आहे. त्यामुळे कुटुंबसंस्थेची काही बंधने जाचक ठरू लागली आहेत. प्रेमसंबंधाला समाधानकारक टिकाऊपणा येणे व साहचर्याची भावनिक भूक पुरी होणे, यासाठी विवाह व कुटुंबसंस्था आवश्यक असतात. उथळ स्वेच्छापूर्तीतून विफलताच पदरी पडते. स्त्रीमुक्तीची चळवळ आता स्थिरपद होत आहे. हुंडाबळी व बलात्कार यांच्या वार्ता भयानक आहेत. त्यामुळे स्त्रीला जाचक अशा रूढी, बंधने, पुरुषांचे वर्चस्व या बाबतीत नव्या पिढीला जागे केले पाहिजे. पण त्याचबरोबर अनिर्बंध स्वच्छंदपणाचा पुरस्कार केला जात नाही ना, याची दक्षता घेतली पाहिजे.

साहित्य, समाज, धर्म व राजकारण हे सरदारांच्या चिंतनाचे प्रमुख विषय आहेत. संकुचित धर्मविचारामुळे प्रबोधनाला पडणाऱ्या मर्यादांची जाणीव आपल्या विविध लेखांतून त्यांनी करून दिली आहे. आजही आपल्या समाजात अंधश्रद्धा, रूढी व परंपराप्रियता फोफावताना दिसते. उलट परिवर्तनवादी कार्यकर्ते हे मात्र विज्ञाननिष्ठ व इहवादी भूमिका घेऊन अंधश्रद्धेवर व रुढिप्रियतेवर हल्ला करताना दिसतात. या विसंवादी परिस्थितीतून मार्ग काढण्याची फार गरज आहे, असे सरदारांना उत्कटपणे जाणवते. विज्ञानोपासकांच्या प्रयत्नांतून जे ज्ञान हाती लागले आहे, ते आपल्याकडील लक्षावधी निरक्षर लोकांपर्यंत अजून जाऊन पोहोचलेले नाही. त्यांच्या जीवनपद्धतीवर पुराणमतवादाचा अजून पगडा आहे. विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य व मूलगामी परिवर्तन या गोष्टी आपण तोंडाने बोलतो, पण प्रत्यक्ष व्यवहारात प्रवाहपतितता व धर्मभोळेपणा यांचा सुळसुळाट दिसून येतो. नेत्यांनाही मुहूर्त पाहावा लागतो; साधुमहाराजांचा आशीर्वाद त्यांना हवा असतो. ही विसंगती गेली पाहिजे. वास्तवाचे सम्यक ज्ञान व संघटित शक्ती यांच्या बळावर हे आव्हान पेलता येईल. त्यासाठी सर्व आघाड्यांवर देशव्यापी सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीची गरज आहे. समाजाच्या प्रगतीसाठी विचार व कृती ही नेहमीच परस्परपूरक ठरणे अगत्याचे आहे. विचार हा कृतीला प्रेरक असला पाहिजे. कृतीतून विचाराचा आशय समर्थ बनत गेला पाहिजे. ह्यासाठी विचारवंतांनी कार्यकर्त्यांशी संपर्क ठेवला पाहिजे. त्याबरोबर कार्यकर्त्यांनी आपल्या कृतीला वैचारिक शिस्त लाभावी म्हणून प्रयत्नशील असले पाहिजे.

अनुक्रमणिका

हे सर्व मार्गदर्शन करताना सरदारांना कठोर वास्तवाचे भान आहे. भारतातील मूलगामी परिवर्तनाचे कार्य बिकट आहे व ते लांब पल्ल्याचेही आहे, असा इशारा त्यांनी दिला आहे. उद्वेगजनक अनुभवांनी नामोहरम न होता, व्यापक दृष्टीने आपण समग्र परिस्थितीचे परिशीलन केल्यास आपल्या देशात आशावादाला पुष्कळच जागा आहे, अशी त्यांना खात्री वाटते.

परिवर्तनाची मीमांसा करताना सरदारांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू छत्रपती, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. आंबेडकर या कृतिशील विचारवंतांच्या कामगिरीचा समरसतेने परामर्श घेतला आहे. त्यांपैकी महर्षी शिंदे व महात्मा गांधी यांच्या कामगिरीचा परिचय या आधी करून घेतलेला आहे. शाहू छत्रपती, भाऊराव पाटील व डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्याविषयीची सरदारांची विचारधारा समजून घ्यायची आहे.

'अस्पृश्यता-निर्मूलन व राजर्षी शाहू छत्रपती' या विषयावरील सरदारांचे विवेचन अभ्यसनीय आहे. ['महाराष्ट्रातील समाजप्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य' संपा -मा. प. मंगुडकर, पुणे विद्यापीठ, प्रकाशन, १९७५, या ग्रंथातील सरदारांचा लेख.' ] अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत शाहू महाराजांचे कार्य कसे महत्त्वाचे ठरते, हे सरदारांनी सविस्तर स्पष्ट केले आहे. सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीप्रमाणे आर्य समाजाच्या तत्त्वप्रणालीचेही महाराजांच्या मनावर संस्कार झाले होते. मागासलेल्या जातींची उन्नतीची प्रेरणा त्यांच्या ठिकाणी प्रबळ होती. अस्पृश्य समाजातील मुलामुलींना विद्येची गोडी लागावी म्हणून त्यांनी त्या मुलांसाठी वसतिगृह स्थापन केले. त्यातून शिकून तयार झालेल्या होतकरू तरुणांना योग्य व्यवसाय देण्याची त्यांनी तरतूद केली. स्वतंत्र धंदा करण्याची ज्यांची उमेद होती त्यांना महाराजांनी भांडवल पुरविले. अस्पृश्याला नागरिक या नात्याने समान हक्क मिळाले पाहिजेत अशी त्यांची धारणा होती. सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, वसतिगृह, सरकारी कचेऱ्या, दवाखाने व अन्नछत्रे अशा ठिकाणी स्पृश्य व अस्पृश्य असा भेदभाव होता कामा नये. शाळांतून सर्व जातींची व धर्मांची मुले एकत्र बसविण्यात यावीत अशी आज्ञापत्रे त्यांनी काढली. अस्पृश्यांच्या हातचे खाद्यपदार्थ ते निःशंकपणे घेत असत. अस्पृश्यांच्या परिषदांत त्यांनी मोकळेपणाने भाग घेतला आणि त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा उपदेश केला. तुम्ही स्वतःच संघटितपणे चळवळ केली पाहिजे आणि डॉ. आंबेडकरांसारख्या कर्तबगार नेत्याचे पुढारीपण स्वीकारले पाहिजे,' असा सल्ला महाराजांनी दिला होता.

'कर्मवीर भाऊराव पाटील हे द्रष्टे शिक्षणप्रसारक व समाजसुधारक होते,' या शब्दांत सरदारांनी त्यांची ओळख करून दिली आहे ['हीरक महोत्सव स्मरणिका' १९८२, रयत शिक्षण संस्था, सातारा यात प्रसिद्ध झालेला लेख. (शब्दांकन : प्रा. दीपा महानवर) ] महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेस बहुजनसमाजास सुशिक्षित करण्यासाठी संघटित प्रयत्न करणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे राज्यातील अव्वल दर्जाचे महापुरुष होते. त्यांनी प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन अशा तिन्ही पातळ्यांवर शेकडो विद्यालये उभारली. केवळ व्यक्तिगत प्रयत्न न करता भाऊरावांनी शिक्षण प्रसारास संस्थात्मक अधिष्ठान दिले. 'रयत शिक्षण संस्था' हे त्यांच्या प्रयत्नाचे व कर्तृत्वाचे चिरस्थायी स्मारक होय. त्यांनी शिक्षणप्रसाराचे धडे उभ्या महाराष्ट्राला दिले. त्यांचा आदर्श समोर ठेवून त्यानंतरच्या काळात अहमदनगर, अमरावती, धुळे, पुणे, कोल्हापूर, इत्यादी जिल्ह्याजिल्ह्यांतून शैक्षणिक नेतृत्व उभे राहिले. शैक्षणिक कार्यकर्त्यांची एक पिढीच निर्माण झाली, बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा मनस्वी ध्यास घेऊन, त्यासाठी अहोरात्र खपून, दूरदर्शीपणाने व झंझावती वेगाने ईप्सित साध्य करणारा असा अन्य शैक्षणिक नेता आपल्या पाहण्यात आला नाही, असे सरदारांनी म्हटले आहे.

अनुक्रमणिका

राजर्षी शाहू महाराज हे कर्मवीर भाऊरावांचे एक प्रेरणास्थान होते. शिक्षणप्रसाराचे कार्य करीत असताना कर्मवीरांनी संस्थेचा व्यवहार सांभाळण्यासाठी अंगीकृत तत्त्वांशी तडजोड केली नाही, 'माझ्या शिक्षणकार्याचा आधार सरकार नसून जनतेच्या देणग्या महत्त्वाच्या आहेत,' असे ते म्हणत. खेड्यातील रयत हा त्यांच्या कार्याचा पाया होता. त्यांनी काळाची गरज अचूकपणे ओळखली आणि केवळ शिक्षणकार्याला सर्वस्वी वाहून घेतले. कर्मवीरांनी श्रमिकाला सामाजिक जीवनात मानाचे स्थान मिळावे म्हणून प्रयत्न केले. हे सांगून सरदारांनी एक महत्त्वाची सूचना केली आहे. केवळ कर्मवीर भाऊराव या व्यक्तीचा उदोउदो करण्यापेक्षा त्यांचे विचार आपण कितपत आचरणात आणतो, हे पाहणे जरुरीचे आहे, असे ते म्हणतात.

महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर हे दोघेही महान राष्ट्रपुरुष होते. गांधीजी हे भारताचे राष्ट्रपिता म्हणून तर आंबेडकर आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात, हे सांगून सरदार आंबेडकरांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करतात.

डॉ. आंबेडकर हे दलित समाजाच्या आत्मसन्मानाचे प्रतीक होते. डॉ. आंबेडकरांच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य सरदारांनी नेमकेपणाने सांगितले आहे. ['ताजे वर्तमान' दिवाळी अंक, १९८५ (प्रकाशक : सौ. शैलजा जोशी, शाहू कॉलेज रस्ता, पुणे-९) या अंकातील सरदारांचा लेख] अस्पृश्यांनी याचकधर्म सोडला पाहिजे असे आंबेडकरांचे मत होते. इतरांची दया किंवा सहानुभूती आम्हांला नको; आमचा लढा माणुसकीच्या प्रतिष्ठेसाठी आहे ; दलितांच्या स्वत्वभावनेच्या परिपोषासाठी आहे, अशी भूमिका त्यांनी घेतली. एक गोष्ट मात्र खरी, आंबेडकर पूर्णपणे राष्ट्रीय होते. अलगतेला त्यांचा विरोध होता. त्यांना सवर्णांच्या बरोबरीने हक्क मिळवायचे होते.

आंबेडकरांनी ब्रिटिशांना विरोध केला नाही, तसेच ते स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी झाले नाहीत, या दोन आक्षेपांचे सरदारांनी निराकरण केले आहे. आंबेडकर ब्रिटिशधार्जिणे नव्हते. कायद्यापुढे सर्व समान ही ब्रिटिशांची भूमिका व त्यांची धार्मिक तटस्थता याचा दलितांसाठी फायदा करून घेतला पाहिजे एवढेच त्यांच्या मनात होते. स्वातंत्र्याच्या चळवळीलाही त्यांचा विरोध नव्हता. आपला देश स्वतंत्र होऊ नये असे कोणत्याही सुजाण माणसाला वाटणार नाही, हे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. परंतु देश म्हणजे केवळ भूप्रदेश नव्हे, तर निरनिराळ्या थरांतील लोक;त्यांनाच खऱ्या अर्थाने स्वांत्र्याचा लाभ झाला पाहिजे. उद्या स्वराज्य मिळाल्यावर दलितांना काय स्थान राहणार, हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्रयस्थ सत्ता असेपर्यंत आपल्या समाजाला जास्तीत जास्त हक्क मिळविणे सोपे जाईल असे त्यांना वाटत होते.

डॉ. आंबेडकरांना धर्माची आवश्यकता वाटत होती. हिंदू धर्मात आचार व विचार यांच्यात जो विसंवाद आहे तो दूर केला पाहिजे असे त्यांचे मत होते;हिंदू राहूनच या धर्मात सुधारणा करण्याची त्यांची भूमिका होती. त्यांनी एकवीस वर्षे वाट पाहिली. काही सुधारणा होत नाहीत हे पाहिल्यावर धर्मांतरासाठी त्यांनी बौद्ध धर्म निवडला. हा धर्म भारतीय आहे. राष्ट्रीयत्वाच्या भावनेला तो पोषक आहे. तसेच मानवतावाद, नैतिक अधिष्ठान, विचार स्वातंत्र्य व समता यांना या धर्मात महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरांनी त्याची पुढे फेरमांडणी केली.

'अल्पसंख्याकांनी फुटीरतेची भावना बाळगता कामा नये' या आंबेडकरांच्या मताचा सरदारांनी पाठपुरावा केला आहे. आपला देश खरोखर जाती आणि धर्म यांनी विभागलेला आहे. अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेसाठी काही उपाय योजल्याशिवाय देशाला एकात्म स्वरूप प्राप्त होणार नाही. मात्र अल्पसंख्याकांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, मूळ ध्येय एकात्म भारत देश हेच आहे. त्यामुळे त्यांच्या

सुरक्षिततेसाठी काही विशेष सवलती मिळाल्या तरी एकात्मतेच्या ध्येयाच्या आड त्या येऊ नयेत असा इशारा आंबेडकरांनी दिला आहे. त्यातून त्यांची राष्ट्रनिष्ठा दिसून येते, हे सरदारांनी आवर्जून सांगितले आहे.

आंबेडकरांच्या विचारधारेचे असाधारण महत्त्व सांगताना सरदारांनी एक व्यापक विचार मांडला आहे. शोषित वर्गांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न अनेकजण करत असतात. कुणी दलितांसाठी कार्य करतो, तर कुणी शेतमजुरांना मुक्त करण्याचा प्रयत्न करतो; पण प्रत्येकाच्या कार्यकक्षा त्या घटकापुरत्या मर्यादित असल्या तरी प्रत्येक घटकाचा लढा हा संपूर्ण समाजव्यवस्था बदलण्यासाठी चाललेल्या लढ्याचाच एक भाग आहे, ही व्यापक दृष्टी सर्वांना असणे आवश्यक आहे असे सरदारांनी म्हटले आहे.

समाजप्रबोधानाविषयी सरदारांनी वेळोवेळी जे विचार व्यक्त केले आहेत, त्यांचा मागोवा घेतल्यानंतर या संदर्भातील त्यांच्या विचारधारेचे काही विशेष नोंदविता येतात. माणूस हा त्यांच्या समाजचिंतनाचा केंद्रबिंदू आहे. व्यक्ती आणि समाज यांचे नाते अतूट असते, एवढेच नव्हे तर समाजजीवनातूनच माणसाचे अनेकपदरी व्यक्तिमत्त्व साकार होत असते, अशी सरदारांची धारणा आहे. कोणतीही व्यक्ती स्वयंभू व स्वयंपूर्ण नसते. कितीही मोठा प्रज्ञावंत व कर्तबगार माणूस असला, तरी त्याच्या व्यक्तित्वाची घडण व त्याचा आविष्कार हा सामाजिक जीवनातूनच होत असतो. समाजनिरपेक्ष अशा विमुक्त व्यक्तीची आपण कल्पना करू शकत नाही असे ते आवर्जून सांगतात.

समाजप्रबोधनाचे कार्य वाटते तितके सोपे नाही, याची जाणीव सरदारांनी आवर्जून करून दिली आहे. ज्ञानसंवर्धन व विचारजागृती हा सामाजिक जीवनाचाच एक भाग असल्यामुळे समाजातील बऱ्यावाईट प्रवृतींचे व शक्तिसंघर्षांचे पडसाद या क्षेत्रातही उमटल्याशिवाय राहत नाहीत. नवविचारांच्या प्रणेत्यांना स्वतःच्या पूर्वग्रहांशी तर झगडावे लागतेच, पण त्याबरोबर प्रस्थापित हितसंबंधाचा कडवा विरोध त्यांना वारंवार सहन करावा लागतो. त्यावेळी विचारवंतांची खरी कसोटी असते, असे सरदार सांगतात.

ज्ञानोपासना हा केवळ बौद्धिक व्यापार नसून समग्र मानवी जीवन उजळून टाकणारी ती एक दुर्दम्य प्रेरणा आहे. आपल्या भूमिकेचे पावित्र्य राखण्यासाठी पडेल ती किंमत मोजायला जो तयार असेल, तो खरा नैष्ठिक विचारवंत होय, अशी सरदारांची धारणा आहे.

याच संदर्भात भारतीय बांधवांच्या मनोरचनेची चिकित्सा केली आहे. भारतीयांच्या तत्त्वविचारात समाजधारणेची आस्था आहे, पण समाजपरिवर्तनाची दृष्टी नाही; निसर्गरचनेइतकीच समाजव्यवस्थाही स्वयंसिद्ध व शाश्वत आहे, अशी आपल्या शास्त्रकारांची दृढ समजूत होती. तात्कालिक लाभहानीची फिकीर न करता अनासक्त बुद्धीने आपापली लहानमोठी कर्तव्ये करीत राहण्यातच व्यक्तीचे अंतिम हित आहे, अशी आपल्या धर्मग्रंथांची शिकवण आहे. जे अटळ व क्रमप्राप्त आहे, त्याची चिंता व शोक व्यर्थ आहे. परिस्थितीचे आघात शांत चित्ताने सहन करणे हाच मार्ग श्रेयस्कर आहे, या धारणेमुळे लोकांच्या जाणिवांत नैष्कर्म्य व निष्क्रियता, तसेच आत्मतुष्टी व औदासीन्य यांची गल्लत होऊ लागली. भौतिक सृष्टीच्या ज्ञानाकडे समाजाचे दुर्लक्ष झाले.

ही स्थिती बदलण्याची निकड आहे, असे सरदारांनी आग्रहाने प्रतिपादन केले आहे. लोकांच्या जीवनदृष्टीत परिवर्तन घडवून आणले, तरच हा बदल होणे शक्य आहे. त्यासाठी एक उपाय म्हणजे राजकीय कार्यकर्त्यांनी वेळोवेळी विद्यावंतांचे सहकार्य संपादन करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. सुदैवाने ग्रामीण

भागातील जनतेला आता शिक्षणाची महती कळून आली आहे. उत्तरोत्तर शिक्षणप्रसाराचा वेग वाढत आहे. अशा वेळी ज्ञान हे केवळ निर्वाहाचे साधन नसून आत्मविकासाची ती एक उज्ज्वल व अमोघ साधना आहे आणि विज्ञानशक्तीच्या सदुपयोगासाठी विज्ञानदृष्टीची जोपासना केल्याशिवाय गत्यंतर नाही याची लोकांना वेळीच जाणीव करून दिली पाहिजे. हे घडून येईल व त्यातूनच शिक्षणाविषयीचा जनसामान्यांचा अभूतपूर्व उत्साह समाजपरिवर्तनाला खचितच उपकारक होईल, असा आशावाद सरदारांनी व्यक्त केला आहे.

याच समाजसन्मुख दृष्टीकोनातून सरदारांनी भाषा-व्यवहाराची तपासणी केली आहे. ते म्हणतात, "लोकशाही ही केवळ शासनव्यवस्था नसून ती सर्वंकष जीवनपद्धती आहे. शासकीय कार्यक्रमात तर लोकांचा सहभाग हवाच, पण त्याबरोबरच राजकीय सत्तेवर अंकुश ठेवण्याइतके लोकमत हे जागृत व संघटितही हवे. त्यासाठी लोकांचे राजकीय व सामाजिक प्रबोधन होणे आवश्यक आहे. हे सर्व घडायचे तर सामाजिक जीवनाच्या प्रशासन, शिक्षण, न्याय, उद्योग, व्यापार इत्यादी सर्व क्षेत्रातील व्यवहार हा लोकभाषेतून व्हायला हवा. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यानंतर मराठीला राजभाषेची प्रतिष्ठा लाभणे क्रमप्राप्तच आहे. लोकशाहीत जनतेची भाषा हीच राजभाषा म्हणून सर्वमान्य ठरली, तर आजचे साचिवालयीन कारभाराचे केंद्रीभूत स्वरूप नष्ट होईल; आणि ग्रामीण स्तरांतील लोकांमध्ये राज्यकाराभाराविषयी आत्मीयतेची व विश्वासाची भावना निर्माण होऊ शकेल;

लोकभाषा हे प्रबोधनाचे एक प्रभावी साधन आहे हे सांगताना सरदारांनी एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. मराठीच्या अभिमानापायी राष्ट्रीय एकात्मतेला कोठेही बाधा येत कामा नये, असे त्यांनी बजावले आहे. भारत हे प्रजासत्ताक गणराज्य आहे. त्यात असलेल्या विविध प्रदेशांन स्वतःची हजारो वर्षांची परंपरा आहे. त्यामुळे भारताच्या राष्ट्रीय जीवनात एकजिनसीपण येणे शक्य नाही. पण एकात्मता निर्माण होण्याची नितान्त आवश्यकता आहे. प्रादेशिकता व राष्ट्रीयता या दोहोंमध्ये सुसंवाद नांदेल अशी दक्षता नेहमीच घेतली पाहिजे, अशी त्यांची मौलिक सूचना आहे.

महाराष्ट्राचे समाजकारण, धर्मकारण व राजकारण यांच्या स्थितिगतीचा शोध सरदारांनी वेळोवेळी घेतला आहे. त्याबरोबरच साहित्यातील सामाजिक आशयाविषयीचे प्रकट चिंतन त्यांनी केले आहे. साहित्यातील परंपरा, संप्रदाय, प्रेरणा व परिवर्तन यांचाही अभ्यास त्यांनी केला आहे. परंपरा व नवता यांची बलस्थाने व शबलस्थानेही त्यांनी दाखवून दिली आहेत. तरीही नव्या वाङ्मयीन वादांचे स्वागत करण्याचीच त्यांची वृत्ती आहे. तशी क्षमता त्यांच्या ठिकाणी आहे. त्यामुळे वाङ्मयविश्वातील परिवर्तनाविषयी ते स्वागतशील आहेत. दलित साहित्याचे ते मनापासून कौतुक करतात. तीव्र यातनांतून विद्रोहाचे विचार घेऊन येणारे दलित कथा-काव्य त्यांच्या मनःप्रवृत्तीला सर्वस्वी स्वागतार्ह वाटते.

संत साहित्य असो, आधुनिक वाङ्मय असो, अथवा कोणतीही विचारप्रणाली असो, त्यांनी माणसाचे प्रश्न मांडावेत, त्या प्रश्नांची सोडवणूक करावी व मानवी विकासाच्या दिशा दाखवाव्यात, अशी अपेक्षा सरदार व्यक्त करतात.

वेदान्त व मानवी प्रतिष्ठा यांचे नाते सरदारांनी विशद केले आहे. वेदान्तविचारात परिस्थितीवर मात करण्याची जिद्द नाही. पण परिस्थितीला शरण न जाता आपले मनोधैर्य टिकवून धरावे आणि मनोवृत्ती निकोप असाव्यात, अशी प्रेरणा अध्यात्मापासून मिळते. परोपकार, कर्तव्यनिष्ठा व नम्रता अशा गुणांची जोपासना अध्यात्मावादाने केली, असा निष्कर्ष सरदारांनी काढला आहे.

अनुक्रमणिका

सांस्कृतिक विषमता व आर्थिक दुरवस्था नाहीशी झाल्याशिवाय समाजाचे दुखणे दूर होणार नाही, असे सरदारांचे मत आहे. कागदावरचे कोरडे कायदे करून दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत. सामाजिक अन्याय, विषमता व गुलामगिरी यांच्या मुळावर घाव घातला पाहिजे; तसेच जातीसंघटनाचे विसर्जन केले पाहिजे असे सरदार स्पष्टपणे सांगतात.

ज्ञानाची मक्तेदारी संपली पाहिजे;जात किंवा सत्ता यांच्या बळावर ज्ञानाची केंद्रे मूठभर व्यक्तींसाठी बंदिस्त राहता कामा नयेत; अशी मक्तेदारी आजच्या युगधर्माशी विसंगत आहे, हे सरदारांनी पुनःपुन्हा सांगितले आहे.

अस्पृश्यता आढळण्याचे खरे कारण दलितांचे मागासलेपण हे नसून स्पृश्यांच्या संकुचित कल्पना हे आहे. आपल्या धर्मविचारातील पापयोनित्वाच्या व स्पर्शजन्य विटाळाच्या कल्पनेत अस्पृश्यतेचे मूळ आहे. हे जायला हवे असेल तर समाजमन हे संपन्न, सकस, प्रगत व पुरोगामी बनले पाहिजे. बाह्य जीवनपद्धतीपेक्षा समाजाच्या अंतर्मनात परिवर्तन घडवून आणणे अधिक महत्त्वाचे आहे.

सामाजिक प्रश्नांचा अभ्यास मांडताना सरदारांची भूमिका श्रद्धाळू भक्ताची किंवा आवेशी पुरस्कर्त्याची नसते. डोळसपणाने ते ग्राह्याग्राह्य विवेक बाळगून कोणत्याही प्रश्नाचे विश्लेषण करतात. आगरकर, फुले व शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाकडे भूतदयेने पाहिले नाही. सामाजिक जीवनाची घडी समतेच्या तत्त्वावर बसविण्याच्या दृष्टीने त्या सर्वांनी या प्रश्नाकडे पाहिले. रानडे, लोकहितवादी, विष्णुबावा ब्रह्मचारी प्रभृती विचारवंतांच्या चिंतनाची बलस्थाने व शबलस्थानेही सरदारांनी साधार स्पष्ट केली आहेत.

सरदारांच्या समाजप्रबोधनाच्या मीमांसेचे स्वरूप समंजस, समतोल व सर्वस्पर्शी आहे. त्यांचा दृष्टिकोन आगरकरांच्या विचारधारेला बराच जवळचा आहे. स्वतंत्रता, ममता व बंधुता ही तीन तत्वे त्यांना विशेष प्रिय आहेत. रूढींचे प्रामाण्य त्यांना मान्य नाही. ते प्रखर बुद्धिवादी आहेत. त्यांची विज्ञाननिष्ठा बावनकशी आहे. त्याचा दृष्टिकोन समतोल आहे. व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे त्यांना पूर्ण भान आहे. त्यांची सहृदयता व्यापक आहे. प्रबोधनाचे प्रवक्ते म्हणून त्यांचे स्थान मोठे आहे. समाजमनस्कता हेच सरदारांच्या समाजचिंतनाचे प्राणतत्त्व आहे.

# ६.
# दलित साहित्याचे समालोचन

केशवसुतांच्या शब्दांत सांगायचे झाले तर सरदारांचा वाङ्मयीन प्रपंच हा 'साकल्याचा प्रदेश' आहे. 'मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे,' असा त्यांचा विशाल दृष्टिकोन आहे. त्यामुळे शोषितांविषयीची 'कळवळ्याची जाती' ही त्यांच्या समग्र साहित्यात सूक्ष्मपणे प्रत्ययास येते. पण अभ्यासाच्या सोयीसाठी थोडी विभागणी करून दलित साहित्याविषयीची त्यांनी केलेली मीमांसा त्यांच्या लेखनातील निवडक भागांतून शोधता येते. तो भाग प्राधान्याने पुढीलप्रमाणे आहे.

१) 'प्रबोधनातील पाऊलखुणा :' लेख आठवा : दलित साहित्यिकांशी हितगुज : पृष्ठे ११४ ते १२३.
२) 'नव्या युगाची स्पंदने :' लेख चौथा : दलित मुक्तीची समस्या : पृष्ठे ६५ ते ७५.
३) 'नव्या ऊर्मी, नवी क्षितिजे :'
अ) 'संक्रमणकाळाचे आव्हान' या लेखातील पृष्ठे ५४ ते ५७
आ) 'दलित साहित्य :' प्रेरणा, स्वरूप व दिशा :' पृष्ठे ८७ ते ९४
इ) 'दलित साहित्य अभिव्यक्तीच्या नव्या वाटा शोधणार का?' : पृष्ठे ९५ ते ९९.

वरील लेखनाच्या आधारे सरदारांच्या दलित साहित्याविषयीच्या विवेचनाचा परामर्श घेता येईल.

सामाजिकतेच्या अंगाने सरदारांनी दलित साहित्याचे समालोचन केले आहे. वाङ्मयीन गुणवत्ता व सामाजिक आशयघनता या दोन्ही कसोट्या लावून वाङ्मयाचा इतिहास लिहिला जावा, अशी त्यांची भूमिका आहे. केवळ वाङ्मयीन प्रवृत्तीवर भिस्त न ठेवता, समाजाच्या नवनिर्मितीचे दर्शन साहित्यात किमान घडते, याचाही शोध घेणे अगत्याचे आहे, अशी त्यांची धारणा आहे. सामाजिक न्यायबुद्धी व मानवतेची प्रतिष्ठा ही मूल्ये त्यांना महत्त्वाची वाटतात. त्यामुळे दलित साहित्याविषयी त्यांना विशेष आस्था वाटते. आपल्या ज्वलंत जाणिवांना मराठी साहित्यात स्थान नाही हे ओळखून दलित लेखकांनी विद्रोहाचे निशाण उभारले आणि आपल्या वेदनेला अक्षररूप दिले. सरदारांच्या मानवतावादी वृत्तीला हे बंड स्वागतार्ह वाटले.

दलितांच्या मुक्ती आंदोलनाची सांस्कृतिक आघाडी, असे दलित साहित्याचे स्थान आहे व त्यातच त्याचे खरे बळ आहे असे सरदारांना जाणवते. डॉ. आंबेडकरांच्या दलित चळवळीतील तत्त्वप्रणाली आधाराला घेऊन पदे, पोवाडे, कथा, आत्मनिवेदने या स्वरूपाचे दलित साहित्य निर्माण झाले. दलित लेखकांत कुठलाही न्यूनगंड नाही. त्यांच्या लेखनात जिवंतपणा आणि जिद्द आहे; दलित साहित्याचे अवलोकन करून सरदारांनी त्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. दलित लेखकांना केवलकलावादाची उपपत्ती मानवण्यासारखी नाही. साहित्याकडे ते समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहतात. आपले माणूसपण हिरावून घेणाऱ्या प्रस्थापितांशी संघर्ष ही दलित साहित्याची प्रेरणा आहे. शोषणावर आधारलेली अर्थव्यवस्था व जन्मसिद्ध अधिकार सांगणारी धर्मसंस्था यांच्याविरुद्धचा दुहेरी झगडा दलितांसमोर आहे हे सरदारांनी स्पष्ट केले आहे. आर्थिक आणि सांस्कृतिक अशा दोन्ही आघाड्यांवर संघर्ष करणे व नव्या जाणिवा जनमनात रुजविणे यांची दलित साहित्याला निकड वाटते.

दास्यवृत्तीचे जोखड झुगारून देऊन, समाजाचा स्वतंत्र घटक म्हणून जगण्याची उमेद दलित समाज बाळगू लागला आहे. 'आज आम्हांला या खोपटाखोपटांतून पूर्ण सूर्य दिसतोय!' असा निर्धार दलित कवींच्या

शब्दातून प्रगत होत आहे. काळोख व सूर्य -प्रकाश ही प्रतिमाने दलितांच्या काव्यात पुनःपुन्हा का येतात, हे सरदारांनी विशद केले आहे. काळोखाने ग्रासलेल्या मृतप्राय जीवनाला नकार आणि ज्वलंत प्रकाशमय जीवनाकडे वाटचाल अशा उभारीने त्यांचे लेखन चालू आहे असे सरदार म्हणतात.

'जळलेले आयुष्य पुन्हा निखाऱ्यासारखे फुलवायचे; म्हणून प्रकाशाची पायवाट मी जवळ केली आहे,' —हे मानसिक परिवर्तन सरदारांच्या मते ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. दलित साहित्यात साहित्यगुण कमी अधिक असतील, पण नव्याने जाग आलेल्या माणसाची तीव्र संवेदनशीलता व मुक्त भावनोद्रेक त्यात काठोकाठ भरून राहिला आहे. यात दुबळेपणाला थारा नाही. सरदार लिहितात, 'दलितांना आपल्या पूर्वपरंपरेचा इतका कडवट व क्लेशदायक अनुभव आला आहे की, तिच्यावर प्रहार करताना त्यांनी मागेपुढे पाहण्याचे काही कारण नाही. आपल्या सामाजिक सुधारणेच्या चळवळीत सर्वंकष क्रांतीची उर्मी क्वचितच आढळते. पावलोपावली सर्वांना सांभाळून घेण्याची व जुन्यानव्याचा समन्वय साधण्याची केविलवाणी धडपडच दिसून येते. या समन्वयशीलतेमुळेच आपण गेल्या कित्येक शतकांत कोणताच मूलभूत प्रश्न निकालात काढू शकलो नाही.' ' म्हणूनच दलित साहित्यातील बंडखोरपणाच्या वातावरणामुळे आपल्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीला नवी दिशा लाभण्याची शक्यता त्यांना जाणवते.

दलित साहित्याला महाराष्ट्र सारस्वताच्या वास्तूत स्वतंत्र दालन असले पाहिजे, हे सरदारांचे मत मान्य केलेच पाहिजे. पण सवर्ण साहित्यिकाची प्रतिभा दलितांच्या दुःखाला उद्गार देऊ शकणार नाही या सरदारांच्या मुद्याशी सहमत होणे अवघड आहे. 'अन्त्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' मांडणारे आणि 'मजुरावर उपासमारीची पाळी' आलेली पाहून अस्वस्थ होणारे केशवसुत, किंवा 'बन्सीधर आता तू कुठे जाशील?' या शंकेने ग्रासून गेलेले व 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' चे मनोगत सांगणारे बापूसाहेब माटे; अथवा 'बनगरवाडी' तील धनगरांची जीवनगाथा उलगडून दाखविणारे व्यंकटेश माडगूळकर या सर्वांनी 'दलितांच्या प्रत्यक्ष अनुभूतीची जागा' समर्थपणे सांभाळली आहे यात शंका नाही. मात्र समाजाने कित्येक शतकात ज्या दलितांचे 'मनुष्यत्वच हिरावून घेतले' होते, त्यांच्या वेदना व विद्रोह यांच्या आविष्कारासाठी दलित साहित्याचा 'सवता सुभा' असला पाहिजे, हे उघडच आहे. याच संदर्भात सरदारांनी दलित साहित्याचे उद्दिष्ट कोणते असावे हे सांगितले आहे. दलितांचे दलितपण समूळ नष्ट करणे हे दलित वाङ्मयाचे व दलितांच्या चळवळीचे अंतिम ध्येय असले पाहिजे. त्यासाठी दलित व श्रमिक लेखकांना आपल्या वाङ्मयीन तपस्येच्या बळावर एकंदर मराठी साहित्याचा कायापालट घडवून आणावा लागेल. सरदार (वामन मल्हारांप्रमाणे) आशावादी आहेत. पुढे कधी खऱ्या अर्थाने भारतीय समाज एकात्म बनला, तर मग दलित साहित्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजन उरणार नाही, मराठी वाङ्मयाच्या मोठ्या प्रवाहात ते सहजपणे विलीन होऊन जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

दलित साहित्यात नव्या समाजरचनेची प्रसादचिन्हे उमटू लागली आहेत असे सरदार सांगतात. दलितांचा लढा हा सामाजिक जीवनातील गुलामगिरी, शोषण व मनुष्यत्वाची विटंबना या गोष्टी नाहीशा करण्यासाठी आहे. त्यामुळे या साहित्यातील बंडखोरपणाच्या वातावरणाचे महत्व त्यांना जाणवते. यातूनच समाजात बदल घडवून आणण्याच्या चळवळीला नवे वळण लागण्याची शक्यता आहे असे त्यांना वाटते.

या स्वागताबरोबरच दलित लेखकांना व कवींना काही महत्त्वाच्या सूचनाही सरदारांनी स्पष्टपणे केल्या आहेत. भावना उत्कट व जिवंत असल्याशिवाय क्रांतिकारी आणि विद्रोही वाङ्मय निर्माण होऊ शकणार नाही हे त्यांना अर्थात्‌च मान्य आहे. तरीपण भावानोत्कटतेला शास्त्रशुद्ध ज्ञानाची व वस्तुनिष्ठ

अनुक्रमणिका

विचारांची जोड दिली जावी, असे त्यांना वाटते. दलितांच्या आंदोलनाला भक्कम वैचारिक अधिष्ठान मिळाले, तरच ते आंदोलन यशस्वी होऊ शकेल. अन्यायाविषयी केवळ चीड आल्यामुळे अन्यायकारक परिस्थिती बदलता येत नाही. त्या परिस्थितीची घडण दलित लेखकांनी समजून घेतली पाहिजे. 'वास्तवाच्या गतितत्त्वाचा अचूक वेध घेता आल्याखेरीज त्यातील जीर्णांश निपटून काढता येत नाही.' असे ते बजावतात.

नोव्हेंबर १९७९ मध्ये पुण्यास दलित साहित्य संमेलन भरले होते. तिथे 'दलित साहित्यातील गतिमानता कुंठीत झाली आहे काय ? तसे असेल तर ती गती प्रवाही कशी करता येईल?' या प्रश्नांची त्यांनी चिकित्सा केली. दलित साहित्यात एकसुरीपणा येत आहे. कथा व काव्य या प्रकारांतून हे साहित्य बाहेर पडू शकलेले नाही. कादंबरी, नाटक व लघुनिबंध यांच्या रचनातंत्राची माहिती करून घेऊन त्यातून निर्मिती झाली पाहिजे. सर्जनशील दलित लेखकांनी अभिव्यक्तीच्या नव्या वाटा शोधल्या पाहिजेत. तसे झाले तरच ते मराठी साहित्याला सामर्थ्यशाली नवे वळण देऊ शकतील. असे झाले नाही तर आजच्या प्रस्थापितांचे साहित्य दलितांच्या विद्रोही साहित्याला पंगू करून टाकील, असा इशारा सरदारांनी दिला आहे. मराठी भाषेच्या प्रांगणात उसळलेला दलित साहित्याचा चैतन्यशाली प्रवाह तुंबून राहता कामा नये. नवे बंड दिसले की, त्याला आपल्यात सामावून घ्यायचे व निस्तेज बनवायचे, ही आजच्या समाजव्यवस्थेची रीत आहे. तिच्यात दलित साहित्यिकांनी अडकू नये. त्यांनी आपली क्रांतिध्वजा फडकतच ठेवायला हवी, अशी अपेक्षा सरदारांनी व्यक्त केली आहे. त्याबरोबर सवर्णांतूनही दलित साहित्याचा जाणकार व चाहता वाचकवर्ग निर्माण झाला पाहिजे असे सरदार सांगतात.

दलित साहित्याने नव्या अनुभवांचे भांडार खुले केले आहे. या साहित्यात नकार आहे. मनाला बोचणाऱ्या विषमतेविरुद्ध या लेखकांनी आवाज उठवला आहे. त्यांच्या अभिव्यक्तीतून तत्त्वज्ञान प्रगट होत जाणार आहे. हे तत्त्वज्ञान मानवाच्या प्रतिष्ठेचे, सामाजिक न्यायाचे व संधीसमानतेचे तत्त्वज्ञान आहे, हे सरदार सांगतात, दलित साहित्यात केवळ ओजोगुण आणि नुसता भावनांकित विद्रोह नाही. त्या उत्कट भावनेतूनच सखोल तत्त्वचिंतन मुखरित होणार आहे, अशी रास्त अपेक्षा सरदारांनी व्यक्त केली आहे.

दलित साहित्याची पुरेशी समीक्षा अजून झालेली नाही, याचीही नोंद सरदारांनी केली आहे. या साहित्याकडे पाहणारे तीन वर्ग आहेत. एक वर्ग त्याची सोयीस्करपणे पूर्ण उपेक्षा करतो. दुसऱ्या वर्गाला या क्रांतिकारक प्रवाहाची व सामाजिक उलथापालथीची भीती वाटते. तिसरा वर्ग मात्र या नव्या प्रवाहाचे स्वागत करतो. तरीपण या साहित्याची वस्तुनिष्ठ मीमांसा होत नाही. वडिलकीच्या नात्याने या लेखकांची पाठ थोपटली जाते. कौतुक करण्यात येते. असे होता कामा नये. त्याची समरसतेने व यथोचित स्वरूपात चिकित्सा झाली पाहिजे, असे सरदारांना उत्कटपणे वाटते. दलितांमधूनच जर समीक्षक पुढे आले तर या साहित्याच्या मूल्यमापनातील न्यूनता दूर होईल. विद्यापीठीय क्षेत्रात दलितांचा वर्ग येत आहे. त्याने ही समीक्षा केली पाहिजे.

या साहित्याचे मूल्यमापन करताना सामाजिकतेबरोबरच कलात्मकतेलाही महत्त्व दिले जाते काय, या प्रश्नाचा पाठपुरावा सरदारांनी केला आहे. या साहित्यातील सामाजिक भूमिका अपरिहार्य आहे. त्याच्या अभिव्यक्तीत अजून पुरेसे सौंदर्य आलेले नाही. मात्र स्वाभाविकतेचे सौंदर्य त्यात आहे, असे सरदार स्पष्ट करतात.

अनुक्रमणिका

दि. ११ नोव्हेंबर १९७९ रोजी पुण्यातील 'रविवार सकाळ' मध्ये, श्री. अरुण खोरे यांनी घेतलेल्या सरदारांच्या मुलाखतीत ही मते मांडलेली आहेत. या मुलाखतीला सोळा वर्षे होऊन गेली. या अवधीत दलित साहित्याने बरीच प्रगती केली आहे. दलितांची अनेक आत्मकथने याची साक्ष देतील. एक अभिजात कलाकृती म्हणूनही हे साहित्य प्रगत झाले आहे. दलित समाजातील काही लेखक समर्थपणे पुढे आले आहेत. दलित लेखिकांनीही या साहित्यसृष्टीत मोलाचे योगदान केले आहे.

'मनुष्यत्वाची विटंबना, मग ती कुठेही व कोणाच्याही बाबतीत होवो, माणुसकीची चाड असणाऱ्या प्रत्येकाला तिची चीड आली पाहिजे.' अशा व्यापक जाणिवेने सरदार दलित साहित्याकडे पाहतात. केवळ सवर्ण आणि अस्पृश्य असा हा संघर्ष दिसत असला, तरी शोषक आणि शोषित हेच त्याचे खरे स्वरूप आहे. हा संघर्ष कालान्तराने मिटला (आणि तसा तो मिटावा!), तरी त्यातली व्यथा ही काळाला पुरून उरणारी आहे. तिचे चित्र दलित साहित्यातून यावे, असे सरदारांना अपेक्षित आहे. या वाङ्मयातले विषय दलितांविषयीचे आहेत. पण त्यांच्या चित्रणामागील प्रेरणा अधिक व्यापक व मूलगामी असल्या पाहिजेत, तरच हे वाङ्मय समाजातल्या सर्व थरांतील लोकांच्या अंतःकरणांना जाऊन भिडेल. अन्याय आणि अनीती यांनी ग्रासलेला समाज सर्वांच्याच नसला कारणीभूत होतो असे मार्मिक विश्लेषण सरदारांनी केले आहे.

दलितांच्या व्यथांची सोडवणूक, कीव येऊन न करता, हक्कांच्या पातळीवरून व्हावी, त्यांचे शोषण नष्ट व्हावे, त्यांना न्याय मिळावा व आत्मविकासासाठी त्यांना संधी प्राप्त व्हावी, यावर सरदारांचा भर आहे. दलित साहित्याच्या अंतरंगाचा वेध त्यांनी अशा व्यापक, समाजमनस्क दृष्टीकोनातून घेतला आहे.

दलितांच्या जीवनाची वैचारिक समीक्षा डॉ. आंबेडकरांनी सर्वप्रथम केली. त्यांचे हे ऋण सरदारांनी जाणीवपूर्वक नोंदविले आहे. पण दलित समाजातील अन्य अभ्यासकांनी तसेच दलितेतर समाजातील अभ्यासकांनी दलित साहित्याची जी समीक्षा केली आहे, तिची पुरेशी दखल सरदारांनी घेतलेली नाही हे नोंदविणे जरुरीचे आहे.

डॉ. म. ना. वानखेडे यांनी 'आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य म्हणजे दलित साहित्य' ही व्याख्या सर्वप्रथम नेमकेपणाने मांडली. समाजाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत, एक सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ म्हणून दलित साहित्याच्या चळवळीला महत्त्वाचे स्थान आहे, हे त्यांनी आवर्जून सांगितले. 'दलितांचे विद्रोही साहित्य' )(१९८१) हा त्यांचा ग्रंथ दलित साहित्याला तात्त्विक अधिष्ठान देणारा आहे. 'दलित साहित्याची नौका पहिल्या वादळी लाटांतून सुरक्षितपणे सांभाळणारा कप्तान' असा त्यांचा समुचित उल्लेख रा. ग. जाधव यांनी केला आहे. बाबूराव बागुल यांनी 'दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान' (१९८१) या आपल्या ग्रंथात, दलित साहित्य हे सूडवाद्यांचे साहित्य नसून, जग व जीवन नव्याने मांडणारे ते साहित्य आहे, असे म्हटले आहे.

गंगाधर पानतावणे (मुल्यवेध, १९७४), शंकरराव खरात (दलित वाङ्मयः प्रेरणा व प्रवृत्ती, १९७८), अर्जुन डांगळे (दलित साहित्य : एक अभ्यास, १९७८) यशवंत मनोहर (दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप, १९७८) केशव मेश्राम (समन्वय, १९७९) अशा मातबर दलित अभ्यासकांनी या साहित्याची केलेली मीमांसा सरदारांच्या समीक्षेला पोषक व पूरक ठरणारी आहे.

म. भि. चिटणीस, नरहर कुरुंदकर, रा. ग. जाधव, सदा कऱ्हाडे, वा. ल. कुळकर्णी, शरच्चंद्र मुक्तिबोध, वि. स. जोग, बाळकृष्ण कवठेकर, भालचंद्र फडके, आरती कुलकर्णी या दलिततेर समीक्षकांनीही सरदारांच्या आगेमागे दलित साहित्याचे अंतरंग साधार विशद केले आहे. सरदारांनी केलेली दलित साहित्याची चिकित्सा स्वायत्त व मूलगामी आहे. या साहित्याची बलस्थाने त्यांनी मनःपूर्वक गौरविली आहेत. त्याबरोबरच त्याची शबलस्थानेही हेरून स्पष्टपणाने दलित लेखकांना त्यांनी त्याविषयी इशारा दिला आहे. एका व्यापक स्तरावरून दलित साहित्यिकांचा निर्देश ते करतात व त्यांच्या लेखनामागील प्रेरणांचा व प्रवृत्तींचा शोध घेतात. पण ते करताना त्यांनी दलित समीक्षक व दलिततेर समीक्षक यांनी केलेले दलित साहित्याचे मूल्यांकन विचारात घेतले असते, तर बरे झाले असते, त्यांच्या या सूक्ष्मदर्शी समीक्षेला सर्वस्पर्शी स्वरूप प्राप्त झाले असते.

इथेच आणखी एक मुद्दा नोंदविला पाहिजे. जनाबाई-चोखोबांसारखे उपेक्षित समाजातील संतकवी आणि अर्जुन डांगळे-त्र्यंबक सपकाळे यांच्यासारखे आजचे दलित कवी यांच्यामध्ये एक मूलभूत फरक आहे. संस्कारांचे दडपण चोखोबा फेकून देऊ शकत नाहीत. त्यांची प्रेरणा वेदनेला केवळ वाचा फोडण्याची होती. आजच्या दलित साहित्यिकांची उर्मी नवा समाज घडविणारी आहे. सरदारांच्या विवेचनाला या एका विचाराची जोड देणे जरुरीचे आहे.

दलित साहित्याची आणि दलितांच्या चळवळीची सरदारांनी केलेली मीमांसा ही मौलिक स्वरूपाची आहे. पण तितकीच ती मीमांसा त्यांच्यापुरती मर्यादितही आहे. दलित समीक्षक व दलितेतर समीक्षक यांनी या प्रश्नांचा वेध विचारात घेणे हे या संदर्भात उपयुक्त ठरेल.

सरदारांच्या आधीही श्री. म. माटे यांनी 'अस्पृश्यांचा प्रश्न' विवेचिला आहे. आपल्या या समाजबांधवांच्या उद्धारासाठी त्यांनी पंधरा वर्षे प्रथम काम केले आणि मगच तो विषय आपल्या ग्रंथातून त्यांनी मांडला आहे. माटे यांचे लेखन '*हें तो प्रचीतीचें बोलणें*' आहे. ते म्हणतात, 'जुन्या सुधारकांच्या मताप्रमाणे अस्पृश्यतेचा व एकंदर हिंदूंच्या वर्णव्यवस्थेचा प्रश्न धार्मिक नसून तो वांशिक आहे. त्रैवर्णिकांनी येथील आदिद्रविडांना अस्पृश्य लेखून त्यांच्या उत्कर्षाच्या सर्व संधी नष्ट केल्या, हा अत्यंत असा घोर अन्याय झाला आहे. जुनी शास्त्रे बाजूस सारून आपण या वर्गाला समसंधी दिली नाही, तर त्यांची मानवता प्रगल्भ होणार नाही; व आपल्या राष्ट्राचा घात होईल.' अस्पृश्यतेचे मूळ कारण धार्मिक आहे, असा समज झाल्यामुळे साहजिकच धर्मांतर केल्याने ते नष्ट होईल -हा भ्रम आहे, असा सावधानतेचा इशारा माटे यांनी दिला आहे. पुढे डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांचे सामुदायिक धर्मांतर घडवून आणले, पण त्यानंतरही नवबौद्धांच्या प्रश्नांची व सामाजिक विषमतेच्या शल्याची बोच बोथट झाली नाही, असा इतिहास आहे. त्यामुळे माटे यांचे मत विशेष विचारार्ह ठरते.

दलित वाङ्मयाचा सवतासुभा कशासाठी, याचे उत्तर देताना सरदारांनी दलित व दलितेतर यांची जगेच भिन्न असल्याचा खुलासा केला आहे. गावकुसाबाहेर पिढ्यानपिढ्या जगलेल्या बांधवाच्या व्यथांची जात वेगळी आहे. सवर्ण प्रतिभावंत लेखकांची कल्पकता व सहानुभूती दलितांच्या अनुभवापर्यंत पोचू शकणार नाही. दलितांच्या अंतःकरणातले कढ व्यक्त करण्यासाठी वेगळ्या व्यासपीठाची गरज आहे, असे सरदारांना जाणवते. पण त्याबरोबरच 'पुढे कधी खऱ्या अर्थाने भारतीय समाज एकात्म बनला, तर मग दलित वाङ्मयाच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजन उरणार नाही. मराठी साहित्याच्या मोठ्या प्रवाहात ते वाङ्मय सहजपणे विलीन होऊन जाईल. दलित वाङ्मयाचे अंतिम उद्दिष्टच मुळी दलितपण समूळ नष्ट करणे, हे

आहे.' [अध्यक्षीय भाषण, गं. बा. सरदार, दलित साहित्य संमेलन मुंबई, १९७८.] सरदारांचा हा आशावाद लक्षणीय आहे. दलित साहित्यिकांनी व दलित मुक्ती आंदोलनातील कार्यकर्त्यांनी आपल्या चळवळीसाठी सर्व जातिस्तरांतील कार्यकर्त्यांची मदत घ्यावी; आणि केवळ जन्माची कसोटी न लावता, दलितांनी आपली भूमिका अधिक व्यापक व डोळस ठेवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. माणसाविषयीच्या अथांग सहानुभूतीच्या पायावर सरदारांचे दलितविषयक चिंतन साकार झाले आहे.

अनुक्रमणिका

७.

# समारोप

सरदारांच्या समग्र साहित्यसंपदेचे समालोचन केल्यानंतर काही गोष्टींचा एकत्रितपणे विचार करायचा आहे.

१. एकेका लेखनक्षेत्रात सरदारांनी घातलेली वैशिष्ट्यपूर्ण वैचारिक भर.
२. एक व्यक्ती म्हणून, तसेच एक विचारवंत म्हणून घडणारे सरदारांचे दर्शन.
३. आज महाराष्ट्रात चाललेले-
(अ) संतवाङ्मयाचे सामाजिक दृष्टीने विवेचन,
(आ) एकोणिसाव्या शतकातील व्यक्तित्वांचा अभ्यास,
(इ) दलित साहित्याचे समालोचन,
या तिन्ही अभ्यासांत सरदारांच्या भूमिकेमुळे काही फरक जाणवतो,किंवा कसे, याचा शोध.
४. भाषाशैली आणि वक्तृत्वशैली.
५. सरदारांची साहित्यदृष्टी.
६. सरदारांची जीवननिष्ठावरील मुद्द्यांना अनुलक्षून सरदारांविषयीच्या या अभ्यासाचा आढावा घेणे योग्य ठरेल.

**१. सरदारांची लेखनक्षेत्रे**

अव्वल इंग्रजीतील गद्य, उपेक्षित समाजचिंतक, संतसाहित्य, समाजप्रबोधन आणि दलित साहित्य या पाच प्रमुख क्षेत्रांत सरदारांनी लेखन केले आहे हे आपण पाहिलेच आहे.

‘अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका’ या सरदारांच्या ग्रंथविषयाला समांतर असा ग्रंथ दत्तो वामन पोतदारांचा आहे, ‘मराठी गद्याचा इंग्रजी अवतार’ हे पोतदारांच्या ग्रंथाचे नाव आहे. पोतदारांची भूमिका काहीशी नकारात्मक आहे. अव्वल इंग्रजीतील मराठी गद्य काहीसे ‘शालोपयोगी’ स्वरूपाचे आहे, तसेच त्याची गुणवत्ताही बेताची आहे, असा पोतदारांच्या विवेचनाचा सूर आहे.

सरदार मात्र या गद्याची जमेची बाजू प्राधान्याने पुढे करतात. ते या कालखंडाला ‘अर्वाचीन’ (म्हणजे ‘आजकालचे’) हे विशेषण जाणीवपूर्वक वापरतात. ‘आधुनिक’ (अधुना : आता किंवा हल्ली) असे म्हणत नाहीत. त्यांचा हा बारकावाही लक्षणीय आहे. विविध वाङ्मयप्रकारांची निर्मिती त्या त्या सामाजिक पर्यावरणामध्ये होत असते. उदाहरणार्थ, नियतकालिकांसारखा लेखनप्रकार किंवा निबंधासारखा वाङ्मयप्रकार पुढील काळात विकसित होत गेला. या गद्याचे अर्वाचीन मराठी वाङ्मयेतिहास-लेखनाची पायाभरणी केली, या गद्याकडे पाहण्याचा सरदारांचा हा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.

‘महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी’ या ग्रंथात सरदारांनी दुर्लक्षित झालेल्या समाजचिंतकांकडे लक्ष वेधले आहे. के. नारायण काळे हे महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक झाल्यानंतर त्यांनी एकोणीसाव्या शतकातील विचारवंत व कार्यकर्ते यांची चरित्रमाला गुंफण्यास सरदारांना प्रवृत्त केले. चिपळूणकरांच्या अगोदर महाराष्ट्रात कर्तबगार लेखक व विचारवंत झालेच नाहीत, या भ्रामक समजुतीमुळे मालापूर्व काळातील लेखकांची उपेक्षा झाली होती. भाऊ महाजन, लोकहितवादी, विष्णुबावा ब्रह्मचारी, जोतीराव फुले व विष्णुशास्त्री पंडित या मालापूर्व विचारवंतांच्या वाङ्मयाच्या आधारे सरदारांनी आपल्या या ग्रंथात त्यांच्या

कामगिरीवर प्रकाश टाकला आहे. या उपेक्षित प्रबोधनकारांच्या कार्याची सरदारांनी घेतलेली दखल लक्षणीय आहे. मात्र या श्रेय-नामावलीत बाळशास्त्री जांभेकर याचा समावेश करण्याचे राहून गेले आहे;जांभेकरांचे विचारधन तेवढेच महत्त्वाचे होते.

संतसाहित्य हे सरदारांच्या विशेष व्यासंगाचे व अभिरुचीचे अभ्यास क्षेत्र आहे. निवृत्तिनाथांपासून निळोबांपर्यंतचे वारकरी संत हेच तेवढे 'संत' या पदवीचे मानकरी होते, या रूढ समजुतीला सरदारांनी मुरड घातली आणि संत साहित्याचे व्यासपीठ यपेक्षा व्यापक असल्याची जाणीव त्यांनी करून दिली. 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या आपल्या ग्रंथात ज्ञानदेव, नामदेव, चोखामेळा, एकनाथ व तुकाराम या वारकरी पंथातील अग्रणींच्या काव्याचे समालोचन तर त्यांनी केलेच, पण त्याबरोबरच महानुभाव, जैन आणि रामदासी या तिन्ही पंथांतील प्रणेत्यांच्या कार्याचा परामर्श त्यांनी घेतला. वारकरी संतांचे काव्य प्रातिनिधिक स्वरुपात अभ्यासकांना उपलब्ध व्हावे, या भूमिकेतून एकनाथ, तुकाराम व रामदास यांच्या काव्यसंपदेचे वेचे सरदारांनी संपादित केले. त्या संग्रहांना त्यांनी लिहिलेल्या विवेचक प्रस्तावना उद्बोधक आहेत.

मात्र सरदारांच्या विवेचनाचा भर वारकरी संप्रदायाच्या कार्यावर अधिक आहे, तसेच नाथपंथ व दत्त संप्रदाय यांविषयीचे स्वतंत्र व सविस्तर विवेचन त्यांच्या ग्रंथात समाविष्ट झाले असते, तर त्यांनी केलेल्या विमर्शाला समग्रता लाभली असती.

समाजचिंतन हेही सरदारांच्या अभ्यासाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. संतसाहित्याचा अभ्यास सरदारांनी व्यापक अशा सामाजिक भूमिकेतून मांडला. त्याचप्रमाणे त्यांच्या समाजचिंतनाला संतवाङ्मयाच्या साधुत्वाची व शुचितेची जोड मिळाली.

सरदारांचे समाजचिंतन कटाक्षाने सामाजिक वास्तवावर आधारलेले आहे. एकोणीसाव्या शतकातील प्रबोधनाची मीमांसा असो, किंवा विसाव्या शतकातील लेखकांच्या विचारधनाची चिकित्सा असो, सरदार सामाजिक स्थित्यंतराची कारणमीमांसा सूक्ष्म दृष्टीने आणि विश्लेषणात्मक पद्धतीने करतात. विशेषतः एकोणिसावे शतक व स्वातंत्र्योत्तर कालखंड यांविषयीच्या त्यांच्या अभ्यासात हे वैशिष्ट्य जाणवते. इंग्रजी राजवट आल्यानंतर झालेल्या बदलांची चिकित्सा, तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील नवविचारांच्या प्रवाहांची मीमांसा सरदारांनी मार्मिकपणे केली आहे. मात्र सरदारांच्या समाजचिंतनाची दृष्टी त्याच्या स्वतःपुरतीच सीमित राहते. आपल्या समकालीन विचारवंतांच्या आणि समीक्षकांच्या लेखनाचे संदर्भ त्यांच्या विवेचनात अभावानेच आढळतात.

दलित साहित्य व दलित चळवळ यांविषयी सरदारांनी समरसतेने लिहिले आहे. दलितविषयक त्यांच्या विचारविमर्शात दलितांविषयीची केवळ सहानुभूती नसून, त्यामध्ये आत्मीयतेचा प्रत्यय प्रकर्षाने येतो. दलित लेखक व दलित कवी यांच्या साहित्यकृतींचे संदर्भ देऊन, त्यांच्या समस्यांची सरदारांनी उकल केली आहे. मात्र स्वकालीन दलितेतर समिक्षकांच्या विवेचनाचे उल्लेख करण्याचे अवधान त्यांनी ठेवलेले नाही.

अनुक्रमणिका

## २. सरदारांचे व्यक्तिमत्व

ठाणे जिल्ह्यातील जव्हार या संस्थांनी गावात १९०८ मध्ये सरदारांचा जन्म झाला. तिथला निसर्ग सुंदर आणि संपन्न; पण तिथला माणूस मात्र दुबळा आणि दरिद्री. वारली व ठाकर या आदिवासींचा तो मुलुख; त्यांच्या पिचलेल्या मनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न सरदारांनी बालपणापासून केला. 'उपेक्षितांचे अंतरंग' = अभ्यासण्याचे बीजारोपण यातूनच झाले असावे.

महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या पुण्यातील महिला महाविद्यालयात सरदारांनी मराठीचे अध्यापन केले. तिथे वामन मल्हार जोशी, रा. कृ. लागू, वा. दा. गोखले, कमलाबाई देशपांडे असे व्यासंगी व निष्ठावंत प्राध्यापक-सहकारी त्यांना भेटले. वामन मल्हारांचा दुर्दम्य आशावाद आणि सत्यान्वेषक दृष्टिकोन यांचा प्रभाव सरदारांच्या मनावर पडला असावा, असे मानण्यास जागा आहे. एकीकडे गांधीवाद, तर दुसरीकडे मार्क्सवाद यांतून त्यांच्या व्यक्तित्वाची घडण होत गेली. तीस सालच्या मिठाच्या सत्याग्रहात ते सामील झाले होते. पण लवकरच त्यांनी तटस्थपणे स्वतःचाच शोध घेतला. आपले व्यक्तित्व कृतिशीलतेपेक्षा चिंतनशीलतेकडे अधिक झुकणारे आहे, हे त्यांना उमगले. म्हणूनच पुढे धकाधकीच्या प्रत्यक्ष राजकारणाऐवजी वैचारिक जागृतीतून समाजप्रबोधनाच्या कामाकडे ते वळले.

१९३४ ते १९४० अशी सहा-सात वर्षे सरदार नोकरीविना घरीच बसून होते. त्या काळात त्यांनी मराठी संत, महात्मा गांधी व कार्ल मार्क्स याचे ग्रंथ वाचून काढले. या अभ्यासाची पुण्याई त्यांना पुढे फार उपयोगी पडली. त्यांच्यातील सश्रद्ध व आशावादी अशा भारतीय मनाने मार्क्सवादाचा स्वीकार केला होता, पण त्यातील आक्रस्ताळेपणा त्यांच्या वृत्तीत आला नाही. त्यांच्या स्वभावात सहिष्णुता होती. भारतीय संस्कारातून व गांधीवादाच्या प्रभावातून ती सहिष्णुता आली होती.

महिला महाविद्यालयात वामन मल्हारांचे एक सहकारी म्हणून सरदारांनी काम केले. वामन मल्हारांनी आपल्या पाच कादंबऱ्यांतून इंग्रजी शिक्षणामुळे जागृत झालेल्या 'नव्या स्त्री' चे दर्शन घडविले. त्या मानाने सरदारांचे स्त्रीजीवनविषयक लेखन अल्पमात्र आहे. दलित बांधावांप्रमाणे स्त्रीसुद्धा उपेक्षित व दुःखी आहे, असे खाजगी संभाषणातून सरदार आस्थेने बोलत असत. स्त्रीच्या अगतिक अवस्थेला आपली सामाजिक चौकटच कारणीभूत आहे, असे त्यांचे मत होते. दलितांच्या प्रश्नांविषयी सरदारांनी पुरेसे लेखन केले. मात्र स्त्रियांच्या समस्यांना त्यांच्या साहित्यनिर्मितीत फारच थोडी जागा मिळाली.

सरदारांच्या विचारधनाचा आज कोणत्या स्वरूपात प्रभाव पडलेला दिसतो, याचाही मागोवा घेतला पाहिजे. इथे एक गोष्ट जाणवते, त्यांच्या पिढीतील काही प्राध्यापकांच्या वाट्याला जे एक विशेष भाग्य आले, ते सरदारांना पुरेसे लाभले नाही. त्यांचे 'स्कूल' निर्माण होऊ शकले नाही. त्यांचे समकालीन असलेले श्री. म. माटे, रा. श्री. जोग किंवा वा. ल. कुलकर्णी यांना समर्थ छात्रांची एक परंपरा लाभली. सरदारांच्या बाबतीत ते घडले नाही. "शिक्षणाचा उंबरठा ओलांडून संसाराच्या दरवाज्यात मुलींनी पाउल टाकले की, त्या गुडूप होतात. ज्ञान व संस्कार घेताना महाविद्यालयात हिरिरी दाखविणाऱ्या कितीतरी मुलींची नावेसुद्धा मागून ऐकू येत नाहीत" ही सरदारांची या संदर्भातील प्रतिक्रिया बोलकी आहे. पद्मा गोळे, संजीवनी मराठे, सेवा चौहान, अलका इनामदार, मंदा खांडगे अशी हाताच्या बोटांवर मोजता येतील, एवढीच सरदारांच्या नामवंत विद्यार्थिनींची नावे इथे नोंदविता येतील.

ही कसर सरदारांनी वेगळ्या मार्गाने भरून काढली, पु. ल. देशपांडे, ह. श्री. शेणोलीकर, नलिनी पंडित, मु. ग. पानसे व मालती किर्लोस्कर हे पाच नामवंत अभ्यासक सरदारांच्या घरी अनौपचारिक अभ्यासमंडळात येत असत. त्यांच्या अभिरुचीचा सरदारांच्या लेखनावर कमी अधिक प्रभाव दिसतो.

या काळात कला आणि जीवन यांच्या संबंधाची चर्चा साहित्यक्षेत्रात सतत चालत होती. सरदारांनी त्यातील जीवनवादाचा संदर्भ अधिक व्यापक आणि डोळस केला.

**३. (अ) संतसाहित्याचे समाजसन्मुख विवेचन**

आज संतसाहित्याचे विवेचन सामाजिक दृष्टीकोनातूनच होत आहे. गो. म. कुलकर्णी, ह. श्री. शेणोलीकर, निर्मलकुमार फडतुले, ल. रा. नासिराबादकर प्रभृती अभ्यासक संतसाहित्याचा अभ्यास करताना विधायक दृष्टीकोनातूनच त्याच्या सामाजिक व सांस्कृतिक फलिताचा शोध घेत आहेत. ऐतिहासिक भूमिकेतून व विश्लेषणात्मक पद्धतीने विवेचन करण्याकडे या सर्वांचा कल आहे. त्यांची ही अभ्यासदृष्टी सरदारांच्या दृष्टीकोनाशी समांतर आहे. सरदारांच्याच भूमिकेचा पुरस्कार हे लेखक स्वायत्त पद्धतीने करीत आहेत.

सरदारांना समकालीन असलेल्या काही विचारवंतांनी एकतर निषेधपर भूमिकेतून संत वाङ्मयाचा परामर्श घेतला, तर दुसरीकडे एखाद-दुसऱ्या समीक्षकाने संतकाव्याच्या सामाजिक फलिताचे टोकाचे समर्थन केले. पुढच्या पिढीतील अभ्यासकांनी या दोन्ही अतिरेकी भूमिका टाळल्या आणि सरदारांच्या समतोल व ऐतिहासिक दृष्टीचा स्वीकार केला.

**३. (आ) एकोणिसाव्या शतकातील मानकरी**

सरदारांनी महाराष्ट्राचे जे उपेक्षित मानकरी अभ्यासले, ते एकोणीसाव्या शतकातील होते. सरदारांच्या या अभ्यासाचे वेगळेपण विशेष लक्षणीय आहे. आपल्याकडे बरेच अभ्यास-प्रकल्प एकदेशीय असल्याचे जाणवते. एकीकडे चिपळूणकर व दुसरीकडे फुले यांच्याविषयीचे काही अभ्यास-प्रकल्प थोड्याफार जातीय अधिष्ठानावरुन झाले आहेत. सरदारांनी मात्र वस्तुनिष्ठ व साधार विश्लेषण करून या दोघांच्या विचारांचे यथार्थ स्वरूप समतोलपणे मांडण्याची दृष्टी दिली.

तीच गोष्ट लोकहितवादी यांच्याविषयीच्या अभ्यासाची. लोकहितवादींची वैचारिक भूमिका समजावून घेण्यापेक्षा त्यांचा परखडपणा व त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील दुबळेपणा यांचेच अधिक भांडवल केले गेले. सरदारांनी मात्र लोकहितवादींचा बुद्धिवाद, समाजहिताची कळकळ व विचारसरणीचा गाभा यथार्थ स्वरूपात विशद केला. अव्वल इंग्रजीतील अन्य उपेक्षित मान्यकऱ्यांचीही त्यांनी अशीच ओळख करून दिली.

स. गं. मालशे ('गत शतक शोधिताना') नलिनी पंडित ('महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास') सरोजिनी वैद्य ('गोपाळ हरी' आणि काशीबाई कानिटकर') अशा काही जाणकार समीक्षक –संशोधकांची नावे इथे नमूद करता येतील. त्यांनी सरदारांच्या समधात विचारसरणीची परंपरा जोपासली आहे.

**३. (इ) दलित सहित्याचे समालोचन**

दलित साहित्याची व दलितांच्या चळवळीची दिशा यासंबंधी सरदारांनी केलेले लेखन समृद्ध व सकस आहे. या चैतन्यशाली नव्या प्रवाहाचे सरदारांनी मनापासून स्वागत केले आहे. जखमेतून ठिबकणाऱ्या रक्तबिंदुंचे चैतन्य घेऊन हे साहित्य सरस्वतीच्या प्रांगणात अवतरले आहे. सवर्ण लेखकांच्या साहित्यात दलितांविषयी सहानुभूती आहे. ('कसली रे मेल्या सहानुभूती ?' या खाडिलकरांच्या 'बायकांचे बंड' या नाटकातील उद्‌गाराची आठवण श्री. म. माटे यांनी या संदर्भात करून दिली आहे.) ही सहानुभूती दलितांच्या प्रत्यक्ष अनुभूतीची जागा घेऊ शकणार नाही. गावकुसाच्या आतल्या कवितेत आत्मसंतोष आहे, तर गावकुसाबाहेरच्या कवितेत विद्रोह आहे. दलितांच्या वेदनेशी व विद्रोहाशी समरस होऊन सरदारांनी दलित साहित्याची समीक्षा केली आहे.

दलित साहित्य संमेलनातील सरदारांचे अध्यक्षीय भाषण, दलित व्यासपीठांवरील त्यांचा वैचारिक सहभाग आणि अनेक दलित साहित्यिकांनी व समिक्षकांनी वेळोवेळी त्यांच्या घरी जाऊन घेतलेले मार्गदर्शन यामुळे ते साहित्यिक व समीक्षक आज आत्मशोधास प्रवृत्त झालेले दिसतात. सरदार हे त्यांच्या दृष्टीने एक अत्यंत विश्वासार्ह व्यक्तिमत्व होते, याचा प्रत्यक्ष बार्शी येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद प्रा. सरदारांकडे ज्या पद्धतीने आले त्यावरून सर्वांनाच आला (फेब्रुवारी १९८०)

**४. (अ) सरदारांची भाषाशैली**

सरदारांच्या सत्वसंपन्न व्यक्तिमत्वाची निशाणी म्हणून त्यांच्या भाषाशैलीचा उल्लेख करता येईल. 'मितलेप' हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य आहे. या संदर्भात एखादे उदाहरण पुरेसे होईल. सरदार लिहितात, "संतांचे व आधुनिक सुधारकांचे कार्य सर्वस्वी वाया गेले, असे आपण म्हणू शकत नाही. हा लांब पल्ल्याचा मार्ग आहे. त्याच्या प्रत्येक टप्प्यावरील अपयशात भावी यशाची बीजे दडलेली आहेत. वेळोवेळी अशी अपयशे पचवूनच आपल्याला यशाचे शिखर गाठता येणार आहे. वास्तविक पाहता हे खरे अपयशही नव्हे. या बाबतीत पांढरे शुभ्र आणि काळेकुट्ट अशी टोकाची विभागणी निरर्थक आहे. यशापयशाच्या कसोट्या कालसापेक्षच ठेवाव्या लागतात. सच्च्या सुधारकाच्या ठिकाणी ही मूलगामी ऐतिहासिक दृष्टी असली, तर तात्कालिक अपयशाने त्याचे मनोधैर्य कधी खचत नाही."

दोन संतांच्या कार्याचे तौलनिक विवेचन करतानाही सरदारांच्या लेखणीचा तोल ढळत नाही. उलट त्यातून त्यांची मर्मग्राही दृष्टी प्रत्ययास येते. 'तुका झालासे कळस' या उक्तीचे मर्म स्पष्ट करताना ते लिहितात, "वारकरी संतपरंपरेचे मुकुटमणी तुकाराम यांनी एकनाथांचे लोकजागृतीचे व समाजसुधारणेचे कार्य अधिक उत्कटतेने व तेजस्वितेने पुढे चालू ठेवले. मात्र या दोघांच्या प्रकृतीत व परिस्थितीत खूपच अंतर होते. त्यामुळे एकनाथांनी वेळोवेळी तडजोडीचा मार्ग स्वीकारला, पण तुकारामांचे धोरण बहुधा आक्रमकच राहिले. एकनाथांच्या न्यायनिष्ठेचे तुकारामांच्या न्यायनिष्ठुरतेत रूपान्तर झाले. आपल्या तिखट व मर्मभेदी शब्दांनी समाजातील अनिष्ट प्रवृत्तींवर तुकोबांनी निर्भीडपणे हत्यार उपसले."

सरदारांची सगळीच पुस्तके आकाराने आटोपशीर आहेत. संत आणि समाज हे दोन विषय त्यांच्या चिंतनाचे, लेखनाचे आणि व्याख्यानांचे आहेत. आरंभी त्यांनी या विषयांवर विविध वैचारिक/वाङ्मयीन नियतकालिकांतून स्फुट लेख प्रसिद्ध केले. त्याच लेखांचे संग्रह यथावकाश पुस्तकांच्या रूपाने प्रकाशित झाले. 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' त्यांच्या पुस्तकाचे उदाहरण, प्रातिनिधिक स्वरूपाचे म्हणून देता

येईल. १९५० पासून १९८२ पर्यंत या पुस्तकाच्या चार आवृत्ती वेळोवेळी निघाल्या. मधल्या काळात सरदारांनी संतविषयक जे जे स्फुट लेख लिहिले, ते ते लेख प्रत्येक आवृत्तीत वेळोवेळी समाविष्ट करण्यात आले.

सरदारांनी वेळोवेळी गुंफलेल्या व्याख्यानमालांच्या बाबतीतही असेच घडले. 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' (कौशिक व्याख्यानमाला, १९७१), 'न्या. रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा' (सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, १९७३) आणि 'आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार' (व्हीनस प्रकाशन व्याख्यानमाला, १९७५) ही या संदर्भातील ठळक उदाहरणे होत. याच मालांची पुढे पुस्तके निघाली. सरदारांनी आपल्या व्यासंगाच्या व चिंतनाच्या विषयांवर सलग ग्रंथ (ट्रीटाइज) किंवा प्रबंध (थीसिस) लिहिलेला नाही. दीर्घतेपेक्षाही अल्पाक्षरता त्यांच्या लेखणीला अधिक मानवते, हेच त्यामागील कारण असावे.

## ४. (आ) सरदारांची वक्तृत्वशैली

सरदारांच्या साहित्यसेवेचे एक पृथगात्म वैशिष्ट्य नमूद करणे आवश्यक आहे. ते जसे थोर लेखक होते, तसेच ते प्रभावी वक्तेही होते. लेखणी आणि वाणी या दोन्ही माध्यमांवर त्यांचे असाधारण प्रभुत्व होते. त्यांच्या लेखणीतून कागदावर उतरणारा प्रत्येक शब्द जसा गोळीबंद व आशयघन असे, तसेच व्याख्यानसमयी त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे शब्द चैतन्यमय असत. 'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे,' अशी त्यांची वक्तृत्वशैली होती. प्राजक्ताची फांदी हलवल्यावर फुलांचा टपटपा वर्षाव व्हावा, तशी विचारपुष्पे त्यांच्या बोलण्यातून बाहेर पडत. श्रोत्यांची मने त्यामुळे गंधित आणि पल्लवित होत असत. सरदारांचे व्याख्यान संपल्यानंतर तिथून परतताना श्रोत्यांच्या मनात विचारांचे वादळ सुरु होई. सरदारांच्या प्रतिपाद्य विषयाचे व त्यातील मुद्द्यांचे आपण अंतर्मुख होऊन चिंतन केले पाहिजे, अशी ऊर्मी श्रोत्यांच्या मनात उमटत असे.

सरदारांचे व्याख्यान रससंपन्न व प्रवाही असे. त्या मानाने त्याचे लेखन तेवढे आकलनसुलभ नाही. ते काहीसे खव्यासारखे घट्ट आहे. वाचकाची बौद्धिक पूर्वतयारी पुरेशी असेल, तरच त्यांच्या लेखनातील आशय उलगडत जातो. हा आशय सूक्ष्म व सखोल असतो. त्याला अनेक पैलू असतात. भारवी या कवीच्या काव्याप्रमाणे अर्थगौरव ('टर्सनेस') हा सरदारांच्याही लेखनशैलीचा गुणविशेष आहे. वाचता वाचता मध्येच थबकावे, मागचे वैचारिक धागे ओळखून घ्यावेत व मग पुढे जावे, असा वाचनप्रवास केला तरच सरदारांचे लेखन समजून घेता येते. त्यातील विचारांची झेप पाहून वाचकाचे मन थक्क होते. (उदाहरण द्यायचे झाले, तर प्रा. मे. पुं. रेगे यांची लेखनशैली याच जातकुळीतील आहे.)

सरदारांच्या व्याख्यान-शैलीचे मार्मिक रसग्रहण दि. के. बेडेकरांनी केले आहे. **['साहित्य विचार समाज चिंतन' संपा. भा. शं. भणगे, १९६८ मधील ज्ञानप्रसारकांपुढील आदर्श' हा दि के. बेडेकरांचा लेख पृ. ४२९' ]** ते लिहितात, 'ज्या लोकांसाठी ज्ञानप्रसार करायचा, त्यांच्याबद्दल आदरपूर्वक श्रद्धा हवी. सरदारांच्या व्याख्यानात व संभाषणातही एक सात्त्विक संयम आढळतो, त्याबरोबर भाषेत व प्रतिपादनात एक सरळपणा आढळतो. कोठेही आलंकारिक शब्दयोजना नाही, भावनांचा चेतविण्यासाठी केलेला युक्तिवाद नाही, प्रतिपक्षाला चिमटे घेण्याचे किंवा त्याचा तेजोभंग करण्याचे लढाऊ डावपेच नाहीत, अशी त्यांची प्रतिपादन-शैली आहे. ही शैली त्यांना जरी सहज साधलेली आहे, तरी या 'साधण्या' मध्ये त्यांचा सावधपणा, आत्मपरीक्षण व कष्ट यांचे एक सातत्य आहे. स्फूर्ती व सहजपणा यांवर भिस्त ठेवून शैलीदार लेखन किंवा भाषण करणारे लोक असतात. पण सरदारांची भिस्त अशा सहजपणावर नाही, तर विचारपूर्वक प्रयत्नावर आहे. आपण ज्ञान

प्रसाराचे कार्य करताना 'अडाणी' लोकांना शिकवीत नसून, शहाण्यांनाच काही तरी जबाबदारीने सांगत आहोत, अशी भावना ठेवून सरदार बोलतात आणि लिहितात.'

लेखणी आणि वाणी या दोन्ही माध्यमांतून सारख्याच समर्थपणे समाजप्रबोधन करणारे थोर पुरुष मागच्या पिढीत होऊन गेले. बाळशास्त्री हरदास, न. र. फाटक, शं. दा. पेंडसे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ग. सहस्रबुद्धे अशी काही निवडक नावे या संदर्भात सांगता येतात. या प्रत्येकाच्या साहित्यदृष्टीचे व जीवननिष्ठेचे स्वरूप पृथगात्म आहे, पण अभिजात समाजमनस्कता हे त्यांच्यातील समान अभिजात सूत्र आहे. या समाजशिक्षकांच्या उज्ज्वल परंपरेत प्रा. गं. बा. सरदार या नाममुद्रेचे महत्व असाधारण आहे.

या संदर्भात सरदारांची साहित्यदृष्टी व त्यांची जीवननिष्ठा यांचा परिचय करून घेणे उपयुक्त ठरेल.

### ५. सरदारांची साहित्यदृष्टी

लेखकाची साहित्यदृष्टी अजमावण्यासाठी सिद्धान्त आणि व्यवहार या दोन्ही अंगांनी त्याने केलेला वाङ्मय-विमर्श विचारात घ्यावा लागतो. साहित्य-व्यवहाराच्या अंगोपांगांवार सरदारांनी एक व्यापक भूमिकेवरून चर्चा केली आहे. या चर्चेच्या अनुषंगानेच साहित्यातील काही सिद्धान्तांविषयीचे आपले मत प्रदर्शन त्यांनी केले आहे, असे ध्यानात येते.

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यापुढील आव्हाने स्पष्ट करताना सरदारांनी मानवी जीवनात कलात्मक साहित्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे सांगितले आहे. ['मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप' संपा. म. द. हातकणंगलेकर आणि गो. मा. पवार, १९८६] कोणत्याही प्रगत मानवसमुहाचे जीवन हे प्रायः सलग व प्रवाही असते. तत्वज्ञान, विज्ञान व कला यांतून मनुष्याच्या सर्जनशीलतेचा अविष्कार होत असतो. समाजाचे स्थैर्य व प्रगती यांसाठी तत्वज्ञान आणि विज्ञान ही अत्यावश्यक आहेत. मात्र त्यांना कलेची जोड लाभल्याखेरीज मानवी जीवनाला परिपूर्णता येत नाही. कलेच्या प्रांतात चित्रसंगीतादी कलांहून ललित साहित्याची महती विशेष आहे, असे सरदार सांगतात. खरे कलात्मक साहित्य हे स्वभावतःच समग्रलक्ष्यी असते. मनुष्याच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनातील अंतःप्रवाहांचा साकल्याने वेध घेण्याचे सामर्थ्य साहित्याच्या ठिकाणी असते. साहित्याचे स्वरूप हे केवळ छायात्मक नाही, कोणत्याही समाजाच्या साहित्यात त्याची संस्कृती प्रतिबिंबित झालेली असते हे तर खरेच; पण एवढ्याने साहित्याचे कार्य संपत नाही. संस्कृतीच्या निर्मितीतही साहित्याचा भाग असतो. प्रज्ञावंत आणि प्रतिभासंपन्न लेखक संस्कृतीचे संगोपन, संवर्धन, नवीकरण व प्रसार साहित्याच्या माध्यमातून काही प्रमाणात करू शकतात. अशा प्रकारे साहित्य व संस्कृती यांचा आंतरिक, सचेतन व अतूट संबंध असल्याचे सरदारांनी आवर्जून म्हटले आहे.

मात्र शुद्ध वाङ्मयीन कलावाद सरदारांना मंजूर नाही. काहीशा संकुचित व स्वयंमन्यतेच्या वृत्तीतून केवलकलावादाचा जन्म झाला. साहित्य ही एक जीवननिष्ठा आहे ही धारणा मूलतः प्रगतिपरच आहे. साहित्याचे निर्मितीकेंद्र व्यक्ती हेच राहणार आणि व्यक्तीचे रंगरूप घेऊनच साहित्यकृती सिद्ध होणार आहे. परंतु व्यक्ती आणि समाज यांचा अतूट संबंध लक्षात घेता, त्यांची कृत्रिमपणे फारकत करणे यासारखे भयावह आणि अनर्थकारक दुसरे काही नाही, असे सरदारांनी स्पष्ट केले आहे. निकोप मनाची व्यक्ती ही समाजपराङ्मुख कधीच होऊ शकत नाही. सामाजिक संबंधातूनच तिच्या प्रतिभेचे पोषण झालेले असते आणि तिच्या वाङ्मयनिर्मितीला सातत्य लाभलेले असते.

या दृष्टीने पाहता सामाजिक बांधिलकी आणि केवलकलावाद हे द्वंद्व फार काळ टिकून राहील, असे सरदारांना वाटले नाही. खेड्यापाड्यातील कष्टकरी वर्गातून नवे लेखक उदयास येत आहेत. दलित साहित्याचा प्रवाह चांगलाच स्थिरावला आहे. आदिवासी नवशिक्षितांचे साहित्य प्रथमच अंकुरत आहे. या सगळ्याकडे प्रतिष्ठित साहित्यिकांना फार काळ दुर्लक्ष करता येणार नाही. आतापर्यंत दडपले गेलेले व इतस्ततः विखुरलेले दलित, आदिवासी, भटके, ग्रामीण, स्त्रीमुक्तीवादी प्रवाह हे सारे दलित, आदिवासी, ग्रामीण साहित्यसंमेलनांच्या द्वारे एकत्र येण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. उद्याच्या समाजाचा व साहित्याचा इतिहास खरे तर यांच्याच हातून घडणार आहे. त्या काळात स्वयंकेंद्रित वृत्तीच्या अ-सामाजिक जाणिवांना कुठून पाठबळ मिळणार? अशा रीतीने साहित्याच्या सामाजिक दायित्वाचा मुद्दा सरदारांनी ठाशीवपणाने मांडला आहे.

साहित्याच्या गुणवत्तेची उंची आणि त्याच्या प्रभावक्षेत्राचा विस्तार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे याच संदर्भात सरदारांनी म्हटले आहे. गुणवत्ता आणि विस्तार यांचे प्रमाण नेहमीच व्यस्त असते, हा समज त्यांना मान्य नाही. ज्यांना साहित्याच्या गुणोत्कर्षाची उत्तुंग शिखरे मानता येतील, असे लोकोत्तर साहित्यिक कुठेही झाले तरी मोजकेच असतात. तसेच ज्यांना अलौकिक प्रतिभा लाभलेली आहे, अशा सर्वांच्याच अभिव्यक्तीला सामाजिक जीवनात नेहमीच वाव मिळतो, असे नाही.

आपण आधुनिक युगात संधिसमानतेचे तत्त्व स्वीकारले आहे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होऊ लागल्यावर नवशिक्षित वर्ग उदयास आला. त्याने साहजिकच विषमतेवर आधारलेल्या व्यवस्थेवरुद्ध आपला असंतोष व्यक्त करण्यास आरंभ केला. त्यातले जे वाचक संवेदनक्षम व चिंतनशील होते, त्यांना आपल्या भाषेतील ललित साहित्याचा आपल्या जीवनाशी अर्थाअर्थी काही संबंध नाही, हे तीव्रतेने जाणवू लागले. या असमाधानातूनच आपल्या भोवतालच्या लोकजीवनातील आतापर्यंत अप्रगट राहिलेले अनुभव नव्याने शब्दांकित करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. या क्षेत्रात त्यांनी प्रथमच पदार्पण केले असल्यामुळे त्यांना आपल्या अनुभवांशी सुसंगत असे लेखनतंत्र लवकर गवसले नाही. तसेच, जुन्या रूढ शिक्षणपद्धतीमुळे त्यांच्या मनावर असलेले पूर्वपरंपरेचे दडपण त्यांना पार झुगारून देता आले नाही. अशा स्थितीत त्यांच्याकडून मोठ्या गुणवत्तेची अपेक्षा करणे हे रास्त ठरणार नाही. गुणवत्तेचा आग्रह हवाच, पण त्यासाठी अधीर होऊन चालणार नाही. जसजशी परिस्थिती अनुकूल होत जाईल, तसतशी या लेखकांच्या गुणवत्तेची उंचीही वाढल्याखेरीज राहणार नाही.

साहित्याच्या सर्वांगीण विकासाच्या दोन कसोट्या सरदारांनी मानल्या आहेत. मराठी साहित्याचा उत्कर्ष व्हावा असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा आपल्याला नेमके काय अभिप्रेत आहे, हे पाहिले पाहिजे. मराठीतील काही साहित्यकृती तरी वाङ्मयीन गुणवत्तेच्या बाबतीत एवढ्या उत्तुंग असल्या पाहिजेत की, त्यांना विश्वसाहित्यातील सर्वश्रेष्ठ कृतींची बरोबरी करता आली पाहिजे. स्वतंत्र राष्ट्र म्हणून भारताची प्रतिष्ठा जगात ज्यामुळे उंचावेल, असे अव्वल दर्जाचे ग्रंथ मराठीत निर्माण झाले पाहिजेत. साहित्याच्या अभिवृद्धीची ही एक महत्त्वाची कसोटी असल्याचे सरदारांनी मानले आहे; पण त्याबरोबरच दुसरीही एक कसोटी त्यांनी विचारात घेतली आहे. ज्या समाजाचे साहित्य अगदी तळातल्या माणसापर्यंत जाऊन पोचले असेल, त्याच्या जीवनाचा ते एक भाग होऊन राहिले असेल, तो समाज प्रगत व सुसंस्कृत आहे असे ते मानतात. यापुढे एका बाजूला दिवाणखान्यात बसून काव्यशास्त्रविनोदात रममाण होणारे थोडे प्रतिष्ठित लोक, तर दुसऱ्या बाजूला उन्हातान्हात काबाडकष्ट करणारे विद्यानंदाला व कलानंदाला वंचित झालेले लक्षावधी लोक ही स्थिती फार काळ चालू राहणे इष्ट नाही व शक्यही नाही. विविध थरांतील लोकांच्या कल्पकतेला आणि निर्माणक्षमतेला

चालना देण्याइतके साहित्याचे प्रभावक्षेत्र विशाल व विमुक्त असेल, तरच विविध स्वरूपाचे श्रेष्ठ साहित्य मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ शकेल. अन्यथा मूठभर पुढारलेल्या लोकांची मिरास बनलेले साहित्य डबक्यासारखे साचून राहण्याचा धोका संभवतो, असा इशारा सरदारांनी दिला आहे.

साहित्यिकांनी डोळसपणे या स्थित्यंतराचा अर्थ समजून घेतला पाहिजे. राजकारण, अर्थकारण व समाजकारण यांच्याप्रमाणे साहित्यकारणही भोवतालच्या वातावरणापासून अलग राहू शकत नाही, हे सरदारांनी नेमकेपणाने विशद केले आहे. आपला उच्चवर्णीय मध्यमवर्ग जेव्हा जन-आंदोलनापासून दूर गेला, तेव्हापासून साहित्यविचारात तंत्रवादाचे तुणतुणे सुरु झाले. पुढे १९५२ पासून इथल्या राजकीय नेतृत्वात बदल घडून येण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ झाला. त्याच वेळी इथे आत्यंतिक व्यक्तिवाद व निखळ कलावाद यांचा पक्ष हिरिरीने पुढे आला. आज ग्रामीण परिसरातून वा मोठमोठ्या औद्योगिक शहरांतून उदयास आलेला नवोदित लेखक स्वभावतः च कलावादी होऊ शकत नाही. कलावादी भूमिका पत्करण्यासाठी सभोवार शांत सुस्थिर वातावरण असावे लागते. जीवनाकडे तटस्थ वृत्तीने पाहता येण्यासाठी लेखकाला किमान सुखस्वास्थ्य लाभावे लागते. दुर्दैवाने या गोष्टी त्याच्या वाट्याला आलेल्या नसतात. त्याचे जीवन हे असुरक्षितता, अन्याय, प्रक्षोभ, वेदना व संघर्ष यांनी ग्रासलेले असते. अर्थात्च त्याच्या साहित्यात वेदना व विद्रोह यांचेच प्रकर्षाने दर्शन घडते. साहित्याच्या अंतरंगातील परिस्थितीसापेक्ष परिवर्तनाची सरदारांनी केलेली ही मीमांसा प्रत्ययकारी आहे.

मराठी वाङ्मयाचा उत्तरोत्तर उत्कर्ष आणि सार्वत्रिक प्रसार व्हावयाचा असेल, तर ते लोकाभिमुख होण्याची निकड असल्याचे सरदार सांगतात -समाजाच्या विविध थरांतील नवशिक्षितांपर्यंत आपले साहित्य जाऊन पोचले पाहिजे. त्यासाठी आधी आपला सर्वसामान्य माणसाच्या सहृदयतेवर, रसिकतेवर व सारासार विवेकक्षमतेवर विश्वास असला पाहिजे. त्याच्या ठिकाणी वाङ्मयाभिरुची निर्माण करता येईल, या विषयी आपल्या मनात संदेह असता कामा नये. सर्व थरांतील लोकांना हे साहित्य आपले आहे, असे मनोमन वाटले पाहिजे. त्यासाठी भिन्न-भिन्न थरांतील लोक आपापले अनुभव साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करण्यास उद्युक्त झाले पाहिजेत. ते जे साहित्य निर्माण करतील, त्याचे परिशीलन व रसग्रहण आपण इहवादी, सामाजिक व धर्मनिरपेक्ष भूमिकेतून करण्याचा संकल्प केला पाहिजे, असे सरदारांचे आग्रहपूर्वक सांगणे आहे.

साहित्याची स्वायत्तता आढळ राहिली पाहिजे, असा सरदारांचा आग्रह आहे. ['परंपरा आणि परिवर्तन' संपा. मो. स. गोसावी आणि वी. श. चौघुले, १९८८, पृ. ९४-९८] अलीकडे साहित्याच्या क्षेत्रात सरकारीकरणाची प्रवृत्ती वाढत आहे. साहित्यक्षेत्राची स्वायत्तता व साहित्याच्या माध्यमाची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी या प्रवृत्तीला आवर घालणे जरुरीचे आहे. केवळ साहित्याच्याच दृष्टीने नव्हे, तर एकंदर लोकशाही जीवनपद्धतीच्या दृष्टीनेही हे आवश्यक आहे. साहित्यसंमेलने, संशोधनप्रकल्प, ग्रंथ-परितोषिके अशा उपक्रमांसाठी अनुदान घेतल्यामुळे सरकारला त्यात हस्तक्षेप करता येतो आणि म्हणून शासकीय मदतीवर बहिष्कार घालावा, ही भूमिका सरदारांना मंजूर नाही. साहित्य संस्थांचे नित्याचे कार्य आपल्यासारख्या गरीब देशात अनुदानाशिवाय चालणे शक्य नाही. तेव्हा साहित्यक्षेत्राच्या प्रतिष्ठेला बाधा येऊ न देता अनुदान घेण्यात काहीही गैर नाही, असे ते म्हणतात. कल्याणकारी राज्यात लोकोपयोगी उपक्रमांना सहाय्य करणे हे शासनाचे कर्तव्यच आहे. मिंधेपणाने नव्हे तर हक्काने आपण असे अनुदान घेतले पाहिजे व शासनाने ते कर्तव्यबुद्धीने दिले पाहिजे. वाङ्मयीन उपक्रमांना अनुदान दिल्याबद्दल पत्राद्वारे किंवा समारंभात औपचारिकपणे शासनाचे आभार

मानण्यात काही वावगे नाही. परंतु त्यासाठी खास आभाराचे ठराव पास करणे हे भाटगिरी करण्यासारखे आहे. कोणाही जातिवंत साहित्यिकाला ते न शोभण्यासारखे आहे.

इथेच सरदारांनी साहित्यक्षेत्र व शासनसंस्था यांच्या संबंधात एक मुद्दा मांडला आहे. शिक्षण व अर्थकारण अशा क्षेत्रांप्रमाणे सहित्यक्षेत्रासंबंधीही शासनाचे काही अधिकृत धोरण असणे स्वाभाविक आहे. मात्र ते लोकशाही जीवनदृष्टीशी सुसंगत असले पाहिजे. त्याचबरोबर साहित्याच्या अभिवृद्धीला ते पोषक असायला हवे. शासन हे सर्व समाजाला जबाबदार असते हे लक्षात घेऊन, शासनाची व्यापक जबाबदारी व तात्कालिक पक्षहित यांत फरक केला पाहिजे. जेव्हा या धारणेशी विसंगत असा प्रमाद शासनाकडून घडेल, तेव्हा तत्परतेने त्याचा निषेध केला पाहिजे. क्वचित्प्रसंगी शासकीय समारंभावर बहिष्कारही घालावा लागेल. पण सदासर्वकाळ बहिष्काराची भूमिका घेणे बरोबर नाही. शक्य व इष्ट असेल तिथे शासनाशी सहकार्य व जरूर तिथे असहकार, असे धोरण ठेवले तरच ते साहित्याला हितकारक ठरेल. त्या क्षेत्रातील जाणकारांचा योग्य तो मान राखला गेला पाहिजे व त्यांचे निर्णयस्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे. अशा तऱ्हेची सम्यक भूमिका घेऊन जर आपण शासनाशी सहकार्य केले नाही, तर संधिसाधू लोकांना रान मोकळे मिळेल आणि साहित्याची व एकंदर समाजाची हानी होईल.

साहित्यातील लहानमोठ्या उपक्रमांसाठी शासनाचे साहाय्य आवश्यक असल्याचे सरदारांना मान्य आहे. पण त्याबरोबरच शासननिरपेक्ष अशी साहित्याची काही शक्तीकेंद्रे हवीत, हेही त्यांनी आवर्जून म्हटले आहे. मात्र अशी केंद्रे आज साहित्यक्षेत्रात आहेत किंवा कसे, तसेच त्या केंद्रांचे स्वरूप कसे अपेक्षित आहे, याचा खुलासा त्यांनी केलेला नाही. साहित्याचा मुख्य व्यवहार शासन पुरस्कृत राहिला तर त्यास सरदारांची हरकत नाही. स्वतंत्र शक्तीकेंद्रे त्या व्यवहाराला पूरक ठरतील असा त्यांचा कयास आहे. जेव्हा लोकशाही खऱ्या अर्थाने जागृत व संघटित होईल, तेव्हा शासनाला आपोआपच जबाबदारीने वागावे लागेल आणि मग अशा शासननिरपेक्ष केंद्राची गरज उरणार नाही, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र त्यांची ही कल्पना काहीशी संदिग्ध व वादग्रस्तही राहिली आहे.

साहित्य संमेलनाचे स्वरूप कसे असावे, याविषयी सरदारांनी आपल्या काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. [दै. केसरी पुणे, दि. २१ नोव्हेंबर १९८१. )शब्दांकन : सुधीर बेडेकर ]. एक साहित्यप्रेमी वाचक म्हणून मंत्री किंवा कुणी राजकीय नेता संमेलनास आल्यास ते स्वागतार्हच ठरावे. तसेच त्या व्यक्तीचा यथोचित मान राखावा; पण मंत्री म्हणून त्यांना विशेष स्थान असता कामा नये. मंत्र्यांना संमेलनाच्या निर्णयप्रक्रियेत ढवळाढवळ करण्याची संधी मिळू नये. या बाबतीतील अनिष्ट परिस्थिती केवळ मंत्र्यांमुळे निर्माण होते असे नाही, तर तिला काही साहित्यिकांमधील संधिसाधूपणा व न्यूनगंड कारणीभूत असतो.

संमेलनातील चर्चा -भाषणे -परिसंवाद यांची दिशा कोणती असावी, याविषयी सरदारांनी दोन अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. एकतर निर्मितीप्रक्रिया, सौंदर्यानुभव व समीक्षापद्धती यांविषयी काही मूलभूत तात्त्विक स्वरूपाचे व तंत्रविषयक प्रश्न असतात. त्यांची चर्चा होणे महत्त्वाचे आहे. पण त्याबरोबरच दुसरी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. सामान्य माणसांमध्ये वाङ्मयीन जन निर्माण करणे, साहित्याचे प्रभावक्षेत्र वाढविणे व विविध थरांतील लेखक-वाचकांमध्ये संवाद साधणे, यांसाठीचे एक व्यापक व्यासपीठ या दृष्टीने संमेलनाकडे पाहायला हवे. आज फार मोठ्या संख्येने व वेगळ्या प्रेरणा घेऊन नवे लेखक साहित्यक्षेत्रामध्ये उतरत आहेत. त्यांच्या वाङ्मयीन जाणिवांना वळण लावणे आणि साहित्याची स्वायत्तता, तसेच समाजातील इतर अनुबंध यांविषयी योग्य भूमिका त्यांच्या मनात निर्माण करणे, अशी दोन कामे आपल्यासमोर आहेत. नव्या लेखकांचा सामाजिक अनुबंध घट्ट आहे. त्यांच्या वाङ्मयीननिर्मितीतील अडचणींना एक जिवंत सामाजिक संदर्भ आहे.

अनुक्रमणिका

त्यामुळे साहित्याच्या शुद्धतेचे स्तोम माजविणारी, कलेसाठी कला व ज्ञानासाठी ज्ञान अशी भूमिका त्यांना स्वयंकेंद्रिततेची व मतलबीपणाची वाटणे स्वाभाविक आहे.

सरदारांनी वृत्तपत्रे आणि लोकशिक्षण यांच्यातील अनुबंधाविषयीही आपले मत स्पष्टपणे नोंदविले आहे. ['युगान्तर' (भारतीय) कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य कौन्सिलचे मुखपत्र), मुंबई, दि. २-१०-१९९२] दैनंदिन समाजजीवनाच्या प्रवाहाशी समान्तर असणे हे वृत्तपत्राचे वैशिष्ट्य असल्याचे सांगून सरदार म्हणतात, "माझे विश्व केवढे, हे मी कोणती वर्तमानपत्रे वाचतो त्यावर अवलंबून आहे." मराठी वृत्तपत्रांना प्रदीर्घ परंपरा आहे. अनेक निष्ठावंत पत्रकारांनी ही परंपरा जोपासली आहे. लोकशिक्षण हे वृत्तपत्राचे महत्वाचे कार्य आहे. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य, पावित्र्य आणि प्रतिष्ठा यांचे संरक्षण केल्याखेरीज आपल्या देशाला उज्ज्वल भवितव्य नाही, हे सरदार आवर्जून सांगतात. कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणे, अनुयायांना मार्गदर्शन करणे व हितचिंतकांना वळण लावणे हे पत्रकारांनी करायला हवेच; पण या सर्वांपलीकडे जो सामान्य जनसमूह आहे, त्याला कसे आकर्षित करता येईल, याचाही विचार झाला पाहिजे. शोषितांच्या असंतोषाला वळण देण्याची गरज आहे. पक्षनिष्ठ पत्रांना प्रचार करणे भागच असते. पण त्यात एकांगीपणा येऊ नये. शेवटी स्वतः निर्णय करायला लोकांना शिकविणे हे प्रबोधनाचे काम आहे. प्रचार आणि प्रबोधन यांतील फरक पत्रकारांनी लक्षात घेतला पाहिजे. वृत्तपत्र हे मुक्त विचाराचे व्यासपीठ झाले पाहिजे.

फेब्रुवारी १९८० मध्ये बार्शी येथे भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने सरदारांनी आपल्या साहित्यादृष्टीच्या संदर्भात काही महत्त्वाच्या विषयांचा ऊहापोह केला. मराठी ग्रंथप्रसार, साहित्याचा मुख्य विषय, साहित्याची समाजसापेक्षता, लेखकांचे स्वातंत्र्य, विचारप्रवर्तक वाङ्मय, विज्ञानप्रसारक वाङ्मय, ग्रामीण साहित्य, दलितसाहित्य, साहित्याचे माध्यम अशा काही विषयांची चर्चा आपल्या या भाषणात त्यांनी केली.

मराठी ग्रंथप्रासाराकडे सरदारांनी श्रोत्यांचे लक्ष वेधले, "महाराष्ट्राची लोकसंख्या सहा कोटींच्या आसपास आहे. त्यापैकी सुमारे दोन कोटी लोक साक्षर आहेत. मराठी दैनिकांचा खप दोन लाखांच्या घरात आहे. मराठी समाजात किमान साठ लाख लोक वर्तमानपत्र वाचणारे आहेत." सरदारांनी दिलेली ही आकडेवारी एकोणीशे ऐंशी सालची आहे.

आज ही वाचकसंख्या निश्चितच वाढलेली असेल. वाचकांची संख्या मोठी असण्याचे कारण केवळ शिक्षणप्रसार हे नसून, राजकीय जागृतीमुळे ग्रामीण समाजातही देशातील घडामोडी जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झालेली आहे. मात्र ज्यांच्यापर्यंत वृत्तपत्रे जाऊन पोहोचलेली नाहीत, असा मोठा लोकसमूह अजूनही आपल्याकडे आहे. तसेच विचारप्रधान व कलात्मक वाङ्मयाचे क्षेत्रही विस्तारलेले नाही. अलीकडे महाराष्ट्रात जो नवा लेखक पुढे येण्यासाठी धडपडत आहे, त्याला प्रचलित साहित्यक्षेत्रात पुरेसा वाव मिळत नाही. त्यामुळे ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, ख्रिस्ती साहित्य, स्त्रीवादी साहित्य, नवोदितांचे साहित्य या वाङ्मयीन प्रवाहांनी आपापले विभक्त संसार थाटले आहेत. ही काळाची गरजही आहे.

बहुसंख्य लोक मनोरंजनासाठी वाचतात. नियतकालिकांचा वाचकवर्ग मोठा आहे. त्या मानाने ग्रंथांचा वाचकवर्ग कमी आहे. त्यातही कलात्मकतेची जाण असणारे आणि विचारांची मौलिकता पारखणारे वाचक अगदीच थोडे. त्यामुळे साहित्याच्या समाजनिरपेक्षतेच्या भूमिकेला बळकटी येते.

अनुक्रमणिका

साहित्याचा मुख्य विषय बहुधा माणूस हाच असतो. साहित्यात लेखकाच्या सौंदर्यदृष्टीबरोबर त्याच्या संस्कारित जीवनदृष्टीचा ठसा उमटल्याखेरीज राहत नाही, याकडे सरदारांनी लक्ष वेधले आहे. लेखकाच्या प्रेरणा, भावना व आकांक्षा यांचे प्रत्ययकारी चित्रण त्याच्या साहित्यकृतीत आले म्हणजे त्यात जिवंतपणा येतो. जगातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृती पाहिल्या, तर केवळ निरामय आनंद देणे एवढेच त्यांचे कार्य नव्हते. मानवी जीवनाचा अर्थ शोधणे ही प्रेरणा देखील त्यात असावी लागते. जीवनाचा अर्थ पूर्णपणे कुणालाच कळलेला नाही. पण म्हणून माणसाची पूर्णतेची ओढ थांबली व त्याचा शोध संपला असे कधी घडत नाही. या शोधातून त्याला जे कडूगोड, भलेबुरे अनुभव येतील, त्यांना कलात्मक रूप द्यायचे असते. आशयाची अभिव्यक्ती कलात्मक असली तरी त्याच्या अंतरंगात सामाजिकता ओतप्रोत भरून राहिलेली असेल तरच ते साहित्य ‘अक्षर’ रूप धारण करू शकते.

साहित्यविचारातील महत्त्वाचा प्रश्न म्हणून व्यक्ति आणि समाज यांच्या संबंधाची चिकित्सा सरदारांनी केली आहे. साहित्य हे व्यक्तिनिष्ठ की समाजसापेक्ष, हा प्रश्न अनेकदा चुकीच्या पद्धतीने मांडला जातो, असे ते सांगतात. व्यक्ति ही स्वतंत्र असली, तरी एकाकी असत नाही. समाजाचा मूलभूत घटक म्हणूनच ती वावरत असते. व्यक्ती आणि समाज यांना एकमेकांपासून अलग करणे बरोबर नाही. माणसाच्या व्यक्तित्वाची घडण सामाजिक जीवनातून होत असते. व्यक्तीची प्रतिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांचा पुरस्कार करताना साहित्यिकांनी तारतम्य ठेवले पाहिजे.

अलीकडे लेखकाचे स्वातंत्र्य हाही अनेकांचा आवडता विषय झाला आहे. लेखकाच्या आविष्कारस्वातंत्र्यावर बाह्य शक्तीकडून निर्बंध लादले जाऊ नयेत, हे तर खरेच आहे. पण त्याबरोबरच स्वातंत्र्य हे साधन-मूल्य आहे, ते अंतिम मूल्य नव्हे, याचे भान ठेवले पाहिजे. बाह्य बंधने झुगारून दिली म्हणजे आपोआप विकास होतो, हा समाज दिशाभूल करणारा आहे. या दृष्टीने पाहता, स्वातंत्र्य म्हणजे स्वयंशासन होय. या बाबतीत आपले साहित्यिक पुरेसे प्रयत्नशील असतात असे दिसत नाही. मळलेल्या वाटेने जाणे सोपे असते. स्वातंत्र्य म्हटले की, आपला मार्ग आपण शोधण्याची जबाबदारी येऊन पडते. माणसाला पुष्कळदा ती जबाबदारी नकोशी वाटते. कितीतरी लोक प्रवाहपतित असतात. पण आपण स्वतंत्र आहोत अशा भ्रमात ते असतात. अशा स्थितीत स्वातंत्र्यप्रेमी लेखकाने सदैव जागरूक राहण्याची गरज आहे.

विचारप्रवर्तक वाङ्मय विपुलतेने उपलब्ध असेल व समाजात विचारमंथनाला पोषक वातावरण असेल, तर त्याचा लेखकाच्या प्रतिभेवर योग्य तो संस्कार होऊ शकतो. लेखकाला सामाजिक वास्तवाचे भान असेल व त्यासाठी आवश्यक तेवढ्या शास्त्रांशी त्याचा परिचय असेल, तर त्याच्या प्रबोधनपर लेखनाला महत्त्व येते. स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाली, तरी आपल्याकडील ज्ञानोपासकांची परभृतता गेलेली नाही, या विषयीची खंत सरदारांनी व्यक्त केलेली आहे. धर्म, तत्वज्ञान, इतिहास, राजकारण इत्यादी क्षेत्रांत मूलगामी संशोधनाची गरज आहे. आपल्या जुन्या सामाजिक संस्थांचे ऐतिहासिक दृष्टीने फारसे संशोधन झाले नाही. येथील वास्तवाला भिडणारे स्वतंत्र वृत्तीचे विचावंत थोडे आहेत. ‘ज्ञान हीच शक्ती आहे’ या वचनाचा उद्‌घोष चालू आहे. पण प्रत्यक्ष सामाजिक जीवनात त्याचा प्रत्यय येत नाही.

विज्ञानप्रसारक वाङ्मय हेही सरदारांच्या चिंतनाचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. सध्याचे युग हे विज्ञानयुग आहे. पण अंधश्रद्धा, रूढीदास्य व बुवाबाजी यांचे प्राबल्य आपल्या समाजात कमी झालेले नाही. या घटनेची नुसती कारणमीमांसा करून भागणार नाही, तर ही स्थिती कशी सुधारता येईल याचा शोध घेतला पाहिजे. विज्ञाननिष्ठेचे संस्कार जनमानसावर झाले पाहिजेत. त्यासाठी शिक्षणसंस्था, साहित्यसंस्था, प्रकाशनसंस्था

अनुक्रमणिका

व वृत्तपत्रसंस्था यांनी संघटितपणे अधिक प्रयत्नशील होण्याची गरज आहे. लोकांच्या मनावर विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन कसा बिंबवता येईल, याकडे या संस्थांनी लक्ष दिले पाहिजे. लोकांच्या नित्याच्या जीवनातील प्रसंगांना धरून यासाठी प्रयत्न केल्यास असे प्रयत्न फलदायी होतील. विज्ञानप्रसाराला विघातक ठरतील अशा अंधश्रद्धांविरुद्ध वेळप्रसंगी झगडण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. विज्ञानप्रसार मातृभाषेतून झाला, तरच तो प्रभावी ठरेल. यासाठी मराठीतून लोकाभिमुख विज्ञानसाहित्य निर्माण झाले पाहिजे.

ग्रामीण साहित्य सादर करणाऱ्या लेखकांची एक नवी पिढी उदयाला आलेली दिसते. स्वतंत्र ग्रामीण संमेलनही भरविले जाते. या साहित्याचे स्वरूप, त्याची व्याप्ती आणि त्या विषयीच्या अपेक्षा यांविषयी सरदारांनी आस्थेने प्रकट चिंतन केलेले आहे. 'ग्रामीण' ही संज्ञा केवळ स्थलवाचक अर्थाने न घेता तिच्यात, शहरात राहूनही विपन्नावस्थेत दिवस कंठणाऱ्या कष्टकरी वर्गाचाही समावेश केला पाहिजे, असे सरदार सांगत. खेड्यातील तसाचा शहरातीलही समाज दुभंगलेला आहे. खेड्यातील नवोदित सधन वर्गाचे शहरातील प्रस्थापित वर्गाशी जवळचे नाते आहे. तसेच शहरात झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची अवस्था मोलमजुरी करणाऱ्या ग्रामीण लोकांप्रमाणेच हलाखीची आहे. आपली नियतकालिके बव्हंशी शहरातून निघतात व त्यांचा वाचकवर्ग प्रामुख्याने शहरी असतो. त्यामुळे नव्याने जागृत झालेल्या ग्रामीण लेखकाला आपले विचार व्यक्त करण्याला, प्रश्न मांडायला व ललित लेखनात ते प्रसिद्ध करायला अजूनही मुक्त व्यासपीठ मिळू शकलेले नाही.

शहरातील दुर्बल समाजाच्या व्यथा व आकांक्षा चित्रित करणारा एक नवा लेखकवर्ग पुढे येऊ लागला आहे. त्याचे नाते ग्रामीण लेखकाशी मिळते-जुळते आहे. या दोन्ही प्रकारच्या लेखक वर्गाचे प्रश्न सारखेच आहेत. १९३० पासून बहुजनसमाजातून मराठी साहित्यिकांचा एक वर्ग उदयाला आला. त्याला जुन्या परंपरेतील काही गोष्टी बोचत होत्या. आपल्या मध्यमवर्गीय साहित्यातील ग्रामीण जीवनाचे निर्जीव व अतिरंजित चित्रण त्याला खटकत होते. पण त्याची कोंडी फुटत नव्हती. स्थितिप्रिय समाजात त्याला समानधर्मी सोबती भेटत नव्हते. अशा तऱ्हेने एकाकी पडलेल्या लेखकाला स्वतःच्या जीवननिष्ठेशी इमान राखणे कठीण जाते. ग्रामीण भागातील लेखकाला त्याच्याच जगातील नवा, सहृदय व डोळस वाचक वर्ग लाभल्याखेरीज त्याचे वाङ्मय कसदार व समृद्ध होणार नाही. अजूनही या लेखकांची आणि वाचकांची बौद्धिक उपासमारच होत आहे. त्यांचे शिक्षण व संस्करण यांसाठी जितके संघटित प्रयत्न व्हावयास हवेत, तितके होताना कुठे दिसत नाहीत. प्रचलित शिक्षणपद्धतीमुळे विशिष्ट विचारसरणी, संस्कार व भाषा यांचे दडपण ग्रामीण लेखकावरही पडते. तो पांढरपेशा बनण्यास सुरुवात होते. ही स्थिती बदलून ग्रामीण साहित्यात चैतन्य निर्माण करणारी चळवळ झाली पाहिजे.

दलित साहित्याच्या चळवळीवर अलीकडे बरेच बोलले जाते. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलित समाज खडबडून जागा झाला. "नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस राहायचं आम्ही, श्वास घुसमटत?" या दलित कवितेतून त्या समाजाच्या नवजागृतीचे दर्शन घडते. सामाजिक जीवनाच्या हरएक क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून येण्याची गरज आहे; यात सर्वात जास्त गरज दलितांना आहे याकडे सरदारांनी लक्ष वेधले आहे. शब्द हे शस्त्र म्हणून वापरणाऱ्या संघर्षप्रवण मराठी साहित्यिकांच्या वाङ्मयाशी दलितांचे जवळचे नाते असल्याचे सरदारांनी स्पष्ट केले आहे. '*कठीण शब्द या धोंड्यांनी, करितों हाणाहाण!* केशवसुतांच्या या वाणीतील त्वेषाचे दलित साहित्यिकांना आकर्षण आहे. शतकानुशतके अलक्षित राहिलेल्या आपल्या अनुभवविश्वाचा आविष्कार दलितांनी प्रभावीपणे मराठी साहित्यात आणला आहे. दलित साहित्य अधिक कसदार व कलात्मक व्हावे, म्हणून सरदारांनी एक मोलाची सूचना केली आहे. दलित साहित्याच्या

मुळाशी जी बंडखोरपणाची प्रेरणा आहे, ते त्याचे प्राणतत्त्वच आहे; पण तेवढ्यावर विसंबून राहणे हितावह होणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे. तत्वचिंतन, विद्याव्यासंग, तंत्रसाधना व भाषाप्रभुत्व या गोष्टींचीही दलित साहित्याच्या प्रगतीला गरज आहे. आपले साहित्य ही एका मोठ्या व्यापक चळवळीची आघाडी आहे याचा दलित लेखकांनी स्वतःला विसर पडू देऊ नये. त्यांनी सदैव जागरूक राहिले पाहिजे.

साहित्याचे माध्यम जी भाषा, तिची निर्मिती आणि विकास यात मनुष्याच्या प्रगतीचे रहस्य साठविलेले आहे, हा मुद्दाही सरदारांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मार्मिकपणे मांडला आहे. भाषा म्हणजे नुसते शब्द नव्हेत, तर शब्दांच्या मदतीने आपल्या मनातील आशय प्रकट करण्याची धाटणी वा शैली म्हणजे भाषा होय. भाषा ही माणसाच्या सुधारणेची व संस्कृतीची वाहक आहे. साहित्यिकाचा तर सदोदित भाषेशीच संबंध येतो *'शब्दचि आमुच्या जीवीचें जीवन'* ' असे तुकोबांनी म्हटले आहे. *'द्रौपदीचे सत्त्व लाभो माझिया भाषा -शरीरा।'* हा मर्ढेकरांचा साहित्यविषयक दृष्टिकोन सदैव ध्यानात ठेवण्याजोगा आहे. विचाराला भावनेची जोड हवी आणि भावनेला विचाराचे पाठबळ हवे. आपल्याला ज्याची मनोमन प्रचीती आली, त्याला छेद जाईल असा कोणताच सूर आपल्या साहित्यातून निघू नये म्हणून प्रत्येक लेखकाने दक्षता घेतली पाहिजे. आपल्या अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर त्याने कुठलेही अंर्तगत व बाह्य दडपण येऊ देता कामा नये.

इथेच सरदारांनी एक महत्त्वाचा विचार मांडला आहे. साहित्याची निर्मिती आणि त्याचा आस्वाद हा एक शोधच आहे; जीवनसत्याचा व विश्वनियामक तत्त्वाचा तो शोध आहे आणि त्याची मनुष्यमात्राला स्वभावतःच ओढ असते. तेव्हा आपल्या मराठी साहित्याचे क्षेत्र नेहमीच जातिधर्मनिरपेक्ष राहिले पाहिजे. त्यात विविध जातींच्या व धर्मांच्या लोकांना मोकळेपणाने वापरता येईल असे खुले व स्वागतशील वातावरण आपण निर्माण केले पाहिजे असा सरदारांचा रास्त आग्रह आहे. महानुभाव, वारकरी, दत्त व रामदासी या संप्रदायांप्रमाणेच मुसलमान, ख्रिस्ती, जैन व लिंगायत या पंथांच्या उपासकांनीही मराठी भाषेची सेवा केली आहे. त्यादृष्टीने, 'मी ख्रिस्ती झालो, पण मी इंग्रज झालो नाही; किंवा माझ्या मनातून स्वदेशाभिमान गेला नाही.' हे बाबा पद्मनजी यांचे उद्गार सरदारांना अर्थपूर्ण वाटतात.

आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप करताना सरदारांनी साहित्यसंवादावर भर दिला आहे. मराठी साहित्यात वेगवेगळे प्रवाह आहेत. त्यांच्यात सुसंवाद साधण्याची आपण पराकाष्ठा केली पाहिजे. जोपर्यंत सामाजिक जीवनात तणाव आहेत, तोपर्यंत साहित्यात सुसंवाद निर्माण होतील, अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. या दृष्टीने सामाजिक घटकांतील एकात्मतेच्या आड येणाऱ्या शक्तींशी झगडण्याचीही साहित्यिकांची तयारी असली पाहिजे. साहित्यिकांच्या सामाजिक बांधिलकीचा हा वास्ताविक अर्थ असल्याचे सरदारांनी ठामपणे म्हटले आहे.

### ६. सरदारांची जीवननिष्ठा

सरदार हे जुन्या-नव्या मराठी साहित्याचे सहृदय व समतोल वृत्तीने मूल्यमापन करणारे समीक्षक आणि विचारवंत आहेत. धर्मकारण, समाजकारण, साहित्य व शिक्षण यांविषयी प्रगत झालेले त्यांचे चिंतन म्हणजे समाजविषयक नवविचारांचे सृजन आहे. एका बाजूला संतसाहित्य व गांधीजींची विचारप्रणाली, तर दुसऱ्या बाजूला समाजवाद व साम्यवाद यांसारख्या परस्परविरोधी विचारांच्या मंथनातून त्यांचे व्यक्तिमत्व संस्कारित झालेले आहे. या चारही प्रणाली एकवटून एक नवी, विधायक व संपन्न जीवननिष्ठा त्यांच्या ठिकाणी सिद्ध झालेली आहे. सरदारांच्या व्यक्तित्वावर संत साहित्याचा खोल ठसा उमटलेला आहे. पण

आपल्या संत-प्रीतीला त्यांनी भावुकतेचा भाबडेपणा येऊ दिलेला नाही. त्यांची श्रद्धा डोळस आहे. मानवतावाद, आत्मपरीक्षण व समतोलवृत्ती हे त्यांचे गुणविशेष म्हणजे संतसाहित्याचाच वारसा आहे. गांधीजींची सर्वधर्मसमभावाची दृष्टी ही सरदारांच्या व्यक्तित्वाची विशेष बाजू आहे. मार्क्सवादाचा अभ्यास करूनही तर्ककर्कशता, रुक्षता व संघर्षवृत्ती त्यांनी आपल्या जीवनदृष्टीत येऊ दिली नाही. शोषितांना व दलितांना न्याय मिळण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज असल्याचे सरदारांना जाणवते. त्यासाठी चळवळी केल्या पाहिजेत, संघर्षही केला पाहिजे, पण त्याचे स्वरूप विधायक असले पाहिजे असे त्यांना वाटे.

मानवतेची ओढ ही सरदारांच्या व्यक्तित्वाच्या केंद्रस्थानी आहे. संतसाहित्य, महाराष्ट्रातील समाजसन्मुख विचारवंत आणि दलित साहित्य हे सरदारांच्या चिंतनाचे प्रमुख विषय आहेत. त्यांविषयी लिहिताना मानवतेची प्रतिष्ठा, मानवाचे स्वातंत्र्य व दास्यामुक्ती यांचा शोध ते प्रथम घेतात. ते करताना घणाघाती टीका-प्रहार करून कोणत्याही व्यक्तीला किंवा समाजातील एखाद्या वर्गाला नामोहरम करणे हे सरदारांच्या स्वभावात नाही. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात याचे, वामन मल्हारांप्रमाणे सरदारानांही भान आहे. ऐतिहासिकतेचा संदर्भ त्यांच्या मनात जागा असतो. व्यक्तीच्या किंवा वर्गाच्या चळवळीला काळाच्याही मर्यादा असतात हे लक्षात घेऊन ते विचारविमर्श करतात. प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांच्या तत्त्वज्ञानांत बरीच साम्यस्थळे असूनही त्यांच्यात दुरावा का, याची सरदारांनी समतोलपणे चिकित्सा केली आहे. ते लिहितात, राम मोहन रॉय, देवेन्द्रनाथ आणि केशवचंद्र यांना आधुनिक जगाचे दर्शन झाले होते. महात्मा फुले यांचे विचार हे त्यांच्या अनुभवातून त्यांना सुचलेले होते. त्यांनी स्वतःच्या अंतःस्फूर्तीने सार्वजनिक सत्त्वधर्माचे सहस्य शोधून काढले. महाराष्ट्रात शेकडो वर्षे लोकप्रिय होऊन राहिलेल्या भागवत धर्माचा उदात्त आशय जोतीरावांच्या लक्षात आला नाही. म्हणूनच ज्ञानेश्वर-तुकाराम अशा संतांवरही त्यांनी कठोर प्रहार केले. मग त्यांना केशवचंद्र किंवा भांडारकर कळले नाहीत, यात काहीच नवल नाही. उलट समाजातील शोषित व श्रमिक वर्गाशी तादात्म्य पावून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध ओरड करणाऱ्या जोतीरावांची भूमिकाही प्रार्थनासमाजातील विद्वज्जनांना लक्ष देण्याजोगी वाटली नाही.

गांधीवादाचा सरदारांनी चांगला अभ्यास केला होता. गांधीजींविषयी त्यांना आदर होता. पण त्यांची श्रद्धा डोळस असल्यामुळे गांधीजींच्या विचारातील समन्वय सरदारांना पटला नाही. जोपर्यंत समाजात वर्गविग्रह आहे, शोषक व शोषित आहेत, तोपर्यंत आपण सर्वांना एकाच समान पातळीवर नैतिक दृष्टीने आणू शकत नाही, असे सरदारांनी स्वच्छपणे म्हटले आहे. 'अहिंसा परमो धर्म :।' म्हणून गांधीजींनी माणसाच्या आत्म्याला साद घातली. पण आदर्श आणि वास्तव यांतील प्रचंड अंतर सरदारांना जाणवले. त्यामुळे अर्धपोटी जगणाऱ्या आपल्या बांधवांचे प्रश्न सुटण्यासाठी अमूर्त अशा तत्त्वाच्या शोधाची गरज नाही; सर्वांचे हित ही कल्पना भ्रामक आहे; आपली समाजरचना परस्परविरुद्ध हितसंबंधावर आधारलेली आहे. त्यामुळे इथल्या 'नाही-रे' वर्गाने एकत्र येऊन मुक्तीचा लढा द्यावा, या मार्क्सवादी विचाराचा सरदारांनी पुरस्कार केला आहे. अज्ञाताचा शोध घेण्यासाठी धर्माने काही कार्य केले असेल, पण हितसंबंधी गटांनी जेव्हा धर्मसत्ता हातात घेऊन मूठभर लोकांच्या सुखासाठी संपूर्ण समाज वेठीला धरला, त्याच वेळी धर्माची सामाजिक गरज संपली, असे सरदारांना जाणवले. मात्र त्यांचे हे मत मार्क्सवादाच्या अभ्यासातून व आग्रहातूनही पुढे आले आहे असे वाटते. कारण महाराष्ट्रातच काय, पण उभ्या भारतातही धर्मसत्ता ही कधीच राजसत्ता नव्हती. आपले आचार्य व पुरोहितवर्ग यांच्या हातात समाजावर अंकुश चालविण्यासारखी सत्ता व सामर्थ्य कधी काळीही नव्हते. त्यामुळे समग्र समाजावर अंकुश चालविण्याचे बळ किंवा तसा दृष्टिकोन त्यांच्या ठिकाणी नव्हता.

अनेक धर्म, अनेक पंथ आणि अनेक जाती यांचे अर्थपूर्ण अस्तित्व भारतामध्ये आहे. तरीदेखील 'धर्म अनेक पण संस्कृती एक' असे भारताचे वैशिष्ट्य आहे. त्या संदर्भात भारतीय संस्कृतीविषयी सरदारांनी केलेले विवेचन लक्षणीय आहे. ['परंपरा आणि परिवर्तन' संपादक : मो. स. गोसावी आणि वी. रा. चौघुले, १९८८, पृ. ११७-११८] भारतीय संस्कृती एकजिनसी किंवा एकरंगी नसून ती बहुमुखी आणि सर्वसमावेशक आहे. इथे हिंदू, जैन, बौद्ध, पारशी, मुसलमान व शीख हे सर्व धर्म / धर्मपंथ शतकानुशतके स्वतंत्रपाने नांदत आले आहेत. यांपैकी प्रत्येकाने आपापल्या परीने भारतीय संस्कृतीच्या विकासाला हातभार लावला आहे. 'सूत्रे मणिगणा इव-' या न्यायाने भारतीयत्वाच्या एका धाग्यात ते सहजपणे गुंफले गेले आहेत. 'जगा आणि जगू द्या' हे धोरण इथल्या समाजधुरीणांनी पूर्वीपासून स्वीकारलेले आहे. वेगवेगळ्या लोकसमुहांना वैदिक धर्माच्या छत्राखाली आणण्याचा प्रयत्न सातत्याने झाला. बहुसंख्य लोकांचा हिंदू धर्म घेतला तरी त्याच्या वैदिक परंपरेत न्याय, पूर्वमीमांसा, सांख्य, योग इत्यादी अनेक दर्शने आहेत. शैव, वैष्णव, लिंगायत यांसारखे अनेक पंथोपपंथ आहेत. या सर्व संप्रदायांत खंडन-मंडनाचा अभिनिवेश आहे, आपपरभाव आहे; परंतु त्यांच्यात दीर्घकालीन वैमनस्य टिकून राहिले आहे असे दिसत नाही. मुक्त विचार आणि बंदिस्त आचार हे इथल्या जीवनसरणीचे खास वैशिष्ट्य आहे. तुम्ही, ईश्वर नाही असे म्हटले, वेद प्रमाण मानले नाहीत, तर तुमच्यावर जुलूम होईल असे नाही; पण तुम्ही स्वतःच्या जातीच्या निर्बंधाचे थोडे जरी उल्लंघन केलेत, तर त्याचे प्रायश्चित्त तुम्हाला भोगावे लागेल. परमसहिष्णुता हा आपला गुण आहे असे सांगतो. मात्र या सहिष्णुतेत इतरांविषयीची उदासीनता दडलेली आहे, हे आपण ध्यानात घेत नाही. हीच वृत्ती पुढील काळात फुटीरपणाची जननी ठरली आहे. यामुळेच भारतीय समाज वेगवेगळ्या घटकांत विभागलेला व काही प्रमाणात विखुरलेलाही राहिला. हे अनेकविध घटक सामावून घेतले यात शंका नाही. पण गेल्या दोनहजार वर्षांत ते घटक एकजीव होऊ शकले नाहीत. निरंकुश सत्तास्पर्धेच्या आजच्या जमान्यात आपल्या उदासीनतेच्या वृत्तीला किती कटू फळे आली आहेत हे आपण पाहतच आहोत.

हिंदू आणि मुस्लिम यांच्या परस्परसंबंधांविषयी सरदारांनी केलेली मीमांसा विचारप्रवर्तक आहे. सावरकरांच्या 'हिंदू' या व्याख्येत बौद्ध, जैन व शीख हे सर्व चपखल बसतात. पण मुसलमान समाजाविषयी तसे म्हणता येणार नाही हे सरदारांनी स्पष्टपणे नोंदविले आहे. देशाची फाळणी आणि त्या आधीच्या व नंतरच्याही भयानक दंगली यांमुळे या दोन समाजांमध्ये परस्परांविषयी अढी निर्माण झाली. गेल्या हजार वर्षांच्या इतिहासात हिंदू आणि मुस्लिम राजकर्त्यांमध्ये अटीटीचे संघर्ष झाले. या दोन समाजांत अनेकदा झालेल्या कलहांचे बरेच तपशील सरदारांनी दिले आहेत पण त्या बरोबरच हिंदू-मुसलमानांतील सामंजस्याचीही नोंद ते करतात. संगीत, वास्तुशिल्प, क्रीडा, भक्तिसाहीत्य अशा क्षेत्रांतील भारतीय मुसलमानांची कामगिरी नाकारता येत नाही. अनेक मुसलमान गायकांनी आपल्या कलेचा वारसा अंतरीच्या उमाळ्याने हिंदू शिष्यांच्या हाती सुपूर्द केला आहे. या संदर्भात जव्हार या आपल्या गावातील स्वतःच्या बाळपणातील अनुभव सरदारांनी नोंदविला आहे. तिथे मराठी शाळेत अनेक मुस्लिम विद्यार्थी होते. सरदारांच्या वर्गात त्यांचे दोन मुसलमान मित्र होते. शाळेत दोन मुसलमान शिक्षकही होते. शाळेत व सार्वजनिक व्यवहारात त्या काळातील खेड्यांतून धर्मनिरपेक्ष अशी अभेदभावाची दृष्टी होती. हे सारे नोंदवून झाल्यावर सरदारांनी एक महत्त्वाची सूचना केली आहे. निवडणुकांच्या राजकारणात न गुंतलेल्या लोकांनी, राजकीय प्रश्नांच्या बाबतीत धर्माचा वापर करायचा नाही व करू द्यायचा नाही असा निर्धार केला पाहिजे आणि आपल्या सामाजिक जीवनात धर्मनिरपेक्षतेचे वातावरण तयार केले पाहिजे.

आधुनिक भारत आणि भारतीय संस्कृती यांच्यातील अनुबंधाचा सरदारांनी सखोल विचार मांडला आहे. आधुनिक भारताच्या जीवनसरणीवर युरोपीय इतिहासाचा आणि पाश्चात्त्य विचारसंप्रदायाचा प्रभाव

पडलेला आहे. इंग्रजांचे राज्य स्थिरावत असताना ख्रिस्तप्रणीत मानवतावाद व विज्ञाननिष्ठ उदारतावाद असे दोन नवे प्रवाह नवशिक्षितांच्या दृष्टीपथात आले. आपल्या परंपरागत जीवनक्रमात या प्रवाहांनी मूलगामी परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली ही वस्तुस्थिती, कट्टर परंपरावादी लोक सोडले तर कोणीही नाकारणार नाहीत.

'मिशन' ची कल्पना आपण ख्रिस्ती धर्मोपदेशकांकडून घेतली. परोपकार, दयाशीलता, रुग्णसेवा व विद्यादान या गोष्टी आपल्याकडे नव्हत्या असे नाही. त्या नसत्या तर अनेक शतके आपल्या समाजाचे स्थैर्य टिकून राहिले नसते. मात्र संस्थात्मक पद्धतीने व शिस्तबद्ध रीतीने सेवाकार्य करण्याची प्रेरणा मिशनरी लोकांकडून आपल्याला मिळाली. दादोबा पांडुरंगांच्या संस्थेचे नाव 'मानवधर्मसभा' असे होते. विवेकानंदांच्याही संस्थेचे नाव 'रामकृष्ण मिशन' असे होते. महर्षी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' सुरु केले. 'मिशन' म्हणजे केवळ ऐहिक कल्याणासाठी झटणारी मंडळी नव्हे. यशापयशाकडे न पाहता प्रेरणेच्या प्रवाहावर यत्न करणारी मंडळी होय,' असे शिंदे यांनी म्हटले आहे.

धर्मचिकित्सेबरोबरच विज्ञानाची थोरवी व उदारमतवादाची मूलतत्त्वे यांची चर्चा आपल्या समाजचिंतकांनी करायला आरंभ केला. राष्ट्रीयत्व, व्यक्तीची प्रतिष्ठा, समाजिक समता व लोकशाही ही तत्त्वे आपण पाश्चात्त्यांकडून घेतली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही तत्त्वे फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात उदयाला आली. आधुनिक काळात भारतीय संस्कृतीच्या मूलतत्त्वांशी या नव्या विचारांचा बराच समन्वय झाला.

हे विश्लेषण केल्यानंतर सरदारांनी आपल्या शिक्षक बांधवांना मौलिक हितसल्ला दिला आहे. जुन्या ऋषिमुनींची उदाहरणे देऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार केले पाहिजेत असे आपण वारंवार म्हणतो; पण गुंतागुंतीच्या परिस्थितीत केवळ शिक्षकवर्गावर ही जबाबदारी सोपविणे आणि ती पार पाडली जात नाही म्हणून त्यांना दोष देणे हे अन्यायाचे होईल. आपल्या विकासप्रणव देशात सर्वच व्यवसायातील लोकांनी अंतर्मुख आणि कर्तव्यनिष्ठ होण्याची वेळ आली आहे. आपल्या संविधानात आपण समाजवादी राष्ट्रनिर्मितीचा संकल्प केला आहे. त्या दृष्टीने पाहता सामाजिक प्रगतीशी निगडित असलेला प्रत्येक व्यवसाय हा पवित्रच आहे.

ही पार्श्वभूमी स्पष्ट करून सरदार शिक्षणक्षेत्राच्या स्वायत्ततेकडे वळले आहेत. ते म्हणतात, "जुन्या परंपरागत व्यवस्थेने शिक्षण आणि न्यायदान यांना जी प्रतिष्ठा दिलेली आहे, ती यथोचितच आहे. पण आज विद्यार्थी घडविण्यासाठी आवश्यक असलेले पुरेसे विचारस्वातंत्र्य शिक्षकांना आहे का? सगळीकडे सत्ता आणि संपत्ती यांची समाजजीवनावरील पकड अधिकाधिक बळकट होत असताना शिक्षक सत्ताधाऱ्यांपुढे आणि उद्योगपतींपुढे ताठ मानेने उभे राहू शकतात काय? ही एकंदरीत परिस्थिती लक्षात घेऊनच आपल्याला परिस्थिती आणि विचाराचे सामर्थ्य यांचा परस्परसंबंध नव्याने समजून घ्यावा लागेल. ज्ञान ही एक शक्ती आहे आणि विचार हे परिस्थितीला वळण देण्याचे एक प्रभावी साधन आहे, यात शंका नाही. परंतु विचारांची प्रेरकता आणि नवनिर्माणक्षमता ही कुठून आणि कशी उदयाला येते, याचा शोध घेतला पाहिजे. समाजातील लक्षावधी सामान्यजन जेव्हा नव्या विचारला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देतात, तेव्हाच त्यातून मूलगामी परिवर्तन घडवून आणणारी शक्ती साकारते." [परंपरा आणि परिवर्तन, पृ. १२२-१२३] इथेच सरदारांनी शिक्षकांच्या वतीने एक सूचना मांडली आहे. सर्व क्षेत्रात जीवनमूल्यांची घसरण होत असताना कोणीतरी त्या मूल्यांची प्राणपणाने जपणूक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे यात शंका नाही. त्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घेतला तर ते त्यांना भूषणावह होईल. मात्र शिक्षकांचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी त्यांना पूर्णपणे मतस्वातंत्र्य दिले गेले पाहिजे.

अनुक्रमणिका

इतकेच नव्हे तर इतर सर्व क्षेत्रांतील लोकांनी विद्याक्षेत्राची प्रतिष्ठा आणि सामर्थ्य यांच्या वाढीसाठी सतत झटले पाहिजे. त्याबरोबरच शिक्षकांनीही एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. स्वातंत्र्य हे मागून मिळत नसते, ते मिळवावे लागते. त्यासाठी वेळ पडल्यास पुरेशी किंमत देण्याची तयारी ठेवावी लागते.

शिक्षकांप्रमाणेच शिक्षणसंस्थांचीही काही नैतिक जबाबदारी असल्याचे सरदारांनी आवर्जून सांगितले आहे. अजूनही आपल्या देशात बरीच निरक्षरता आहे. शाळा-कॉलेजातून दिल्या जाणाऱ्या औपचारिक शिक्षणाचा जितका प्रसार होईल तितका हवाच आहे. हे कार्य निर्दोषपणे पार पाडण्याची जबाबदारी प्रत्येक शिक्षणसंस्थेने घेतलीच पाहिजे. पण एवढ्यावर समाधान मानून चालणार नाही. विद्याव्यासंगाला नैतिकतेची व विधायक दृष्टीची जोड दिली पाहिजे. 'आपल्या सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मिकीकरण झाले पाहिजे' असा मंत्र ना. गोखले यांनी दिला होता. या मंत्राची महती कधी नव्हती एवढी सांप्रतकाळी आहे. आपल्याकडील बराच मोठा लोकसमूह दारिद्र्यरेषेखाली खितपत पडला आहे. अशा स्थितीतही वरिष्ठ वर्गातील कितीतरी लोक भोगपरतेने व संधिसाधूपणाने पछाडलेले आहेत. तेव्हा मूलगामी समाजपरिवर्तन ही खरी आपली गरज आहे.

शिक्षणक्षेत्राचे उद्दिष्ट विषद करताना सरदारांनी पूर्व परंपरेची आठवण करून दिली आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक चळवळीच्या मुळाशी एक व्यापक ध्येयवाद होता, असे ते सांगतात. फुले - चिपळूणकर -टिळक-आगरकर -कर्वे -शाहू महाराज -भाऊराव पाटील -आंबेडकर या सर्वांना नुसत्याच शाळा काढायच्या नव्हत्या. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक साधन आहे अशीच त्यांची धारणा होती. आता तर प्रौढ शिक्षण, निरंतर शिक्षण, मुक्त विद्यापीठ इत्यादी माध्यमांतून आपल्या शिक्षणात आशयघनता आणि परिवर्तनशीलता कशी आणता येईल, याचा विचार सुरु झाला आहे. तेव्हा सार्वजनिक जीवनातील नैतिकतेची आवश्यकता विद्यार्थ्यांना पटवून देणे हे शिक्षणसंस्थेचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत असा बदल घडवून आणण्याचे काम सध्याच्या गढूळलेल्या परिस्थितीत सोपे नाही, हे खरे; तरीपण शंभरामध्ये एक विद्यार्थी जरी सामाजिक ध्येयवादाने भारला गेला, तरी अशा उपक्रमाचे चीज होईल, असे सरदारांना वाटते. मुख्य प्रश्न संख्येचा नसून, शैक्षणिक जीवनात चैतन्यमय शीलसंवर्धक वातावरण निर्माण करण्याचा आहे.

समाजजीवनातील विविध क्षेत्रांत काही अपप्रवृत्ती बोकाळलेल्या असल्या, तरी समाजाच्या उज्ज्वल भवितव्याविषयी सरदार आशावादी आहेत. मनुष्यस्वभाव मूलतः इथूनतिथून सर्वत्र सारखाच आहे, असे ते मानतात. सामान्य माणसाच्या सत्प्रवृत्तीवर आणि निर्णयशक्तीवर त्यांचा विश्वास आहे. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक वेळी सामान्यजनांनी घेतलेला निर्णय हा बरोबरच असतो. पण गुंतागुंतीच्या बाबी सोडल्या तर कोणत्याही प्रश्नाच्या सर्व बाजू सामान्य लोकांपुढे नीट मांडल्या, तर त्या बाबतीत स्थूलमानाने बरोबर निर्णय घेण्याची क्षमता लोकांच्या ठिकाणी असते, अशी त्यांची धारणा आहे.

प्रारब्धवादाचे जुने संस्कार साफ पुसले गेले आहेत असे म्हणता येणार नाही. परंतु पूर्वक्रमानुसार जन्मभर पडतील ते काबाडकष्ट उपसून आपण हलाखीतच राहिले पाहिजे ही भावना नष्ट झालेली आहे. त्यामुळे सर्व थरांतील लोक आता उत्कर्षाच्या दिशेने वाटचाल करू लागले आहेत. आपल्या मुलांनी शिकावे, शासकीय अधिकारी व्हावे, असे त्यांना वाटू लागले आहे. उपेक्षित समाजातील लोकही आपला जुना परंपरागत याचकधर्म सोडून आता हक्काची भाषा बोलू लागले आहेत.

निवडणुकांच्या क्षेत्रातही घडून येत असलेला बदल सरदारांनी नोंदविला आहे. आपण प्रौढ मताधिकाराचे तत्त्व स्वीकारले आहे. गेल्या चार-पाच दशकांतील निवडणुकांची छाननी केली, तर आपला

अनुक्रमणिका

मतदार जागृत व सुजाण होत चालला आहे, असे जाणवते. मतदारांचे राजकीय शिक्षण झालेले नाही, पण कोणत्या पक्षाला मते द्यावीत याचे तारतम्य आपल्या मतदारांनी दाखविले आहे. या विश्वासावरच सरदारांचा आशावाद, अस्थिर परिस्थितीतही टिकून राहिला होता.

महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवन समृद्ध असल्याचे सरदार सांगतात. आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रांत आपल्याकडे संस्थात्मक जीवनाची प्रदीर्घ परंपरा आहे. त्यात स्वतःला झोकून देणारे कार्यकर्ते थोडे का होईनात पण आज आहेत. ग्रामीण जीवनात एक नवा सधनवर्ग उदयाला येत आहे. त्याचा सार्वजनिक कर्तव्यबुद्धीला वेळीच वळण लावण्याची गरज आहे, असा इशारा सरदारांनी दिला आहे.

साहित्य आणि समाज यांच्या मागील प्रेरणा, प्रवृत्ती आणि ध्येये यांविषयी सरदारांनी वेळोवेळी आपली मते मांडली आहेत. हे चिंतन एका समाजमनस्क आणि संवेदनशील अशा भारतीय विचारवंताचे आहे. संतांची सामाजिक करुणाबुद्धी, गांधीजींचा व्यापक मानवतावाद आणि मार्क्सप्रणीत शोषणमुक्त समाजव्यवस्था या सर्वांच्या संस्कारातून सरदारांची जीवननिष्ठा प्रगट झाली आहे. त्यांच्या विवेचनात आत्मीयता आहे, पण अभिनिवेश नाही; तर्कसंगती आहे, पण तर्ककठोरता नाही. समाजप्रबोधन घडण्याच्या दृष्टीने विधायक विचारांच्या नव्या वाटा शोधण्याकडे सरदारांचा कल आहे. त्यांचे विचारदर्शन जसे बुद्धीला पटते, तसेच ते मनालाही भिडते. त्यांच्या विचारदर्शनाला एक आंतरिक सौंदर्य आहे आणि समाजकल्याणाच्या हितबुद्धीचे सामर्थ्य आहे.

अनुक्रमणिका

## परिशिष्ट : १

## जीवनपट

| | |
|---|---|
| दि. २ ऑक्टोबर, १९०८ | जव्हार, (जि. ठाणे) येथे जन्म.<br>वडील : कै. बाळकृष्ण महादेव सरदार,<br>आई : अनसूया. बालवर्गापासून मराठी सातवीपर्यंतचे शिक्षण जव्हार येथे. |
| १९२४ | मुंबई विद्यापीठाची मॅट्रिक्युलेशन परीक्षा मुंबईतील छबिलदास हायस्कूलमधून उत्तीर्ण. |
| १९३० | स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग. |
| १९३२ | पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून मुंबई विद्यापीठाची बी. ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| फेब्रुवारी १९३३ | कु. गुलाब शंकर लोटलीकर यांच्याबरोबर (मुलुंड) मुंबई येथे विवाह. लग्नानंतर पत्नीचे नाव ‘सुमती’ . महादेव, सौदामिनी, स्नेहलता, अभय, कुमुदिनी. अजित ही सहा अपत्ये. सर्व पुणे येथे स्थायिक.<br>पत्ता —१२४३/२, शिवाजीनगर, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना,<br>पुणे ४११ ००४. |
| १९३४ | पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून एम. ए. पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| १९३४-१९४० | बेकारी. या काळात मराठी संत, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स प्रभृतींच्या वाङ्मयाचे वाचन आणि चिंतन. |
| १९४१-१९६८ | पुण्याच्या श्री. ना. दा. ठाकरसी महिला महाविद्यालयात मराठीचे अध्यापन. तेव्हाचे प्राचार्य वामन मल्हार जोशी यांचे सहकारी म्हणून मराठी विभागात १९४१ मध्ये प्रारंभ. १९६८ मध्ये महिला विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख म्हणून सेवानिवृत्त. या कालखंडाच्या पूर्वार्धात घरी अनौपचारिक अभ्यास - मंडळाचे संचालन. प्रा. ह. श्री. शेणोलीकर, कै. मु. गो. पानसे, श्री. द. रा. कानेगावकर प्रभृती अभ्यासक या मंडळात सहभागी होत असत. |
| १९५८ ते १९६३ | आकाशवाणीच्या कै. पु. मं. लाड स्मारक व्याख्यानमालेत संत वाङ्मयावर व्याख्याने. १९७७ मध्ये याच मालेचे अध्यक्षस्थान. |
| १९६१ ते १९८० | महाराष्ट्र राज्य भाषा सल्लागार मंडळाचे अध्यक्ष. |
| २ ऑक्टोबर १९६८ | ना. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास षष्ट्यब्दीपूर्तिसमारंभ. तसेच प्रा. भा. शं. भणगे संपादित, ‘साहित्यविचार आणि समाजचिंतन’ हा प्रा. सरदार गौरवग्रंथ प्रकाशित. |
| १९६८ ते १९८० | कौशिक व्याख्यानमाला, स. प. महाविद्यालय, पुणे (१९७१), सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ (१९७३), व्हीनस प्रकाशन व्याख्यानमाला, पुणे (१९७५), लालजी पेंडसे व्याख्यानमाला, मुंबई मराठी साहित्य संघ (१९७७), दामोदर धर्मानंद कोसंबी व्याख्यानमाला, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (१९७९), इत्यादी व्याख्यानमालांतून व्याख्याने. यांपैकी बहुतेक व्याख्याने पुढे ग्रंथरूपाने प्रकाशित. |
| २५ ऑक्टोबर १९७५ | मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन, २१ व्या अधिवेशनाचे अध्यक्षपद. |
| १४ जानेवारी १९७८ | दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद (मुंबई). |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १ फेब्रुवारी १९८० | अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (बार्शी, जि. सोलापूर) चोपन्नाव्या अधिवेशनाचे अध्यक्षपद. |
| १९८० | नाशिक येथे मराठी अन्यायनिर्मूलन परिषदेचे अध्यक्ष. |
| १९८० | शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत सांगली येथे मराठी अन्यायनिर्मूलन परिषदेचे अध्यक्ष. |
| १९८२ | नाशिक येथे मराठी अन्यायनिर्मूलन परिषदेचे अध्यक्ष. |
| १९८३ | मानव विज्ञान परिषदेतर्फे (प्रा. सरदार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त), आदिवासी साहित्यिक आणि कार्यकर्ते यांच्या मेळाव्यात उद्‌घाटनपर भाषण. |
| १९८४ | जळगाव येथे मराठी अन्यायनिर्मूलन परिषदेचे अध्यक्ष. |
| १९८४ | 'रामशास्त्री प्रभुणे सामाजिक न्याय पुरस्कार (माहुली)' प्राप्त. |
| १९८४ | शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत कोल्हापूर येथे मराठी अन्यायनिर्मूलन परिषदेचे अध्यक्ष. |
| १९८४ | प्रवरानगर येथे ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. |
| १९८५ | मनोर (ता. पालघर) येथे जंगल बचाव आदिवासी परिषदेचे अध्यक्ष. |
| १९८५ | जयसिंगपूर येथे दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक. |
| १९८६ | मुंबई येथे दुसऱ्या महाविद्यालयीन मराठी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटक. |
| १९८६-८८ | विविध सभासंमेलनांत अध्यक्ष,वक्ते, उद्‌घाटक या नात्यांनी सहभागी. |
| संस्थात्मक कार्य : | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे (आजीव सदस्य), भारत इतिहास संशोधन मंडळ (आजीव सदस्य), गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक (फेलो), महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे (अध्यक्ष), समाज प्रबोधन संस्था, पुणे (विश्वस्त), लोकायत प्रतिष्ठान, पुणे (विश्वस्त). |
| दि. १ डिसेंबर १९८८ | पुणे येथे निधन. |

अनुक्रमणिका

# परिशिष्ट : २
# साहित्यसूची


### स्वतंत्र ग्रंथ

०१. **अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठीका** (इ. स. १८०० -१८७४) प्रकाशक : गं. बा. सरदार, पुणे, आवृत्ती पहिली, १९३७ आवृत्ती दुसरी, पुनर्मुद्रण, १९५६ (मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे), आवृत्ती तिसरी १९७१ (मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन, पुणे.)

०२. **महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी,** प्रकाशक : गं. बा. सरदार, पुणे, आवृत्ती पहिली, १९४१, आवृत्ती दुसरी, पुनर्मुद्रण, १९६१, सुनंदा प्रकाशन, पुणे.

०३. **जोतीराव फुले, स्वाध्यायमाला ४७,** अ. वी. गृह प्रकाशन, पुणे १९४५.

०४. **संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती** महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे. आवृत्ती पहिली, १९५०, आवृत्ती दुसरी, १९६२ (दोन लेखांची भर) म. सा. प. प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, १९७० (एका लेखाची भर) म. सा. प. प्रकाशन, पुणे. आवृत्ती चौथी, १९७८ (एका लेखाची भर) श्री विद्या प्रकाशन, पुणे.

०५. Saint-Poets of Maharashtra : Their impact on Society: Translated by Dr. Smt. Kumud Mehta, Orient Longmans Ltd, Delhi, 1969. (वरील क्रमांक चारच्या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद)

०६. **संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी** (पु. मं. लाड स्मारक व्याख्यानमाला, १९६२ व १९६३, प्रकाशन विभाग, भारत सरकार, दिल्ली, १९६५). पृष्ठे पस्तीस ते पंच्याऐंशी.

०७. **ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा.** (कौशिक व्याख्यानमाला, स. प. महाविद्यालय, पुणे १९७१)

०८. **न्या. रानडेप्रणीत सामाजिक सुधारणेची तत्त्वमीमांसा,** सेनापती बापट स्मारक व्याख्यानमाला, पुणे विद्यापीठ, पुणे १९७३.

०९. **आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार** व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५.

१०. **अध्यक्षीय भाषण** (पुस्तिका) मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन, अधिवेशन २१ वे, २५ ऑक्टोबर १९७५.

११. **अध्यक्षीय भाषण** (पुस्तिका), अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अधिवेशन ५४ वे, बार्शी, जिल्हा सोलापूर, दि. १ फेब्रुवारी १९८०

१२. **महात्मा फुले : विचार आणि कार्य** ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८१

१३. **धर्म आणि समाज परिवर्तन,** सुधीर बेडेकर यांचे मागोवा प्रकाशन, पुणे १९८२.

१४. **महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची वाटचाल** नवनिर्माण प्रकाशन, पारगाव, जिल्हा पुणे, १९८६.

१५. **गांधी आणि आंबेडकर** सुगावा प्रकाशन, पुणे, १९८७.

### प्रा. सरदारांच्या स्फुट लेखांची संपादने

१६. **प्रबोधनातील पाउलखुणा,** संपादक : डॉ. निर्मलकुमार फडकुले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८

१७. **नव्या युगाची स्पंदने,** संपादक : डॉ. प्र. चिं. शेजवलकर, संजय प्रकाशन, पुणे, १९८२.


अनुक्रमणिका

१८. **नव्या उर्मी, नवी क्षितिजे,** संपादक : डॉ. ल. रा. नसिराबादकर, संजय प्रकाशन, पुणे, १९८७.

१९. **परंपरा आणि परिवर्तन,** संपादक : डॉ. मो. स. गोसावी. प्रा. वि. शं. चौघुले, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९८८.

अनुक्रमणिका

## परिशिष्ट : ३
## प्रा. सरदार यांनी संपादित केलेले ग्रंथ

०१ ते ०२ **महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगति आणि समस्या** खंड १ व खंड २, मे. जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.

०३. **संक्रमणकालाचे आव्हान** मे. जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६६.

०४. **Journal of SNDT Women's University, vol. I, 1966.**

०५. **Golden Jubilee Commemmoration Volume (1916--1966)** SNDT Women's University, Bombay, 1968.

0६. **तुकारामदर्शन** अर्थात अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९६८.

०७. **रामदासदर्शन,** मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९७२.

०८. **एकनाथ दर्शन,** अर्थात् एकनाथांच्या समग्र वाङ्मयाचे सारतत्त्व, मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन, पुणे १९७८.

अनुक्रमणिका

## परिशिष्ट : ४
## संदर्भ सूची


०१. **साहित्यविचार आणि समाजचिंतन** (प्रां. गं. बा. सरदार षष्ट्यब्दीपूर्ती ग्रंथ) संपादक : डॉ. भा. शं. भणगे, ओरिएन्ट लाँगमन्स लिमिटेड, मुंबई, १९६८.

०२. **प्रां. गं. बा. सरदार साहित्य -समालोचन** संपादक : हे वि. इनामदार आणि ल. रा. नसिराबादकर, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९८०.

०३. **प्रबोधनाचे प्रवक्ते : गं. बा. सरदार** लेखिका डॉ. सौ. सुनंदा मोरेश्वर गोसावी, गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९८६.

०४. **मराठी सत्तेचा उत्कर्ष** (मराठी अनुवाद) न्या. म. गो. रानडे, आ. ३ री, १९२५.

०५. **मराठी गद्याचा इंग्रजी अवतार** -दत्तो वामन पोतदार, आ. १ ली १९२२.

०६. **श्रीज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य** -न. रा. फाटक, आ. १ ली १९५४.

०७. **निवडक लेखसंग्रह** त्र्यं. शं. शेजवलकर, आ. १ ली १९७७.

०८. **महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य** बा. रं. सुंठणकर, आ. १ ली, १९४८.

०९. **महाराष्ट्र सांवत्सरिक** श्री. म. माटे, आ. १ ली, १९३३.

१०. **अस्पृष्टांचा प्रश्न** श्री. म. माटे, आ. १ ली, १९३३.

११. **इतिहासाचा सामाजिक वेध** स. मा. गर्गे, आ. १ ली, १९९५.

# अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचे भाष्यकार प्रा. गं. बा. सरदार

सत्वसंपन्नता आणि समाजमनस्कता हे प्रा. गं. बा. सरदार यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे लक्षणीय गुणविशेष आहेत. त्यामुळे संतसाहित्याच्या सामाजिक फलश्रुतीचा ते वेध घेतात; आणि समाजपरिवर्तनाच्या विविध चळवळींना साधन-शुचितेचे वळण लावण्याचा प्रयत्न करतात.

संत वाङ्मय, समाजप्रबोधन आणि दलित साहित्य यांविषयीचे आपले प्रकट चिंतन सरदारांनी लेखणी आणि वाणी या दोन्ही माध्यमांतून सातत्याने व समर्थपणे व्यक्त केले. त्यांच्या या कामगिरीचा साधार परामर्श येथे घेतला आहे.

अनुक्रमणिका